किंमत १ रुपया

REG. No. B. 3434


# अर्थ

दिवाळी अंक

दिवाळी अंक

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख १९ आक्टोबर, १९४९ अंक ४२



# कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड,

## कृष्णाकित्तूर

संचालक-मंडळ

(१) श्री. बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल. बी.
वकील, बेळगांव.
चेअरमन, दि बेळगांव पायोनियर को. बँक लि. बेळगांव, चेअरमन्

(२) श्री. पी. जे चिनमुळगुंद,
आय. सी. एस., कलेक्टर, सांगली.
(३) श्री. डी. एन्. कौशिक,
डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, मुंबई.
} मुंबअी सरकार नियुक्त

(४) श्री. एस. जी. मराठे, बी. ई. (सिव्हिल), पुणें
संचालक, दि बँक अॉफ महाराष्ट्र लि. पुणें, किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी.

(५) श्री. के. बी. देसाई, शाहुपुरी, कोल्हापूर.
संचालक, कोल्हापूर, बँक लि. कोल्हापूर,
कोल्हापूर शुगर मिल्स लि. कोल्हापूर.

(६) श्री. एस्. एस्. निसळ, अहमदनगर
अेस्. निसळ सन् अॅण्ड कंपनीचे चालक.

(७) श्री. एन्. एस्. गोडबोले, पुणें.
संचालक, धुळें अिलेक्ट्रिक सप्लाय कंपनी, धुळें.

(८) सरदार व्ही. बी. महागांवकर, कोल्हापूर.

(९) रावबहादूर व्ही. व्ही. यारगोप,
बी. ए., एलएल. बी.,
माजी दिवाण, मिरज ज्युनिअर स्टेट,
चेअरमन, दि बुधगांव बँक लि. बुधगांव.

(१०) दिवाणबहादूर एस. डी. मानवी, गदग.

(११) सरदार व्ही. डी. पानसे (स्पेशल)
कृष्णा–कित्तूर

(१२) सरदार के. आर. विंचूरकर
संचालक, लक्ष्मी टेक्स्टाअील मिल्स लि. भोर
चेअरमन, गोवर्धन डेअरी फार्म्स लि., पुणें

कंपनीचें भांडवल रु. १०,००,००० चें असून सर्व विक्रीस काढलेलें आहे. त्यापैकीं, साधारण भाग सर्व खपलेले आहेत.

रु. १,५५,००० किंमतीचे ६% क्यु. प्रेफरन्स भाग विकाऊ आहेत.

गेल्या सालच्या जनरल मीटिंगमध्यें खालीलप्रमाणें डिव्हिडंड मंजूर करण्यांत आलें.

(१) साधारण भागावर (इंटेरिम डिव्हिडंड धरून) ६%
(२) ६% क्यु. प्रेफरन्स भागावर ६%

## डिस्टिलरी सुरू झाली—

डिस्टिलरींत रेक्टिफाइड व डिनेचर्ड स्पिरिट तयार होतें.

आमचेकडे अस्सल दुधाची टॉफी व अव्वल दर्जाची कन्फेक्शनरी तयार होते.

धंद्याच्या वाढीसाठीं कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | ४ % |
| २ वर्षें | ५ % |
| ३ वर्षें | ६ % |

अधिक माहितीसाठीं खालील पत्त्यावर लिहा :—

पोस्ट—कृष्णाकित्तूर
डिस्ट्रिक्ट—बेळगांव
व्हाया—कुडची

विंचूरकर अॅण्ड को.
मॅनेजिंग एजंटस.


नवीन माल, योग्य किंमत

लुगडीं, पातळें व मिलचें कापड

—: याकरितां :—

शाहाडे आठवले लिमिटेड, दादर

टेलिफोन] शाहाडे बिल्डिंग, लेडी जमसेदजी रोड, दादर [६०५५४




स्वतंत्र हिंदुस्थानला समृद्ध व स्वावलंबी करण्यासाठी ३२ वर्षांचा हा कारखाना वरील वस्तूंची निर्मिती मोठ्या जोमानें करीत आहे.

ओगले ग्लास वर्क्स, लिमिटेड

ओगलेवाडी (जि. सातारा).

OGW/M8 TDM. 6 DAY (R)

पुणें येथील एजंटः—मे. केळकर बंधु, बुधवार चौक.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स बुधवार चौक, पुणें

# चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस् लि.

रजिस्टर्ड ऑफिस : वेस्टर्न इंडिया हाऊस,
सर फिरोजशहा मेथा रोड, मुंबई.

चितळेनगर येथें ए. सी. करंटवर चालणारें व आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज असें पॉवरहाऊस नुकतेंच सुरू झालें असून त्यापासून उत्पन्न होणाऱ्या विजेच्या साहाय्यानें कंपनी आतां शेतीविषयक इतर जोडधंदे हातीं घेणार आहे.

वाढत्या धंद्यासाठी कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते.

| ठेवी : | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत वर्षें— | १ | २ | ३ | ४ | ५ ते ७ |
| व्याजाचा दर–द. द. शेंकडा | ४% | ४½% | ५% | ५½% | ६% |

अधिक माहितीसाठी आजच वरील पत्त्यावर लिहा :

चितळे ब्रदर्स, मॅनेजिंग एजण्टस्.

—१२—

# श्री महावीर को. बँक लि., कोल्हापूर

ह्या बँकेचे दृष्टीनें १२ हा आकडा औचित्यपूर्ण आहे.

तिच्या बारा वर्षांच्या सेवेच्या, वाढीच्या आणि प्रगतीच्या कालखंडानें युद्ध व शांतता हीं दोन्हीं अनुभवलीं आहेत.

ही बँक

★ पूर्णपणें अनुभवी होण्याइतकी जुनी आहे.
★ सतत प्रगतिपथावर असण्याइतपत नवी आहे.
★ सभासदांच्या सर्व गरजा भागविण्याइतकी मोठी आहे.
★ सभासदांची तातडीची व कार्यक्षम सेवा करण्यास लवचीकपणा असण्याइतकी व सर्वांशीं स्नेहभावानें सहकार्य करण्यास योग्य त्या बेताच्या आकाराची आहे.

मुख्य कचेरी : कोल्हापूर. शाखा : जयसिंगपूर.

डी. बी. शेटे. बी. बी. सुलताने.
मॅनेजर. मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि जमखंडी स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., जमखंडी.

( स्थापना १९४० )

शाखा : बन्हट्टी

सहकार्य हेंच भारतीय अभ्युदयाचें साधन !

सहकारी संस्थांनाच ठेवीदार व भागीदार होऊन सहाय्य द्या !

नवव्या वर्षांचे बोलके आंकडे !

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| विक्रीस काढलेलें भांडवल | २,५०,००० रु. |
| विकलेलें व मागणी केलेलें भांडवल | १,२९,४२५ रु. |
| रिझर्व व इतर फंडस् | ९,९,९०० रु. |
| ठेवी ( चालू सेव्हिंग्ज व मुदत ) | २१,४७,६७० रु. |
| सरकारी कर्जरोख्यांत गुंतविलेली रक्कम | १२,१९,९०० रु. |
| सोसायट्या व इतर तारणावर गुंतविलेली रक्कम | ११,२५,४०० रु. |
| निवळ नफा | २८,६०० रु. |
| खेळतें भांडवल | १९,००,००० रु. |

*योग्य दरांत ठेवी घेतल्या जातात व को-ऑपरेटिव्ह बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.*

एस. एम. अथणी
आर. जी. दाते
( मॅनेजिंग डायरेक्टर्स )

व्ही. एस. आनीखिंडी,
चेअरमन.

म. द. खाडिलकर,
मॅनेजर.

# दि विजय टेक्स्टाइल्स लि.

पुणें ४

आमच्या सर्व हितचिंतकांस ही दिवाळी व नवें वर्ष सुखाचें जावो.




महा-कवडीकर आणि कं.,
मॅनेजिंग एजंटस्.

## अनुक्रमणिका


१ योग्य विचारसरणी व अंमलबजावणी ३६६
२ डॉलर, पौंड व रुपया ( प्रिं. द. गो. कर्वे ) ३६७
३ हुंडणावळीचे नवे दर ३६८
४ लोकसंख्येचा प्रश्न ( डॉ. र. पु. परांजपे ) ३६९
५ सर्वोदयाकरितां एक प्रायोगिक योजना ( प्रा. वि. म. दांडेकर ) ३७१
६ अन्नधान्याच्या पिकांचा दर्जा व उत्पादन ( प्रा. वि. म. चव्हाण ) ३७५
७ गुंतविणारावरील अरिष्ट ( श्री. व. वि. लोणकर ) ३७७
८ उत्पादनाचा मजबूत व टिकाऊ पाया ( श्री. शं. न. जोशी ) ३७९
९ दुसऱ्या महायुद्धाचे अर्थशास्त्रावर परिणाम ( श्री. भा. म. काळे ) ३८३
१० सहकारी सोसायट्यांची पुनर्रचना ( श्री. दत्तशर्मा ) ३८७
११ उद्यम स्वातंत्र्यावर नियंत्रण नको ! ( श्री. स. वा. दातार ) ३९१
१२ कोल्हापूर जिल्ह्यांतील ऊसकरी शेतकऱ्यांचे पेचप्रसंग ( श्री. अ. बा. पाटील ) ३९३
१३ महाराष्ट्रांतील उद्योन्मुख शास्त्रज्ञांसाठी— ( डॉ. मो. वा. चिपळूणकर ) ३९५
१४ आमच्या बँकेचे मॅ. डायरेक्टर ( श्री. सं. म. संढाणळे ) ३९९
१५ युरोपांतील सरहद्दींची गुंतागुंत ४०१
१६ पौंडाच्या दुखण्याची रशियन मीमांसा ४०३
१७ राहणीच्या खर्चात वाढ ४०५
१८ मुंबई प्रांतांतील वीजपुरवठ्याचा प्रश्न ४१०


## " अर्था " चा पुढील अंक

दिवाळीनिमित्त " अर्था " चे दोन अंक प्रतिवर्षीप्रमाणें बंद राहून, त्यानंतरचा अंक ९ नोव्हेंबर, १९४९ रोजीं प्रसिद्ध होईल.

# अर्थ

दिवाळी अंक

बुधवार, ता. १९ आक्टोबर १९४९



स्थापना : १९३५

संस्थापक :

प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः

अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

## योग्य विचारसरणी व अंमलबजावणी

### दिवाळीनिमित्त यशचिंतन

"अर्था"च्या १५ व्या वर्षाचा हा दिवाळी अंक आमचे वाचकांस सादर करण्यास आम्हांस आनंद होत आहे. आपल्या आर्थिक प्रश्नांचा बिकटपणा आतां तीव्रतर होत चालला असून नव्या अडचणींची भर पडत आहे; परंतु त्यांतून मार्ग काढण्याचे प्रयत्नहि चालू आहेत. भारत सरकारनें आंखलेल्या आर्थिक व औद्योगिक धोरणास महाराष्ट्रीयांनीं हार्दिक पाठिंबा केव्हांच दिलेला आहे आणि ह्या धोरणाच्या व्यक्तिगत अंमलबजावणीचे कामीं त्यांचें पाऊल सतत पुढेंच आहे, एवढेंच केवळ म्हणून पुरेसें नाहीं. कांहीं मर्यादेपलीकडे वैयक्तिक स्वार्थाच्या आहारीं न जाणें हा महाराष्ट्रीयांचा स्वभावधर्मच आहे; आणि समाजघातकी परंतु पैसेवाल्या लोकांना महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांत मानाचें स्थान मिळूं शकतच नाहीं. महाराष्ट्रीयांचे उद्योग व कारखाने ह्यांची वाढ ह्याच आधारावर झालेली आहे. अशा परिस्थितींत देशासाठी आवश्यक तो सर्व त्याग करण्यास आपले लोक केव्हांहि तयार आहेतच. योग्य आर्थिक विचारसरणी इतकेंच, किंबहुना त्याहूनहि अधिक महत्त्व आज कार्यक्षम व न्याय्य अंमलबजावणीस प्राप्त झालेलें आहे, आणि त्याची जबाबदारी मुख्यतः सरकारावरच पडते. सामुदायिक व्यापक हितास प्राधान्य देण्यास आपले लोक सदैव तत्पर आहेत; त्यांची ही निष्ठा टिकून राहाण्याजोगी परिस्थिति मात्र आवश्यक आहे.

"अर्था"नें प्रथमपासूनच प्रगतिपर अशा शुद्ध राष्ट्रीय धोरणाचा पुरस्कार केलेला आहे. देशाच्या खऱ्या आर्थिक व औद्योगिक उद्धाराची दिशा दाखविण्याचें काम त्यानें आपल्या हितचिंतकांच्या सहाय्यानें सतत १५ वर्षें चालू ठेवलें आहे. अनेक आर्थिक तज्ज्ञ "अर्था" साठी लेखन करीत असतात व प्रत्यक्ष उद्योगधंद्यांत गुंतलेले इतर हितचिंतक त्यास अन्य मार्गांनें आपुलकीनें सहाय्य देतात. ह्या सर्वांच्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें आमचें कर्तव्य आहे. "अर्था"स आज मराठी आर्थिक वाङ्मयांत जें स्थान प्राप्त झालेलें आहे, त्याच्या श्रेयाचा वाटा ज्याचा त्यास देणें उचितच होईल. आमच्या सर्व सहाय्यकांस व हितचिंतकांस नवें वर्ष सुखाचें जावो.

### ह्या अंकांतील कांहीं लेखांचा परिचय

प्रिं. द. गो. कर्वे ह्यांनीं आपल्या "डॉलर, पौंड व रुपया" ह्या लेखांत बाजारभावांच्या अमर्याद वाढीचे सर्व अनिष्ट परिणाम पुनः दीर्घकाळ भोगण्याची पाळी येऊं नये ह्यासाठी उत्पादनाची कार्यक्षमता व उपभोगांची घट हे उपाय कडकपणें अमलांत आणण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. उपासमारीच्या संकटावर धान्य उत्पादन वाढीचा तोडगा सांगण्यांत येतो, परंतु हिंदी लोकसंख्येच्या वाढीकडे कोणीच लक्ष देत नाहीं; समजूतदार लोकांनीं ह्या प्रश्नाचें महत्त्व सत्वर मान्य केलें तरच त्यास अनुसरून आचार होण्याची कांहींतरी शक्यता; लोकसंख्येच्या वाढीचा धोका पुरा ओळखा, असें डॉ. र. पु. परांजपे ह्यांनीं आपल्या लेखांत आर्जवून सांगितलें आहे. आपलें मनुष्यबळ निस्तेज लोकसंख्येवर अवलंबून नसून, तिच्या प्रत्येक घटकाच्या सुदृढपणावर व उत्पादनक्षमतेवर अवलंबून राहाणार हें उघड आहे. गोखले इन्स्टिट्यूटमधील प्रा. वि. म. दांडेकर ह्यांनीं सर्वोदयाकरितां एक प्रायोगिक योजना सुचविली असून, त्याबाबत स्पष्ट शब्दांत आपले विचार मांडले आहेत, व प्रारंभ कसा करावा हें त्यांनीं दाखवून दिलें आहे. मुंबई सरकारचे पीक-संशोधन अधिकारी प्रा. वि. म. चव्हाण ह्यांनीं, मुंबई प्रांतांत उशीरा सुरुवात झालेल्या परंतु आतां गतिमान असलेल्या पीक-संशोधनाची थोडक्यांत माहिती दिली आहे. मध्यमवर्गाच्या आर्थिक दुर्दशेची पार्श्वभूमि आमच्या वाचकांच्या परिचयाचे शेअर ब्रोकर व लेखक श्री. व. वि. लोणकर ह्यांनीं आपल्या लेखांत वर्णिली आहे. उत्पादनाचा मजबूत व टिकाऊ पाया उत्पादनांत गुंतलेल्या नागरिकांच्या अनुकूल मानसिक अवस्थेवर कसा मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतो आणि ह्या बाबतींत अनुभव काय आलेले आहेत, ह्याची चिकित्सा श्री. शं. ज. जोशी ह्या अभ्यासकानें केली आहे. सहकारी पतपेढ्यांस भांडवल पुरवणाऱ्या प्रमुख संस्थांचा 'दत्तशर्मा' ह्या लेखकास प्रत्यक्ष दीर्घकाल अनुभव असल्यानें, सहकारी सोसायट्यांच्या कायद्याची पुनर्रचना आवश्यक झाली आहे, ही त्यांची सूचना सहकारी कार्यकर्त्यांस व सहकारी अधिकाऱ्यांस विचारार्ह वाटेल, अशी अपेक्षा आहे. डॉ. मो. वा. चिपळूणकर ह्यांनीं शास्त्रीय परिषदेच्या पुणें येथील येत्या अधिवेशनाचे निमित्तानें उद्योन्मुख शास्त्रज्ञांस उपयुक्त सूचना केल्या आहेत. दुसऱ्या महायुद्धाचे जागतिक अर्थशास्त्रावर झालेले व होत असलेले परिणाम श्री. भा. म. काळे ह्यांनीं वर्णिले आहेत. श्री. स. वा. दातार ह्यांनीं उद्यम स्वातंत्र्यावर नियंत्रण नको, हें सांगतांना त्याची कारणमीमांसाहि केली आहे. श्री. अ. बा. पाटील व श्री. ख. म. खंडागळे ह्यांचे लेखहि उद्बोधक वाटतील. पौंडाच्या अवमूल्यनामागील अर्थव्यवस्थेची रशियन मीमांसा आम्हीं मुद्दाम सोप्या शब्दांत दिली आहे. युरोपांतील सरहद्दींची गुंतागुंत हा लेख वाचकांस माहितीपूर्ण वाटेल. आपल्या इकडील वीजपुरवठ्याची सद्यःस्थिति व नियोजित वाढ ह्याची कल्पना देणारा लेखहि वाचकांस आढळेल.

# डॉलर, पौंड व रुपया

लेखक :— प्रिन्सिपाल द. गो. कर्वे

ब्रिटिश व हिंदुस्थान सरकारांनीं अनुक्रमें पौंड व रुपया ह्यांचे डॉलरशीं असलेले भाव उतरविल्याचें नावीन्य आतां ओसरत आहे. भाव उतरविल्यानें डॉलरच्या देण्यास आतां सव्वातीन रुपयांच्या ऐवजीं पावणे पांच रुपये पडतील व ह्याच्या उलट एका डॉलरला खपणाऱ्या मालाबद्दल येथील निर्यात व्यापाऱ्यास सव्वा तिनाऐवजीं पावणेपांच रुपये मिळतील हें कोष्टक आतां सर्वांस पाठ झालें असेल. त्याचप्रमाणें नाण्याच्या अमेरिकन भावांत झालेल्या ह्या फरकामुळें अमेरिकेहून माल आणणें अधिक महागाईचें व अमेरिकेला माल पाठविणें अधिक फायद्याचें पडेल हेंहि गणित वर्तमानपत्रांतून येऊन गेलें आहे. वास्तविक परकी आयात कमी करणाऱ्या व परकी मागणी वाढविणाऱ्या ह्या घटनेमुळें येथील किंवा इंग्लंडमधील बाजारभाव वाढणें साहजिक आहे. असें असून ब्रिटिश व हिंदी सरकारचे फडणवीस बाजारभाव वाढण्याचें कारण नाहीं असें आपापल्या लोकांस सांगत आहेत. ह्या घोषणा कितपत यथार्थ आहेत व त्यांच्या मागें कोणती विचारसरणी आहे ह्याचा पूर्ण विचार झाला पाहिजे.

### बाजारभावांवर परिणाम

पौंडाचा डॉलरशीं असलेला भाव घटला तरी रुपया व ब्रिटिश पौंडाशीं संलग्न असलेली दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिआ, आयर्लंड, ईजिप्त, डेन्मार्क, नॉर्वे, ब्रह्मदेश, इत्यादि राष्ट्रें ह्यांच्या परस्पर भावांत फरक झालेला नाहीं. ह्या राष्ट्रांतून येणाऱ्या मालास अधिक पैसा द्यावा लागण्याची भीति नाहीं, व त्यांस पाठविल्या जाणाऱ्या मालाबद्दल अधिक पैसा मिळण्याची आशाहि नाहीं. हिंदुस्थानचा बहुतेक व्यापार ह्याच पौंडी राज्यांत असल्यानें रुपयाच्या डॉलरशीं असलेल्या भावांत फरक झाला तरी एकंदरीनें बाजारभावांत फरक होणार नाहीं अशी अधिकृत अपेक्षा आहे. हिंदुस्थानचा परकी व्यापार जेवढा पौंडी क्षेत्रांत केंद्रित आहे तेवढा तो वरील सर्व संलग्न देशांत आहे असें नाहीं. प्रत्यक्ष इंग्लंडला आपल्या अनेक गरजा अमेरिका व कॅनडा ह्या डॉलर नाण्यांच्या राष्ट्रांतून भागवाव्या लागतात. सर्व पौंडी राष्ट्रांस मिळून त्यांच्या अमेरिकन आयातीस द्याव्या लागणाऱ्या तीस टक्के अधिक किंमतीचा परिणाम त्यांच्या स्थानिक व परस्पर देवघेवीच्या बाजारभावांवर होणें अपरिहार्य आहे. परदेशी व्यापारांतील भाव स्थानिक व्यापारांतहि परस्पर स्पर्धेमुळें उतरणार व एकंदरीनें सर्व-सामान्य बाजारभावांचें मानहि चढींचें राहणार हें लपवून ठेवणें अशक्य आहे.

इंग्लंडमध्यें आयात-निर्यात, उत्पादन, खरेदी-विक्री व बाजारभाव ह्या सर्वांचें अधिक पद्धतशीर व यशस्वी नियमन होत असल्यानें फार तर एवढें म्हणतां येईल कीं, बाजारभावांच्या वाढीचें क्षेत्र व प्रमाण हीं मर्यादित राहतील. ब्रिटिश फडणवीस हे सरकारी तिजोरीच्या चोखपणास अत्यंत जागरूक असल्यानें त्यांनीं आपल्या ज्या भाषणांत बाजारभावांत वाढ होण्याचें कारण नाहीं असें सांगितलें त्यांतच गव्हाच्या रोटीचा भाव वाढविला जाईल हें स्पष्ट जाहीर केलें. गव्हाचा भाव वाढेल, आयात कच्च्या मालाचा व इतर उत्पादक साधनांचाही भाव, तीं अमेरिकेकडून येत असतील तर वाढेल, परंतु एकंदरीनें बाजारभाव वाढणार नाहींत हें म्हणणें टिकणार नाहीं. बाजारभाव वाढले, राहणीचा खर्च वाढला तरी पगारदारांनीं अधिक वेतन मागूं नये व धंदेवाल्यांनीं अधिक नफा मिळवूं नये अशी ब्रिटिश फडणविसांची त्यांच्या देशबांधवांस आग्रहाची सूचना आहे, किंबहुना थोड्या अधिक कष्टमय रहाणींतहि त्यांनीं अधिक काम करावें व उत्पादन आणि व्यापार ह्यांची कार्यक्षमता वाढवून परकी निर्यात वाढवावी असा त्यांचा आदेश आहे. ह्या आदेशाच्या धोरणानें सरकारी कायदे होऊन ते कामकरी आणि धंदेवाले ह्यांचें सहकार्य मिळवूं शकतील अशी त्यांस खात्री असावी. कदाचित् इंग्लंडमध्यें हें बहुंशीं घडूनहि येईल.

### पौंडी क्षेत्रापुढील समस्या

इतर देशांत, विशेषत: हिंदुस्थानांत, ह्या वळणाचें धोरण मुळांतच आखलें गेलेलें नाहीं. समाजांतील निरनिराळ्या वर्गांच्या कमाईचें प्रमाण, आणि त्यांची किमान व कमाल श्रेणी, हीं आर्थिक कार्यक्षमता अगर सामाजिक न्याय ह्यांच्या कोणत्याहि कसोटीप्रमाणें ठरविण्याची येथें प्रथा नाहीं. उत्पादन, व्यापार, किंमती ह्यांबद्दलचें धोरण संपूर्ण स्वातंत्र्य व निवडक लोकांची मक्तेदारी ह्यांमध्यें हेलकावत आहे. प्राप्त संकटाचें निवारण म्हणून एखादें नियमनाचें क्षेत्र हातीं घेतलें तरी तें नियमन घरसोडीचें व बोंगळपणाचें असतें. ब्रिटिश फडणवीस सरकारी राज्यकारभारांत काटकसर करण्यास तयार आहेत. संरक्षण व सामाजिक सोयी ह्यांवर बचत करण्यास तयार नाहींत. राज्यकारभाराचा बहुतेक खर्च प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीत्या ह्या दोन खात्यांशीं संलग्न असल्यानें वास्तविक राज्यकारभाराच्या खर्चांत विशेष बचत होणार नाहीं. हिंदुस्थानांत तर नव्या राजवटीवर पूर्वकालीन अभिवचनें, चालू परिस्थितींतील जोरदार मागण्या व भविष्यकालीन राजकीय साहाय्याची आशा ह्या सर्वांचें दडपण एवढें मोठें आहे कीं सरकारी खर्चांत बचत तर राहोच, परंतु त्यांत जोराची वाढ न होणेंहि दुरापास्त आहे. परकी आयात कमी झाली आणि परदेशाची मागणी वाढली तरी बाजारभाव वाढूं नयेत अशी इच्छा असल्यास परकी आयातींतील घट स्थानिक उत्पादनाच्या वाढीनें आणि कार्यक्षमतेनें भरून काढली पाहिजे, व परकी मागणी वाढेल त्या प्रमाणांत येथील मागणी कमी केली पाहिजे. इंग्लंड, हिंदुस्थान अगर पौंडी क्षेत्रांतील दुसरा कोणताहि देश ह्या सर्वांपुढें हीच समस्या आहे. सर्व क्षेत्रांत उत्पादनाची कार्यक्षमता वाढवा व उपभोगाची घट करा, तरच राष्ट्राची पत टिकेल. नाहीं तर, बाजारभावांच्या अमर्याद वाढीचे सर्व अनिष्ट परिणाम पुन्हां दीर्घकाल भोगण्याची वेळ येईल.

### अमेरिकन धोरणावर सर्व कांहीं अवलंबून

पौंडी क्षेत्रांतील सर्व राष्ट्रांच्या नागरिकांनीं वाढत्या कष्टाचें व काटकसरीचें असें जीवन पत्करलें तरी तें कोणत्या आशेवर करावें? परिस्थिति कायमच अशी राहावयाची असेल तर उद्योग आणि काटकसर ह्यांसहि फारसें उत्तेजन आहे असें नाहीं. ह्या बाबतींत डॉलरच्या नव्या भावाचा अमेरिकेवर कोणता परिणाम होण्याची अपेक्षा आहे हें माहीत असणें जरूर आहे. पौंडी क्षेत्राकडे माल जाणें दुर्घट होऊं लागलें, व त्या क्षेत्रांतील माल वाढत्या प्रमाणांत अमेरिकेस येऊं लागला म्हणजे अमेरिकेंतील बाजारभाव उतरतील आणि मग त्यांचा इतर देशांतील बाजारभावांवरहि परिणाम होऊन सर्वत्र किंमती उतरूं लागतील अशी अपेक्षा आहे. ही अपेक्षा खरी ठरण्याच्या मार्गांत दोन अडचणी आहेत. ज्याप्रमाणें पौंडी क्षेत्रांत

बाजारभाव वाढूं नयेत म्हणून सरकार नियामक धोरण स्वीकारणार, याप्रमाणें अमेरिकन बाजारभाव पडूं लागल्यास तेथील सरकारनें उत्तेजक धोरण स्वीकारून बाजारभाव पडूं देऊं नयेत असें त्या सरकारवर प्रभावी लोकमताचें दडपण आल्याशिवाय राहणार नाहीं. असें दडपण झुगारून देण्याचें सामर्थ्य अमेरिकन सरकारला आहे, असें आज तरी म्हणवत नाहीं. प्रत्येक क्षेत्रांत अमेरिकेची इतर राष्ट्रांशीं स्पर्धा, आणि इतर राष्ट्रांस अमेरिकेंत माल पाठविण्यास मोठ्या जकातींची अडचण, ह्यांमुळें तर डॉलर व पौंडप्रधान चलन ह्यांचा तोल सांभाळतां येत नाहीं. पौंड तीस टक्क्यांनीं घसरला, तेथेंहि तो स्थिर व्हावयाचा तर अमेरिकन सरकारचें बाजारभावां-बद्दलचें आणि परदेशी व्यापारावरील नियंत्रणें काढून टाकण्याचें धोरण अनुकूल पाहिजे. इतर लोकशाही राष्ट्रांतील लोकांच्या उद्योगाला आणि कांटकसरीला अमेरिकन लोकांचें सहकार्य, उत्पाद-नास सढळ मदत व माल घेण्याची तयारी ह्या मार्गानें न मिळालें, तर पौंडी चलनाचा भाव उतरविल्यानें त्या त्या राष्ट्रांचा अगर अमेरिकेचाहि परिणामीं कांहींच फायदा होणार नाहीं.

## हुंडणावळीचे नवे दर

| देश | चलन | जुना दर | नवा दर | कोणत्या चलनांत व्यक्त केला | फरक (%) |
|---|---|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | पौंड | $4·03 | $2·80 | $ | --30·5 |
| ऑस्ट्रेलिया | पौंड | $3·22 | $2·24 | £ | --30·4 |
| बेल्जम | फ्रँक | { 43·8275 Fcs. | 50 Fcs. | $ | —12 |
| | | {176 Fcs. | 140 Fcs. | £ | +20·4 |
| बर्मा | रु. | 30·225 cents | 20 cents | $ | —30·5 |
| कॅनडा | डॉलर | { 1 Can. $ | 1·10 Can. $ | $ U. S. | —10 |
| | | { 4·03 Can. $ | 3·08 Can. $ | £ | +23·6 |
| झेकोस्लोव्हाकिया | कोरुना | 201·5 | 139·5 (cash) | £ | +30·5 |
| | | | 140·42 (goods) | | |
| डेन्मार्क | क्रोन | 4·81 Kn. | 6·92 Kn. | $ | --30·5 |
| आयरा | पौंड | $4·03 | $2·80 | $ | --30·5 |
| इजिप्त | पौंड | $4·13 | $2·871 | $ | --30·5 |
| फ्रान्स | फ्रँक | { 330 Fcs. | 350 Fcs. | $ | — 5·6 |
| | | { 1,097 Fcs. | 980 Fcs. | £ | +10·6 |
| ग्रीस | ड्रॅकमा | {10,000 dr. | 15,000 dr. | $ | —33·3 |
| | | {32,000 dr. | 42,000 dr. | £ | —23·1 |
| हॉलंड | गिल्डर | 2·65 Gildr. | 3·80 Gldr. | $ | —30·0 |
| भारत | रु. | 30·225 c. | 21 c. | $ | —30·5 |
| जपान | येन | { 1,450 Yen | 1,008 Yen | £ | +30·5 |
| | | { ...... | 360 Yen | $ | |
| हंगेरी | फोरिंटस | { 46·96 Fts. | 28·90 Fts. | £ | +38·46 |
| | | { 11·80 Fts. | Unchanged | $ | |
| मलाया | स्ट्रे. डॉलर | 46·75 c. | 32·5 c. | $. U. S. | —30·5 |
| नॉर्वे | क्रोनर | { 4·96 Kn. | 7·14 Kn. | $ | —30·5 |
| | | { 20 Kn. | Unchanged | £ | |
| न्यूझीलंड | पौंड | $4·03 | $2·80 | $ | —30·5 |
| इसराएल | पौंड | $4·00 | £2·80 | $ | —30·5 |
| पोलंड | झ्लॉटी | { 1,600 Zty. | 1,117 Zty. (buying) | £ | +30·34 |
| | | { 1,616 Zty. | 1,123 Zty. (selling) | | |
| पर्शिया | रिआल | 128 rials | 89 rials 40 dinars | £ | +30·16 |
| रशिया | रुबल | 10·38 rubles | 14·84 rubles | £ | —30 |
| द. आफ्रिका | पौंड | $4·03 | $2·80 | $ | —30·5 |
| स्वीडन | क्रोन | { 3·60 Kna. | 5·18 Kna. | $ | —30·5 |
| | | {14·50 Kna. | Unchanged | £ | |
| स्वित्झरलंड | फ्रँक | 17·35 Fcs. | 12·12 Fcs. | £ | +30·14 |
| सिरिआ | पिस्ट्रेस | 883 Psts. | 613 Psts. | £ | +30·57 |
| सिलोन | रु. | Rs. 3·30 | Rs. 4·75 | $ | —30·5 |
| फिनलंड | मार्क्का | 160 Mk. | 230 Mk. | $ | —30·44 |
| इराक | दिनार | $4·03 | $2·80 | $ | —3 ·5 |
| पोर्तुगाल | एस्क्यूडोस | { 24·95 Esc. | 28·75 Esc. | $ | —13·2 |
| | | {100·60 Esc. | 80·50 Esc. | £ | +20·0 |
| इटली | लिरा | 575 Lire | 617 Lire | $ | —6·8 |
| पाकिस्तान | रु. | 18*d.* | 25·9 *d.* | £ | +30·5 |
| युगोस्लाव्हिया | दिनार | 200 dnr | 140 dnr. | £ | +30 |
| इंडोनेशिया | गिल्डर | 2·65 Gldr. | 3·80 Gldr. | $ | —30·52 |

स्पेशालिस्ट होर्डिंग्ज वॉल पेंटिंग आणि साईन बोर्डस.

स्थापना १९३०
आर्टिस्ट
गोडबोले पेन्टर
हेड ऑफिस : नाशिक सिटी

मोठाल्या शहरीं कामें केलीं जातात. चौकशी करा.

# लोकसंख्येचा प्रश्न

## हिंदी प्रगतीच्या मार्गांतील धोका

लेखक :— डॉ. सर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे

प्राचीन ग्रीक लोकांच्या दंतकथांमध्यें सिसिफस या माणसाची गोष्ट सांगतात. कांहीं कारणामुळें त्याच्यावर ग्रीकांचा मुख्य देव जो झीअस याचा रोष झाला होता, म्हणून त्याला मृत्युलोका-(हेडीज) मध्यें पाठवून दिलें. गेलें व एक जड व मोठा असा दगड एका डोंगराच्या शिखरापर्यंत ढकलीत ढकलीत नेणें हें काम त्याला लावून दिलें; पण शिखराच्या जवळजवळ आल्या-बरोबर त्याच्या हातून निसटून तो दगड पुन्हां डोंगराच्या पाय-थ्याशीं गडगडत यावयाचा, पुन्हां तो वर ढकलीत न्यायचा, पुन्हां तो खालीं पडावयाचा. अशा तऱ्हेची त्याला शिक्षा देण्यांत आली. मानवजातीच्या संख्येचा विचार करतांना या दंतकथेची नेहमीं आठवण होते. लोकसंख्या वाढूं लागली म्हणजे जास्त अन्न उत्पन्न करण्याचा प्रयत्न करावयाचा, जास्त अन्न उपलब्ध झालें म्हणजे त्याच्यापेक्षां जास्त प्रमाणांत लोकसंख्या वाढावयाची, पुन्हां आणखी अन्न उत्पन्न करण्याची धडपड करावयाची, त्यामुळें पुन्हां लोकसंख्या वाढावयाची, अशा प्रकारची सतत चालणारी शर्यत अन्नपुरवठा व लोकसंख्या या दुकलीमध्यें सुरू आहे. या दोहोंचें समप्रमाण केव्हांहि होत नाहीं, व मानवजातीवर पुढें उपासमारीची भीति नेहमीं उभी असते. आतां तर हिंदुस्थानापुढें या शर्यतीमुळें मोठें संकट उभें राहिलें आहे व तें वारण्याकरितां आपले पुढारी अधिक धान्य पिकवा, अन्नाची नासधूस करूं नका, आठपंधरा दिवसांनीं एक तरी उपास करा, वगैरे उपाय लोकांस सुचवीत आहेत.

### समजूतदारांची बौद्धिक मान्यता

हिंवताप आला म्हणजे क्विनीन देणें हा तात्पुरता उपाय ठीकच आहे, परंतु त्याबरोबर हिंवतापाची सांथ कां येते, त्याचा प्रसार करणारे मच्छर ज्यांत वाढतात तीं डबकीं वगैरे कोठें आहेत, तीं सुकवून कशीं टाकतां येतील किंवा त्यांत डी. डी. टी. टाकून अथवा मच्छर रक्षक मासे घालून तीं निरुपद्रवी कशीं करतां येतील वगैरे गोष्टींकडे आरोग्य खात्यानें लक्ष दिलें नाहीं तर हिंव-तापाचें ठाणें कायमचें उठणार नाहीं ही गोष्ट आतां सर्वसंमत झाली आहे. परंतु उपासमारीच्या संकटावर वर, सांगितलेले तात्पुरते उपाय योग्य असले तरी त्यामुळें तें संकट कायमचें नष्ट होणार नाहीं याची जाणीव आमच्या राज्यकर्त्यांना पुरेशी, किंबहुना मुळींच, झालेली नाहीं असें कष्टानें म्हणावें लागतें. अन्नवाढीबद्दल देशामध्यें जितका प्रचार चालला आहे त्याच्या शतांशाहि प्रचार लोकसंख्येच्या वाढीला आळा घातला पाहिजे या दृष्टीनें होत नाहीं. हा प्रश्न अर्थातच फार कठीण आहे. मनापासून जोराचे प्रयत्न केले तरी डोळ्यांत भरण्यासारखें यश येण्यास पुष्कळ वेळ लागेल. तशांत तो प्रश्न धार्मिक समजुतींशीं निगडित झालेला असल्यामुळें त्याचा विचार करितांना लोकांत गैरसमज उत्पन्न करणें अगदीं सोपें आहे. त्याप्रमाणेंच त्याबद्दल कायदा करणें ही अशक्य गोष्ट आहे. तेव्हां लोकांच्या मतांमध्यें जरूर तो फरक बुद्धिवादानें प्रचार करून झाला तरच होईल. परंतु पहिली गोष्ट म्हणजे समजुत-दार लोकांना तरी या प्रश्नाचें महत्त्व मान्य करावयास लावणें ही होय. बौद्धिक मान्यता मिळाली तरी आचारांत तिच्यानुसार कार्य होणें अवघड आहे हें खरें. पण त्यामुळें निष्क्रीय बनणें ही देशविघातक गोष्ट होय.

### धान्योत्पादनाची मोहीम

देशाच्या फाळणीपूर्वी हिंदुस्थानची लोकसंख्या चाळीस कोटीच्या आंतबाहेर होती असा अदमास आहे. या सर्व अखंड हिंदुस्थानास पुरेसें धान्य तेव्हांहि देशांत पिकत नसे, व थोडेसें परदेशांतून आणावें लागे. फाळणीमुळें अन्नतुटीचे बरेच प्रांत हिंदमध्यें आले, व सिंध पंजाब सारखे सुबत्तेचे प्रांत पाकिस्तानमध्यें गेले. यामुळें हिंदवर अन्नविषयक ताण जास्त पडला आहे व आपलें सरकार कोट्यावधी रुपये खर्च करून अमेरिका, कानडा, ऑस्ट्रेलिआ, ब्रह्मदेश, सयाम, वगैरे देशांतून धान्य आणीत आहे. हा खर्च महायुद्धाच्या वेळीं हिंदुस्थानानें फार हाल सोसून जी स्टर्लिंग शिल्लक सांठवुन ठेविली होती त्यांतून केला जात आहे; व तो तसाच चालू राहिला तर ही गंगाजळी केव्हांच खलास होईल अशी साधार भीति सरकारास वाटूं लागली आहे. म्हणून १९५१ सालापुढें परदेशांतून मुळींच धान्य आणावयाचें नाहीं अशी भीष्म-प्रतिज्ञा पं. जवाहरलाल यांनीं जाहिर केली आहे. त्याकरितां धान्योत्पादनाची जोराची मोहीम सुरू आहे. पहावें यश कितपत येतें तें.

### "तर"

हिंदमध्यें पडिक जमीन पुष्कळ आहे. ती नांगरणीस लाविली तर, सर्व शहरांत व खेड्यांत हल्लीं फुकट जाणारीं खतें तयार करण्यास उपयोगी अशीं शेण, मैला वगैरे द्रव्यें यांचा नीट उपयोग संघटित रीतीनें केला तर, कृत्रिम रासायनिक खतें तयार करण्याचे कारखाने काढून तीं शेतकऱ्यांस सवलतीच्या दरानें देऊन धान्याचें उत्पन्न वाढविलें तर, चांगल्या प्रतीचें बीबियाणें शेतकऱ्यांस उपलब्ध करून दिलें तर, ट्रॅक्टर वगैरे आधुनिक शेतीचीं यंत्रें आणून खोल नांगरली व तण वगैरे काढून टाकून जमीन जास्त सुपीक केली तर, लहान–मोठे पाटबंधारे बांधून हल्लीं पावसाचें जें पाणी समुद्रास मिळून जातें त्याचा नीट उपयोग केला तर, उंच-सखल प्रदेशांत जागजागीं ताली बांधून निर्जल शेतीची वाढ केली तर, कृषिविषयक निरनिराळे शास्त्रीय शोध जे परदेशांत चालले आहेत ते आत्मसात् करून त्यांचा उपयोग केला तर हल्लींची अन्नटंचाई कमी होईल किंबहुना तात्पुरती नाहींशी देखील होईल हें खरें. परंतु या सर्व "तरीं"तून सुखरूपपणें पैलतीरीं जरी आपण गेलों तरी त्यांपुढें एक मोठा डोंगर वाटेंत आहे हें लोक व त्यांचे पुढारीहि विसरतात. हिंदच्या लोकसंख्येंत वर्षास सुमारें चाळीस पन्नास लाखांची वाढ होत असते. जास्त अन्न पिकलें तरी हल्लींच्या भुकेलेल्या माणसांची भूक भागुन या नवीन वाढीलाहि तें पुरेल का, असा प्रश्न आहे. नुसतें अमुक अमुक गोष्टी केल्या तर सर्व कार्यभाग होईल असें म्हणणें एका अर्थी बेजबाबदार वृत्तीचें प्रदर्शन आहे.

वर सांगितलेले सर्व उपाय अगदीं पूर्णपणें यशस्वी ठरले म्हणजे आपल्या देशांत अति अन्नधान्य पिकून तें खायला पुरेशीं तोंडें नाहींत अशी एखादे वेळेस स्थिति उत्पन्न होईल ही भीति का आमच्या पुढाऱ्यांस वाटते? हल्लींच्याच लोकांस पुरेसें व शास्त्रीय दृष्टीनें पौष्टिक असें अन्न द्यावयाचें म्हटलें तर आतां होतें त्यापेक्षा सुमारें शेंकडा वीस टक्के तरी जास्त अन्न उत्पन्न झालें पाहिजे; त्यांतच वाढत्या लोकसंख्येची भर लक्षांत घेतली म्हणजे ही भीति अगदीं

निराधार आहे असें दिसून येईल. दुसऱ्या देशांचा असा अनुभव आहे कीं, कांहीं कारणांमुळें अन्नाचा पुरवठा जास्त उपलब्ध झाला तर लगेच लोकसंख्येंतहि त्याप्रमाणानेंच वाढ होते. अठराव्या शतकाच्या शेवटीं इंग्लंडमध्यें लोकसंख्या सुमारें ऐशीं नव्वद लाख असावी असा अजमास तज्ज्ञ लोक करितात. त्यापुढील पन्नास वर्षांत औद्योगिक क्रांति झाल्यामुळें व अमेरिकेंत पुष्कळ नवी जमीन लागवडीस आणली गेल्यामुळें धान्य, मांस वगैरेंची जास्त पैदास झाली; अन्न पदार्थ जास्त मिळूं लागल्याबरोबरच इंग्लंडची लोकसंख्या सुमारें तिपटीनें वाढली. या उदाहरणावरून वरील भीति वाटण्याचें कारण नाहीं. यापुढें वाढीचें प्रमाण इंग्लंडमध्यें कमी होत गेलें त्याचें कारण लोक सुशिक्षित होऊन त्यांस प्रजोत्पादनावर निर्बंध घालून आपली सामाजिक व आर्थिक स्थिति सुधारतां येईल याची खात्री पटली हें. हल्लीं बहुतेक युरोपीय देशांत लोकसंख्येची वाढ याच कारणामुळें फारच कमी प्रमाणांत होत आहे.

### जनन-मृत्यूचें प्रमाण

आपल्या देशांतील नवीन जन्मलेल्या मुलाचें सरासरी आयुष्यमान सुमारें २५।२६ वर्षे आहे. पाश्चिमात्य देशांत तें ५० वर आहे व ऑस्ट्रेलिआ, न्यू झीलंडसारख्या देशांत तें ६५।६७ इतकें आहे. यावरून आपल्यास याबाबींत सुधारणा करण्यास किती वाव आहे हें दिसून येईल. आपल्याकडे जननाचें प्रमाण त्या देशांच्या दुप्पट किंवा त्याहूनहि जास्त आहे व मृत्यूचें प्रमाणहि त्याप्रमाणेंच दिढी दुपटी पर्यंत आहे. हीं दोन्हीं प्रमाणें पुष्कळच कमी झालीं पाहिजेत. आपलें सरकार आरोग्य सुधारण्याचे व मृत्यूचें प्रमाण कमी करण्याचे पुष्कळ उपाय योजण्याचे प्रयत्न करीत आहे. त्यांस जर खरोखर बरेंचसें यश आलें तर मृत्यूंची संख्या कमी होऊन लोकसंख्या आपोआपच वाढेल. जनता जर सुखी, निरोगी व दीर्घायुषी व्हावयास पाहिजे असेल, विशेषतः आपल्या स्त्रियांचें जीवन जर आनंदमय व्हावें असें वाटत असेल तर त्यांच्या मागची सतत गर्भधारण व प्रसूती व सततचा बालकांचा आजार व मृत्यु व त्यांमुळें होणारा शारीरिक व मानसिक त्रास यांची परंपरा कमी झाली पाहिजे. प्रत्येक विवाहित जोडप्यानें दोन किंवा तीन निरोगी, हुषार, उत्साही मुलें उत्पन्न केलीं तर त्यांच्या वरचें स्वदेश ऋण पार पडलें अशी समजूत सर्वभर पसरली पाहिजे. हल्लींच्या काळीं "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" हा आशीर्वाद सुवासिनीला देणें म्हणजे तिला एक प्रकारचा शापच देणें होय. एवढें मोठें कुटुंब पोसणें व त्याची नीट जोपासना करणें लाखांत एखाद्यासच शक्य असेल. साधारण माणसास तें झेंपणार नाहीं.

### ज्ञानाचा प्रसार आवश्यक

संततिनियमनाच्या बाबतींत कायदे करणें शक्य नाहीं हें उघड आहे. परंतु त्या व्यतिरिक्त कांहीं गोष्टी करणें तरी शक्य आहे असें वाटतें. मुख्य गोष्ट म्हणजे या गोष्टीकडे लोकांचें मन वेधणें व त्या बद्दलची जबाबदारी प्रत्येकास पटवून देणें. याविरुद्ध जर कांहीं धार्मिक समजुती असतील तर ह्या कालास लागू नाहींत. नियमनाकरितां नुसते नैतिक निर्बंध फार थोड्यांसच झेंपतील असें वाटतें. ते ज्यांस आचरतां येतील त्यांनीं तसें अवश्य करावें. परंतु याशिवाय वैद्यकीय व इतर साधनेंहि हल्लीं उपलब्ध झालेलीं आहेत. त्यांची माहिती लोकांस मिळण्याची तरतूद सरकारनें व स्थानिक संस्थांनीं इस्पितळांत व दवाखान्यांत अवश्य केली पाहिजे. वैद्य व डॉक्टर लोकांनीं, त्याप्रमाणेंच रुग्णपरिचारिकांनीं संततिनियमनाचें ज्ञान मिळवून आपल्या माहितीच्या मनुष्यांस व विशेषतः स्त्रियांस दिलें पाहिजे.

### नेट धरून धोका दूर केला पाहिजे

प्राचीन रोमच्या इतिहासांत एक गोष्ट आहे कीं रोम व कार्थेज यांच्यामध्यें दोन तुमुल युद्धें होऊन दुसऱ्या युद्धानंतर कार्थेज पूर्ण पादाक्रांत केलें गेलें. परंतु तशा स्थितींतहि तेथल्या रहिवाशांनीं आपला धीर जाऊं न देतां पुन्हां आपला उत्कर्ष करण्याचे कसून प्रयत्न केले व वीस पंचवीस वर्षांनीं त्यांनीं आपलें राज्य पुन्हां बरेंच बलवान् केलें. एकदां रोमचा वृद्ध मुत्सद्दी केटो कांहीं कारणाकरितां तेथें गेला होता तेव्हां त्यानें आपल्या देशास यापासून फार मोठा धोका पुन्हां उत्पन्न झाला आहे, असें ताडलें. तेव्हांपासून तो रोमच्या राजमंडळांत ( सेनेट ) कोणत्याहि विषयावर भाषण करीत असला तरी शेवटीं नेहमीं "आणखी माझें असें ठाम मत आहे कीं, कार्थेजचा पुरा नाश झाला पाहिजे" असें सांगून आपलें भाषण संपवीत असे. कांहीं वर्षांनीं त्याचें म्हणणें ऐकून तिसरें युद्ध झालें व कार्थेज जमीनदोस्त झालें. त्या कार्थेजशीं आपला जरी संबंध नसला तरी केटोप्रमाणें आमच्या मुत्सद्यांनीं हा लोकसंख्येच्या वाढीचा धोका पुरा ओळखला पाहिजे व कोणताहि प्रश्न राष्ट्रापुढें असला तरी त्याचें एक टोंक यीं लोकसंख्येच्या वाढींत गुंतलेलें आहे हें ध्यानांत आणलें पाहिजे. "लोकसंख्येच्या अवास्तव वाढीस आळा बसला पाहिजे" असें भरतवाक्य हल्लींच्या स्थितींत अगदीं योग्य होईल.


## दि बेळगांव बँक लिमिटेड

हेड ऑफीस- बेळगांव

( दक्षिण महाराष्ट्र व मुंबई-कर्नाटक मधील पहिलीच शेड्यूल्ड बँक )

**भांडवल**

| | |
|---|---|
| खपलेलें व वसूल झालेलें शेअर भांडवल | रु. ५,९०,०००/— |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. १,२७,०००/— |
| एकूण ठेवी | रु. ६०,००,०००चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ७६,००,०००चे वर |

**बँकेचीं वैशिष्ट्यें**

१. चोख व काटकसरीची व्यवस्था.
२. ठेवींच्या व्याजाचे आकर्षक दर व सर्व वर्गांना परवडतील अशा नव्या योजना.
३. डिव्हिडंडची शाश्वती.
४. उत्तरोत्तर होणारी समाधानकारक व निश्चित प्रगति.

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार चोख, काळजीपूर्वक व योग्य मोबदल्यांत केले जातात.

**बँकेच्या इतर ठिकाणच्या शाखा**

बेळगांव जिल्हा—संकेश्वर नंदगड अथणी होसूर चिकोडी ठळकवाडी गोकाक निपाणी कँप बैलहोंगल

रत्नागिरी जिल्हा—वेंगुर्ला शिरोडा कणकवली देवगड मालवण चिपळूण सावंतवाडी

धारवाड जिल्हा—धारवाड नरगुंद

विजापूर जिल्हा—रामदुर्ग

कोल्हापूर जिल्हा—गडहिंग्लज

दक्षिण सातारा जिल्हा—मिरज

विशेष माहितीसाठीं लिहा अगर वरीलपैकीं कोणत्याही शाखेंत चौकशी करा.

ह. सी. कुलकर्णी, बी. ए. मॅनेजर

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी. चेअरमन

नूतन वर्ष सर्वांस प्रगतीचें जावो !

# सर्वोदयाकरितां एक प्रायोगिक योजना

## मर्यादित क्षेत्रांत कार्यक्रम आंखा : कांहीं सूचना

लेखकः—प्रा. वि. म. दांडेकर, प्रमुख, शेती-अर्थ शास्त्र विभाग, गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स, पुणें.

मुंबई प्रांतिक सरकारनें युद्धोत्तर पुनर्घटनेच्या कार्यक्रमांपकींच एक म्हणून सर्वोदय योजना या नांवानें एक योजना तयार करून तीवर चार वर्षांत खर्च करण्याकरतां एक कोटी रुपये काढून ठेवले आहेत असें कळतें. या योजनेचें स्वरूप आज जसें स्पष्ट झालें आहे तें असें: योजना एकूण चार वर्षांवर विभागली असल्यानें दरवर्षी पंचवीस लक्ष रुपये खर्च करावयाचे आहेत. प्रांतांत एकूण पंचवीस जिल्हे आहेत. म्हणून एकेका जिल्ह्यावर दरवर्षी एक लक्ष रुपये खर्च करावयाचे. हे रुपये सबंध जिल्ह्यावर खर्च न करतां प्रत्येक जिल्ह्यांत एक तीस ते चाळीस गांवांचा सलग असा टापू निवडून त्यावर खर्च करावेत. यानंतर आतां या निवडलेल्या टापूंत नेमकें काय करावयाचें तें निश्चित ठरलें आहे, असें ऐकिवांत नाहीं. केवळ दरवर्षी एक लाख याप्रमाणें चार वर्षे चार लाख रुपये खर्च करून या निवडलेल्या टापूची सर्वांगिण सुधारणा करावयाची असें ढोकळ मानानेंच ठरलेलें असावें, असें वाटतें.

योजनेचा तपशील निश्चित नसतांना कांहीं खर्च मंजूर करणें हें जरासें सरकारी रतिला सोडून असल्यानें या सर्व योजनेबद्दल कमीजास्त प्रवाद ऐकूं येतात. त्यांतील वस्तुस्थिति म्हणून जी कळते ती अशीः महात्मा गांधींच्या निधनानंतर गांधीवादी कार्यकर्त्यांची एक बैठक श्री. विनोबा भावे यांच्या अध्यक्षतेखालीं एकदां वर्धा आणि पुनः एकदां महू येथें भरून सर्वोदय, सर्वोदय समाज, अशा कांहीं अस्पष्ट कल्पना पुढें मांडण्यांत आल्या. मूलभूत कल्पना अशी कीं महात्मा गांधींच्या तत्त्वप्रणालीचे आधारानें त्यांच्या कार्याचा आणि कल्पनांचा निरंतर प्रसार होत रहावा. याच हेतूस हातभार म्हणून मुंबई सरकारनें एक कोटी रुपये मंजूर केले. पैसेच उपलब्ध झाल्यानंतर मूळ कल्पनेला कांहींतरी निश्चित आणि विधायक स्वरूप देणें प्राप्तच झालें. त्यामुळें वर सांगितल्याप्रमाणें पंचवीस चोक शंभर, या अंकगणितानें सर्वोदय योजनेचा ढोकळ आराखडा तयार झाला.

### निश्चित कल्पनांचा अभाव

सर्वोदय ही कल्पना मुळांत गांधीवाद्यांची आणि गांधीतत्त्वाचा पुरस्कार हाच मूळ हेतू यामुळें सरकारी सर्वोदय योजनाही गांधीवाद्यांच्याच हातीं जाणें हें सहाजिकच होतें. गेल्या मे महिन्यामध्यें कणकवली येथें श्री. अप्पासाहेब पटवर्धन यांच्या आश्रमांत सर्वोदयवाद्यांचें एक संमेलन झालें. त्या सुमारास रत्नागिरी जिल्ह्यांत सर्वोदय योजनेचें क्षेत्र म्हणून कणकवली आणि आसपासचा सुमारें ३६ खेड्यांचा भाग हा निश्चित केला होता. सम्मेलनाचें उद्दिष्ट दुहेरी होतें. एक तर सर्वोदय म्हणजे काय आणि तो कसा करावयाचा यासंबंधीं चर्चा करून कांहीं निश्चित योजना तयार करणें; दुसरें म्हणजे, कणकवली सर्वोदय क्षेत्रांतील सर्वोदय योजनेचा निश्चित कार्यक्रम तयार करणें. दोनतीन दिवसांच्या संमेलनांतून यांपैकीं कोणतेंच उद्दिष्ट सफल झालें असें मला वाटलें नाहीं. नेहमींची सामान्य पद्धतीचीं व्याख्यानें, हिंसा-अहिंसा इत्यादि गोष्टींवर पुष्कळशीं पोरकट आणि निरर्थक चर्चा आणि निश्चित कल्पनांचा सर्वस्वी अभाव एवढेंच निष्पन्न झालें.

सर्वोदय म्हणजे काय आणि तो कसा करावयाचा यासंबंधीं आपल्यापाशीं निश्चित कल्पनांचा किती सर्वस्वी अभाव आहे याची जाणीव कांहीं कार्यकर्त्यांना विशेष तीव्रतेनें झाली. याच जाणीवेचा दुसरा भाग म्हणून कांहीं कार्यकर्त्यांना सरकारी हेतूविषयीं कांहीं शंका आल्या त्याही त्यांनीं बोलून दाखवल्या. मंत्रिमंडळाच्या कार्यावर कॉंग्रेस कार्यकर्त्यांकडूनहि पुष्कळ साधकबाधक टीका होत असते. मंत्रिमंडळानें काय करावयास हवें, यासंबंधीं पुष्कळ कार्यकर्ते नानातऱ्हेच्या सूचना करीत असतात. या सर्वांस उत्तर म्हणून सरकारनें एक कोटी रुपये मंजूर करून आतां तुम्ही काय करून दाखवितां तें पाहूं, असा सवाल कार्यकर्त्यांना टाकलेला आहे आणि कार्यकर्त्यांची निष्क्रियता आणि त्यांच्या कल्पनांचा पोकळपणा सिद्ध करण्याचा हा सरकारी डाव आहे असेंहि कांहींना वाटलें. गांधीवादी गटाबाहेरील जे कांहीं थोडे कार्यकर्ते उपस्थित होते त्यांना शंका आली कीं, ही पुढील निवडणुकीची सिद्धता आहे. कांहींच्या मतें ही केवळ कांहीं गांधीवादी कार्यकर्ते मंडळींची पोटाची सोय आहे, इत्यादि इत्यादि. हें सारें सांगण्याचें प्रयोजन इतकेंच कीं केवळ पैसे निश्चित असलेली एक अनिश्चित योजना एवढेंच या योजनेचें स्वरूप मे-जून पर्यंत होतें हें दाखवावें. त्यानंतरच्या तीन-चार महिन्यांत निरनिराळ्या जिल्ह्यांतून सर्वोदयाचीं क्षेत्रें आणि त्या त्या क्षेत्राचे कार्यसंचालक निश्चित होत आहेत. सर्वोदयाचें कार्य आणि कार्यक्रम निःपक्ष असावेत अशा हेतूनें प्रत्येक जिल्ह्यांत गेलीं अनेक वर्षे ज्याला विधायक म्हणतात असें कार्य निष्ठापूर्वक करीत असलेल्या कार्यकर्त्यांना सर्वोदय योजनांचें कार्यसंचालक म्हणून नेमण्यांत येत आहे. त्यांत बहुतेक गांधीवादीच असले तरी सर्वोदय योजना गांधीवादाधिष्ठितच असावयास पाहिजे असा कटाक्ष आतां राहिला नाहीं. ज्या त्या जिल्ह्यांतील सर्वोदय योजनेचा तपशीलवार कार्यक्रम आंखण्याचें कार्य तेथील कार्यसंचालकावरच सोपविलें आहे असें कळतें.

### क्षेत्र मर्यादित करण्याची आवश्यकता

एकाद्या सर्वोदयक्षेत्राच्या संपूर्ण तपशीलवार योजना तयार झाल्याचें अजून ऐकिवांत नाहीं. कांहीं ठिकाणीं तपशीलवार योजना करण्याकरितां आवश्यक म्हणून सर्वोदयक्षेत्राची आर्थिक आणि सामाजिक पहाणी करण्याचें काम सुरू झालें आहे. हें खूळ एका ठिकाणीं सुरू झालें कीं सऱ्याच ठिकाणीं त्याचा प्रादुर्भाव होण्याचा संभव फार. कारण असल्या पहाणींचा दुसरा कांहीं उपयोग झाला नाहीं तरी निश्चित कार्यक्रम आणि योजना ठरविण्याची जबाबदारी आजची उद्यांवर टाकण्यास मात्र खात्रीनें उपयोग होतो. असल्या पहाणीनंतरहि पिण्याच्या पाण्याची सोय करणें, रस्ते दुरुस्त करणें, अस्पृश्यता, मद्यपान इत्यादि विरुद्ध प्रचार करणें, सहकारी संस्था स्थापन करणें, इत्यादि इत्यादिच कार्यक्रम हातीं घ्यावयाचे असतील तर हा शोध लावण्याकरितां पहाणीची मुळींच जरूरी नाहीं. या सर्व गोष्टी करण्याची आवश्यकता आहे आणि त्या कोणीतरी करण्यास सुरवात केली पाहिजे. सर्वोदययोजकांनीं या कारणांकरितां आर्थिक पहाणी करण्यांत वेळ आणि पैसा खर्च करूं नये.

कोणत्याहि सर्वोदय क्षेत्रासंबंधीं योजना आणि कार्यक्रम ठरवितांना संचालकांनीं एक गोष्ट प्रामुख्यानें ध्यानांत ठेवावयास हवी. ती ही कीं, निरनिराळ्या सरकारी खात्यांमार्फत ग्रामसुधारणेचे जे अनेक कार्यक्रम चालू आहेत तेच पुनः सर्वोदय क्षेत्रांत

# दि बुधगांव बँक लिमिटेड.

**मुख्य कचेरी : बुधगांव.**

जि. दक्षिण सातारा.

शाखाः—माधवनगर व गुडगेरी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १,००,००० |
| खपलेलें भांडवल | " | १,००,००० |
| वसूल भांडवल | " | १,००,००० |
| गंगाजळी व इतर फंडस | " | १,१५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | " | १५,००,००० चे वर. |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

रावबहादूर व्यं. वि. यारगोप, ( अध्यक्ष ) बी. ए., एलएल्. बी.

श्री. के. आ. चौगुले, बी. ए., एलएल्. बी.

श्री. अ. गो. जोग.

श्री. आ. रा. खाडे.

**कायदा सल्लागार**

श्री. पां. रा. खाडीलकर, एम्. ए., एलएल्. बी.

*बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.*

रा. म. गोकावे,
मॅनेजर.



# दि पेण को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड.

**पेण, जि. कुलाबा.**

( सहकारी कायद्यान्वयें स्थापन झालेली )

**स्थापना वर्ष : १९३५.**

| | | |
|---|---|---|
| भागांची संकलित मर्यादा | रु. | ५०,००० |
| खपलेल्या भागांची रक्कम | रु. | ३२,४७५ |
| खेळतें भांडवल | रु. | २,४०,००० |

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

चेअरमनः— श्री. ना. य. नेने, मिठाचे व्यापारी.

ज. म. काळण,
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि कमर्शियल बँक लि.

## –कोल्हापूर–

स्थापना १९३६

हेड ऑफिस—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर

शाखा—( १ ) पापाची तिकटी, कोल्हापूर
( २ ) इचलकरंजी
( ३ ) हुपरी

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | २,६४,८०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,४७,१५० |
| खेळतें भांडवल | रु. | ४०,००,००० |

बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात.

—भेटा अगर लिहा—

बी. डी. मगदूम, अकौंटंट

गणपतराव लक्ष्मणराव साळोखे, मॅनेजिंग डायरेक्टर



करवीर इलाख्यांतील आद्य सहकारी संस्था.

# दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर

( स्थापना १९१३ इ. )

| | |
|---|---|
| एकूण खेळतें भांडवल | रु. ५ लाखावर |
| अधिकृत भांडवल | रु. २ लाख |
| रिझर्व फंड व इतर फंडस् | रु. १,२९,७९६ |

प्रेसिडेंटः—मे. शंकरराव बळवंतराव प्रभावळे

व्हा. प्रेसिडेंटः—मे. आण्णासाहेब आप्पासाहेब शिराळे

**डायरेक्टर्स.**

मे. श्रीपाल तिप्पाण्णा चव्हाण. मे. चिंतामण बाबुराव चौगुले.
मे. अबदुलमजीद महंमद अक्रममोलवी. मे. वसंतराव बळवंतराव बुधले.
मे. नेमगोंडा निगोंडा पाटील. मे. विठ्ठलराव बळवंतराव पोवार.
मे. मुरलीधर नारायण परांडेकर. मे. जयपाल नेमाण्णा आळतेकर.
मे. ज्ञानोबा जोती सासने. ( सरकार नियुक्त ).

**सुपरवायझिंग कौन्सिल.**

चेअरमन मे. अबदुल हमीद आबास मोमीन.

**कौन्सिलर्स.**

मे. गणेश विठ्ठल आपटे. मे. रामचंद्रराव ईश्वरराव गायकवाड.
मे. बाबूराव परशराम फडतारे. मे कल्लाप्पा बाळाप्पा बेळगांवकर.

मुंबई, पुणें बँकांवरील चेक दिले जातात. बाहेर गांवचे चेक्स, हुंड्या, रेल्वे रिसिट्स् वसूल करून दिल्या जातात.

चालू खातेवर, सेव्हिंगवर ठेवी स्वीकारल्या जातात.

आकर्षक दरानें मुदतबंद ठेवी स्वीकारल्या जातात.

ठेवींच्या व्याजाचे दरासंबंधीं विशेष माहितीसाठीं लिहा अगर प्रत्यक्ष भेटा.

के. जी. राणे, मॅनेजर. जी. व्ही. शेवडे, अकौंटंट. शंकरराव बळवंतराव प्रभावळे, प्रेसिडेंट.

दि कोल्हापूर अर्बन को–ऑ. बँक लि.

हातीं घेण्यांत कांहीं विशेष तात्पर्य नाहीं. उदाहरणार्थ, प्राथमिक शिक्षण, पिण्याच्या पाण्याची सोय, दवाखाने, इत्यादि कामें सरकारी खात्यांचीं आहेत आणि तीं सर्व यथावकाश आणि क्रमाक्रमानें खात्यांमार्फत होणें युक्त आहे. दुसरें असें कीं, दरवर्षी एक लक्ष रुपये ही रक्कम दिसायला बरीच मोठी असली, तरी तीस-चाळीस गांवांची सर्वांगीण सुधारणा करून सर्वोदय करण्यास ती फारच अपुरी आहे हेंहि लक्षांत यावयास हवें. एवढा मोठा टापू एकदम हातांत घ्यावयाचा म्हणजे कार्यसंचालक, त्याच्या कार्यालयांतील निदान पांच सात कार्यकर्ते आणि ग्रामसंघटकासारखे कमींत कमी वीस पंचवीस लोक, इतकी तरी मंडळी लागणार. या सर्व कार्यकर्त्यांच्या वेतनासंबंधीं काय व्यवस्था आहे तें मला माहीत नाहीं. परंतु स्वच्छ पगार घेतले काय किंवा भत्ते म्हणून घेतले काय, या मंडळींना पोसण्याचा आणि त्यांच्या प्रवासाचा म्हणून सुमारें पन्नास हजार रुपये खर्च होऊन जाईल असा माझा अंदाज आहे. स्वच्छ पगार आणि भत्ते सरकारी नियमानें घेणें हें अर्थातच रास्त. कारण ते न घेऊन खर्च कमी होतो असा अनुभव नाहीं. फक्त खर्च बेहिशेबी होतो आणि कोणी किती घेतले हें एकमेकांस कळत नाहीं इतकेंच. अशा परिस्थितींत प्रत्येक खेडेगांवाच्या वाट्यास सुमारें दीड ते दोन हजार रुपये येतील. यांतून कांहींहि केलें तरी सर्वोदय होण्याचा संभव नाहीं. दुसरें म्हणजे करावयाचें म्हणजे तरी काय करावयाचें ? दानधर्म, मदत इत्यादि कल्पनेवरच आधारभूत अशा योजना घ्यावयाच्या असतील तर सगळ्यांत सोपी योजना म्हणजे सर्वोदय क्षेत्रांतील सर्व कुटुंबांना पांच पांच, दहा दहा रुपये वांटून टाकणें ही होय. या योजनेचा गुण हा कीं, निदान सर्वच्या सर्व सर्वोदयनिधि तरी ज्यांचा उदय करावयाचा त्यांच्या हातीं पोहोंचेल आणि सर्वोदयनिधिपैकीं निम्मा-अधिक भाग कीं जो कार्यकर्त्यांच्या स्वोदयीं खर्च होतो तो तरी होणार नाहीं.

तात्पर्य हें कीं, माझ्या मतें निधीच्या मानानें निवडलेलीं सर्वोदय क्षेत्रें हीं फार मोठीं आहेत आणि त्यामुळें निधीपैकीं फार मोठा भाग केवळ संघटणेपायींच खर्च होईल आणि प्रत्यक्ष सर्वोदयास इतका थोडा भाग शिल्लक राहील कीं त्यांतून दानधर्मापेक्षां कांहींच करतां येणार नाहीं. पांच वर्षें हां हां म्हणतां निघून जातील, एक कोट रुपये खर्च होतील आणि हातीं मात्र कांहींहि लागणार नाहीं.

अशा परिस्थितींत बिनसरकारी किंवा निमसरकारी कार्यकर्त्यांच्या हातीं एवढी रक्कम आली असतां तिचा विनियोग कसा करावा अशाविषयीं कांहीं सूचना आणि योजना या लेखांत करावयाचें ठरविलें आहे.

### कार्यक्रम प्रयोगात्मक असावा

माझी पहिली सूचना अशी कीं, सर्वोदय योजनेंत जो कांहीं कार्यक्रम घ्यावयाचा तो शक्यतर प्रयोगात्मक स्वरूपाचा असावा. दुसरें असें कीं, सर्वोदय म्हणजे काय यासंबंधीं तात्विक चर्चेंत फार वेळ न घालवितां खेडेगांवांतील जनतेची आर्थिक परिस्थिति सुधारून त्यांचें रहाणीचें मान कसें सुधारावें यासंबंधीं विचार, अभ्यास, योजना आणि प्रयोग एवढ्यापुरतीच सर्वोदय कल्पना संकुचित करावी. यानंतर खालीं दिलेली प्रयोगात्मक योजना स्वेच्छेनें करून बघण्यास तयार असलेलें असें प्रत्येक जिल्ह्यांत एक एक गांव निवडून तेथें हा पंचवार्षिक प्रयोग करून पहावा. सर्वोदयवादी आपापल्या क्षेत्रांत अनेक वर्षें स्वार्थत्यागपूर्वक विधायक कार्य करीत असल्यानें त्यांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रांतील ग्रामीण लोक परमेश्वरतुल्य मानतात असें ऐकतों. तें खरें असेल तर खालील योजना स्वेच्छेनें पांच वर्षें करून बघण्यास निदान एक एक गांव तरी तयार करणें अवघड न व्हावें. म्हणून खटपट करून पहावी. परंतु याप्रमाणें एकहि गांव तयार होत नसेल तर थोडीशी कायद्याची मदत घ्यावी लागेल. ती कमींत कमी घ्यावी. आतां योजना सांगतों.

### सुचविलेली योजना

वर्ष पहिलें:—१. निवडलेल्या गांवांत ज्यांच्या ज्यांच्या मालकीच्या जमिनी आहेत अशा सर्व जमीनदार शेतकऱ्यांचा एक सामुदायिक शेती संघ स्थापन करावा.

२. संघाच्या सर्व सभासदांनीं आपापल्या सर्व जमिनी त्यांतील झाडझुडूप, विहिरी इत्यादि सर्वांसकट संघास पांच वर्षांच्या करारानें खंडानें द्याव्यात.

३. पंच नेमून त्यांनीं प्रत्येक जमिनीचा रोख खंड ठरवावा.

४. यानंतर गांवांतील सर्व जमीन सामुदायिक पद्धतीनें, निवडलेल्या पंचांच्या योजनेनुसार, करावी.

५. संघास आवश्यक असेल तर सरकारनें उत्तम बीं-बियाणें, खत, यंत्रसामुग्री इत्यादि गोष्टी विकत किंवा भाड्यानें देण्याची व्यवस्था करावी.

६. संघास आवश्यक असेल तर सरकारनें शेतकी खात्यामार्फत तांत्रिक सल्ला मोफत द्यावा.

७. निवडलेल्या पंचांच्या आज्ञेनें कामें होत नसल्यास किंवा भांडणें वगैरे जास्त होत असल्यास सरकारनें प्रशासक नेमावे आणि त्यांच्या योजनेनें कामें व्हावींत. प्रशासकाचा खर्च संघावर टाकूं नये.

८. सामुदायिक शेतीचीं सर्व कामें सर्व गांवकऱ्यांनीं मजुरीनें करावयाचीं. ह्यांत संघाचे सभासद आणि इतर असा भेद करावयाचा नाहीं. फक्त कामें अपुरीं असल्यामुळें सर्वांना कामावर घेणें शक्य नसल्यास प्रथम संघाच्या सभासदांस किंवा त्यांच्या कौटुंबियांस संधी मिळेल.

९. दहा वर्षें आणि त्याखालील मुलामुलीला व साठ वर्षांवरील स्त्री-पुरुषांस कामें करतां येणार नाहींत.

१०. पुरूष गडी, स्त्रिया आणि १५ वर्षें आणि त्याखालील मुलें यांचे मजुरीचे दर, तसेंच बैल, नांगर, मोट इत्यादींचीं दिवसाचीं भाडीं ठरवून टाकावींत. उदा. गड्यास दीड रुपया, बाईस आणि मुलास बारा आणे, बैलास दोन रुपये, नांगरास आठ आणे, इत्यादि.

११. ज्या गांवकऱ्यांना काम न देतां आल्यानें त्यांना बेकार स्वस्थ बसावें लागेल त्यांना बेकारी भत्ता मिळावा. उदा. सहा आणे रोज.

१२. याप्रमाणें सर्व वर्षभर शेती करावी.

१३. दहा वर्षेपर्यंतच्या सर्व मुलांना सक्तीनें शाळेंत बसवावें.

१४. वर्षभर पुरेशीं कामें नसल्यानें कांहीं गडी व बाया स्वस्थ बसत असल्यास खालील तीन कामें काढावींत. प्रथम, सामुदायिक धान्याचीं आणि वैरणीचीं कोठारें आणि मग सामुदायिक गोठे.

वर्ष दुसरें:—१. सामुदायिक धान्य आणि वैरणीचीं कोठारें तयार झालीं असल्यास सर्व धान्य आणि वैरण कोठारांत भरावी.

२. गांवाच्या एक वर्षाच्या गरजेपुरतें शिल्लक ठेवून उरत असल्यास धान्याचे भाव नियंत्रित असल्यास सरकारला किंवा भाव अनियंत्रित असल्यास खुला बाजारांत चांगला भाव साधून विकून टाकावें.

३. सामुदायिक कोठारें तयार नसल्यास प्रत्येक गांवकऱ्यास त्याच्या वार्षिक गरजेइतकें विकत द्यावें. ज्याचेजवळ विकत घेण्यास पुरेसा पैसा नसेल त्यास उधार द्यावें.

४. सामुदायिक गोठे तयार झाले असल्यास सर्वांचीं गुरेंढोरें सक्तीनें सामुदायिक गोठ्यांत बांधावींत. प्रत्येक जनावरामागें सामुदायिक गोठ्यांचें भाडें, जनावराचें खाणें इत्यादींकरतां रकमा ठरवून टाकाव्यात.

५. सामुदायिक शेती चालू ठेवावी.

याप्रमाणें पांच वर्षें प्रयोग करावा. गांवकऱ्यांपैकीं ज्यांना हवें त्या सर्वांना कांहींना कांहीं तरी कामें देण्याची व्यवस्था करावी. शक्य तोंवर कोणलाहि बेकारी भत्ता देण्याचा प्रसंग न यावा. या करतां खालील प्रकारचीं कामें काढावींत.

१. शेती सुधारणेचीं कामें—उदा. तळीं, विहिरी इ.

२. खेडेगांवांतलि उद्योगधंद्यांची स्थापना—ज्यायोगें खेडेगांवांत लोकांना अधिक कामें मिळूं लागतील.

या दोन्हीं उत्पन्न वाढण्याच्या बाबी असल्यानें संघाजवळ पैसा असो वा नसो गांवकरी स्वस्थ आणि बेकार असतील तर हीं कामें तावडतोब हातांत घ्यावींत. पांच वर्षांच्या सर्व व्यवहारांत नुकसान आल्यास सर्वोदय निधींतून तें सोसावें.

संघाला सर्व व्यवहार फायदेशीर होत आहे असें दिसल्यास खालील सुधारणाहि हातांत घ्याव्यात. उदाहरणार्थ,

१. गांवचें पाणी आणि इतर आरोग्य यासंबंधीं व्यवस्था.

२. शाळा, वाचनालय इ.

३. सामुदायिक गाई म्हशी ठेवून मुलांना मोफत दूध इ.

रहाणीचें मान वाढविण्याच्या असल्या योजना मात्र संघाचा व्यवहार फायदेशीर होत असल्याशिवाय हातांत घेऊं नयेत. असल्या योजनांकरतां सर्वोदय निधींतून कांहींहि मदत मिळूं नये.

### शक्याशक्यतेची स्पष्ट कल्पना येईल

ही सर्व योजना व्यवस्थित पार पडण्याकरतां संघाची घटना, सभासदत्व इत्यादींसंबंधीं नीट विचारपूर्वक नियम करावे लागतील. त्यासंबंधीं आतांच सविस्तर लिहिण्याचें कारण नाहीं. प्रयोगाकरतां गांव निवडल्यानंतर संघाचा व्यवहार नुकसानींत येऊन एकूण सर्वोदयनिधीवर किती बोजा येईल याचे वार्षिक अंदाज करतां येतील. त्याप्रमाणें अंदाजपत्रकें करून योजना हातांत घ्याव्यात.

दहा–वीस गांवांतून जर पांच वर्षेंपर्यंत अशा योजनांचे प्रयोग केले तर खेडेगांवांतील राहणीचें मान वाढविण्याकरतां काय करावयास हवें; असलेली नैसर्गिक संपत्ति, असलेली पोसावयाची लोकसंख्या आणि शेतकऱ्याच्या कष्टानें उत्पन्न होणाऱ्या पैदाशीला असलेले बाजारभाव यांचा हिशेब करतां राहणीचें मान वाढवून किती वाढवितां येईल, काय शक्य आहे आणि काय शक्य नाहीं यासंबंधीं प्रकाश पडून पुष्कळ कार्यकर्ते आणि इंग्लंड, अमेरिका बघून योजना ठरविणारे नियोजक यांचीं डोकीं साफ होण्यास मदत होईल अशी आशा आहे. खेडेगांवांतील राहणीचें मान वाढविण्यापेक्षांहि या गोष्टीची आज अधिक गरज आहे असें वाटतें.

सर्वोदयवाद्यांनीं या प्रयोगात्मक योजनेचा विचार करावा ही विनंति.

---

### मध्यभारतामधील नगरपालिका

मध्यभारत संघराज्यांतील नगरपालिका असलेल्या गांवांतून पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यासाठी मध्यभारत सरकारनें १० कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. त्यापैकीं २७,६२,००० रुपये ह्या वर्षी खर्च करण्यांत येणार आहेत.


## दि न्यू ओरिएंटल बँक लि.
## कोल्हापूर.

( स्थापना १९२६ )

बँकिंगचा सर्व प्रकारचा व्यवहार करणारी कोल्हापुरांतील आद्य बँकिंग संस्था.

*ठेवी व इतर बँकिंग व्यवहारासाठीं प्रथम चौकशी करा.*

ऑफिस :—
गवळी बिल्डिंग, लक्ष्मी रोड, कोल्हापूर.

बी. बी. पाटील. मॅनेजर. — बी. जी. देवगांवकर. मॅ. डायरेक्टर.

## दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि.
## सोलापूर.

( स्थापना १९२९ )

| | रुपये |
|---|---|
| खपलेलें शेअर भांडवल | ४०,८९०/- |
| रिझर्व्ह फंड | १४,७२३—१-७ |
| इतर फंडस | ९,८७७—९-१ |
| ठेवी | २,४६,८२६-१०-२ |
| एकूण खेळतें भांडवल | ३,२७,६९९—५-० |
| सन १९४८-४९ चा नफा | ५,९८९-१३-६ |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एन्. डो. डंके मॅनेजर. — एस. जी. बंदगूळ प्रेसिडेंट.

## दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस् अ‍ॅण्ड बेरार प्रॉव्हिन्शल् को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

हेड ऑफिस : टिळक पुतळ्याजवळ, नागपूर.
शाखा : सीताबर्डी नागपूर, खामगांव, मलकापूर, चान्दा, बैतूल, इटारसीं, हर्दा, पिपरिया, नरसिंगपूर, जबलपूर, राजनान्दगांव.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत हिस्से भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेले हिस्से भांडवल | रु. | १०,०८,७७० |
| मुख्य गंगाजळी | रु. | ७,८०,७९५ |
| एकूण ठेवींची रक्कम | रु. | १,८०,८५,७१० |
| खेळतें भांडवल | रु. | २,५०,१७,८३६ |
| सरकारी रोख्यांत गुंत. भांडवल | रु. | ७७,४६,४५७ |

सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.
अध्यक्ष व मॅनेजिंग डायरेक्टर.

ठेवी : मुदती, बचती व चालू ठेविल्या जातात.

बँकेचे हिस्से व सरकारनें पूर्ण हमी घेतलेले कर्जरोख्यांची विक्री चालूच आहे.

सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार केले जातात.

गो. आ. भोंसुले, मॅनेजर.

# अन्न धान्याच्या पिकांचा दर्जा व उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न

## मुंबई प्रांतांतील कार्याचा आढावा

लेखक :— प्रा. वि. म. चव्हाण, डेप्युटि डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ( क्रॉप रिसर्च ), पुणें

मुंबई प्रांतांत शेतकी खात्याच्या पीक-संशोधन विभागामार्फत तीन प्रकारचें काम चालू आहे:-( १ ) आधुनिक पद्धतीनें स्थानिक पिकांत उत्पादन व दर्जा ह्या दृष्टीनें सुधारणा घडवून आणणें, ( २ ) खतें, अंतर, पेरणीची वेळ, नांगरट, इत्यादि कोणत्या प्रमाणांत असलीं म्हणजे पीक सर्वांत चांगलें येतें, त्याचे प्रयोग करणें, आणि ( ३ ) खाद्यधान्यें, डाळी व गळिताचीं धान्यें ह्यांच्या सुधारलेल्या जातींचें बीं तयार करणें. सध्या खालील पिकांवर प्रयोग चालू आहेत:—

खाद्य धान्यें:—ज्वारी, बाजरी, गहूं, तांदूळ व नाचणी आणि वरी, कोद्रा ( हरीख ), राळा, इत्यादि दुय्यम दर्जाचीं धान्यें.

पीक सुधारण्याचा मुख्य उद्देश त्याचें उत्पादन वाढविणें व दर्जा सुधारणें हा असतो प्रत्येक पिकास अनुषंगिक असे इतरहि उद्देश असतात. उदाहरणार्थ:—

खाद्य धान्यें:—थोड्या पाण्यावर वाढणें, लवकर धान्यें पिकणें, जमिनींतील क्षारांस तोंड देणें, रोगांचा व कीटकांचा प्रतिबंध करणें, साठवणींत टिकणें, धान्य व कडबा ह्यांचा कस वाढविणें इ.

डाळी:—प्रथिनाचें प्रमाण वाढविणें.

गळिताचीं धान्यें:—तेलाचें प्रमाण वाढविणें, तेल लवकर वाळणें, रंगहीन तेल मिळवणें.

डाळी:—हरबरा, तूर, उडीद, मूग, मटकी, कुळीथ ( हुलगे ), वाटाणे, वाल आणि इतर कडधान्यें.

गळिताचीं धान्यें:—भुइमूग, करडई, जवस, तीळ, कारळे व एरंडी.

मुळ्या व इतर:—रताळीं, बटाटे, कांदे व मिरच्या.

पिकांच्या जाती सुधारून त्या शेतींत यशस्वी करण्याचें काम आपल्या प्रांतांत चालू शतकाच्या प्रारंभापासून सुरू आहे. १९४२ सालीं शेतकी खात्यांत स्वतंत्र पीक संशोधन भाग निर्माण करण्यांत आला. सर्व पिकांत कपाशीच्या पिकावर प्रथम संशोधन सुरू झालें.

> **अकरणात् करणविलम्बः श्रेयान् ।**
>
> "अधिक धान्य पिकवा" मोहिमेंत पिकांच्या संशोधनास व त्याप्रीत्यर्थ कराव्या लागणाऱ्या प्रयोगांस फार महत्त्वाचें स्थान आहे; कारण, चांगल्या जातींचें व गुणांचें बीं फारच उपकारक ठरतें. अर्थात्, हें संशोधन तात्काळ दृश्य फळ देऊं शकत नाहीं. रासायनिक प्रयोगाप्रमाणें हे प्रयोग झटपट आवरतां येत नाहींत; पिकांच्या वाढीस लागणारा काळ हा प्रयोगांची गति नियंत्रित करतो. परंतु एकदां प्रयोग यशस्वी झाले कीं, त्यामुळें निर्माण होणारें बीं सर्वत्र पसरून व्यापक उत्पादन सुरू करतां येतें. प्रस्तुत लेखांत प्रा. चव्हाण ह्या तज्ज्ञांनीं मुंबई प्रांतांतील संशोधनाची थोडक्यांत व सोप्या शब्दांत रूपरेषा दिली आहे. इतकीं वर्षें सर्व प्रांतिक सरकारांनीं इंग्रजांच्या हितास पोषक अशा कपाशीसारख्या पिकांकडेच लक्ष पुरविलें, त्याऐवजी अन्नधान्याकडे लक्ष दिलें असतें तर धान्योत्पादनाचा प्रश्न बिकट झालाहि नसता !

हें सर्व साधण्यासाठी अनेकविध आधुनिक उपाय योजावे लागतात. ( १ ) ज्या ठिकाणीं पिकाची मोठ्या प्रमाणावर लागवड होते त्यांची पहाणी करणें. ( २ ) त्यांतील बियांचें व बियाणांचे नमुने जमा करणें. ( ३ ) व्यक्तिगत झाडांची निवड करणें. ( ४ ) इतर प्रांतांतील व देशांतील पिकांचे नमुने मिळतील तेवढे मागविणें. ( ५ ) ह्या नमुन्यांची लावगड करून त्यांतील चांगले गुण उचलण्याचा प्रयत्न करणें. ( ६ ) स्थानिक चांगल्या गुणांची त्यांच्या चांगल्या गुणांत भर घालण्याचा यत्न करणें, आणि त्यांतून नवें अधिक गुणवान बीं तयार करणें. ( ७ ) रानटी पिकांतून कांहीं निवडक गुण ( उदाहरणार्थ, रोगराईस टक्कर देण्याचें सामर्थ्य ) आढळल्यास ते स्थानिक पिकांत उतरविणें. ( ८ ) अशा रीतीनें केलेल्या बियांचें मोठ्या प्रमाणावर प्रयोग करणें. ( ९ ) त्यांतून यशस्वी वाटणाऱ्या बियांचे जिल्हावार प्रयोग करणें. ( १० ) ज्या-त्या प्रदेशास योग्य असें बीं उत्पादन करणें. ह्या संबंधांत येणारे कित्येक प्रश्न सोडविण्यासाठी प्लँट पॅथॉलॉजिस्टचें सहकार्य घेण्यांत येतें व प्रयोगांचा पिच्छा पुरवून उत्कृष्ट बीं निर्माण करण्याचा सतत प्रयत्न केला जातो. ह्या पद्धतीनें, गव्हाच्या बियांच्या बाबतींत फारच समाधानकारक सुधारणा झालेली आहे. खतें, अंतर, पेरणी, पेरण्याची वेळ, इत्यादि प्रत्यक्ष लागवडीबाबत प्रयोग ॲग्रॉनॉमिक कमिटीच्या देखरेखखालीं चालू आहेत, ते वेगळेच. परदेशी व रानटी बियांपैकी कोणतें बीं स्थानिक बियांशीं संकरणास उपयोगी पडण्याजोगें आहे, आणि त्यांतून उत्पादनाची वाढ कशी घडवून आणतां येईल हाचेहि प्रयोग शेतकी खात्यातर्फे चालू आहेत. पिकांना किती कसाचें खत लागतें, ह्याचा अभ्यास पण सतत

त्यानंतर तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, इत्यादींवरही संशोधनास प्रारंभ झाला. शेतकी खात्यांतील संशोधकांनीं ह्या संबंधांत मेहेनत घेऊन सुधारलेल्या जाती उपलब्ध करून दिल्या आहेत, त्यांत १९४२ सालीं निर्माण केलेलें स्वतंत्र पीक संशोधन खातें महत्वाची भर घालीत आहे. पिकें यशस्वी करण्याचे कामीं खतांचे प्रयोग करण्यांत आले होते आणि करण्यांत येत आहेत. त्यांत आलेल्या अनुभवास अनुसरून, शेतकी खात्यानें कांहीं विशिष्ट पद्धतींचा पुरस्कार वेगवेगळीं पत्रकें काढून वेळोवेळ केला आहे. १९४२ सालानंतर प्रयोगांचें व संशोधनाचें कार्य डेप्युटि डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ( पीक व संशोधन ) ह्यांच्या एकसूत्री नियंत्रणाखालीं आलेलें आहे. कपास, तंबाखू व भाजीपाला ह्यांचेसंबंधीं संशोधन-कार्य कॉटन बोटॅनिस्ट, सुरत, ह्यांचेकडे सोपविलेलें आहे. शेतकी खात्याचे डायरेक्टर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक क्रॉप ब्रीडिंग अँड ॲग्रॉनॉमिक कमिटी वरील सर्व प्रयोगांवर देखरेख करण्याचें व त्यांचा आढावा घेण्याचें काम करीत असते, तिचे डे. डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ( पीक व संशोधन ) हे चिटणीस आहेत.

चालू असतो. अन्नधान्यांचा सकसपणा, गळिताच्या धान्यांचा तलकटपणा, शेतांतील व साठवणींतील धान्याचे सजीव शत्रू, हरळीसारख्या दुर्दम्य तणांचा नाश, जमिनींची रासायनिक पहाणी, हवामान व पिकांची वाढ ह्यांचेमधील संबंधाची पहाणी, इत्यादि बाबतहि शेतकी खातें संशोधन व पहाणी करीत असतें.

**मुंबई प्रांतांतील अन्नधान्यविषयक प्रयोगाचीं केंद्रें व त्यांत चालणारें काम**

गुजरातमध्यें ७, डेक्कनमध्यें १२, कर्नाटकांत ८ आणि कोकणांत ९ अशा एकूण ३६ फार्मवर अन्नधान्यविषयक संशोधन कार्य चालू आहे. त्यांपैकी महाराष्ट्रांतील व कोकणांतील संशोधनाचा तपशील येथें दिला आहे. विलीन संस्थानी मुलुखांतील केंद्रांचा त्यांत समावेश केलेला नाहीं. मुंबई प्रांतांतील संशोधन केंद्रांची गेल्या तीन वर्षांतच विशेष वाढ झालेली आह.

| ठिकाण | कोणत्या पिकावर संशोधन चालू. |
|---|---|
| वडगांव ( पुणें ) | तांदूळ, नाचणी |
| इगतपुरी ( नाशिक ) | तांदूळ, नाचणी, वरी, कडधान्यें. |
| निफाड ( नाशिक ) | बाजरी, गहूं, राळा, तूर, हरबरा, कारळे, तीळ, जवस, करडी, कांदे. |
| जळगांव ( पू. खानदेश ) | ज्वारी, मूग, उडीद, भुइमूग, कपास. |
| नवापूर ( प. खानदेश ) | तांदूळ, कोद्रा ( हरीक ). |
| शहादें ( प. खानदेश ) | ज्वारी, गहू, उडीद, कुळ बरा तीळ, भुइमूग. |
| पुणतांबें ( अहमदनगर ) | बाजरी, ज्वारी, हरबरा, तीळ, कारळे. |
| कोपरगांव ( अहमदनगर ) | ऊंस. |
| पाडेगांव ( सातारा ) | तांदूळ, गहूं, ज्वारी, कांदे, बटाटे. |
| कऱ्हाड ( सातारा ) | ज्वारी, बाजरी, उडीद, मटकी, हरबरा, भुइमूग. |
| माहोळ ( सोलापूर ) | ज्वारी, भुइमूग. |
| खेड ( पुणें ) | बटाटे. |
| कर्जत ( कुलाबा ) | तांदूळ, वाल, नाचणी. |
| पनवेल ( कुलाबा ) | खाऱ्या जमिनींत येणारा तांदूळ. |
| रत्नागिरी ( रत्नागिरी ) | तांदूळ. |
| फोंडा घाट ( रत्नागिरी ) | तांदूळ. |
| चिपळूण ( रत्नागिरी ) | तांदूळ. |
| हातखंबा ( रत्नागिरी ) | नाचणी, वरी, कोद्रा ( हरीक ). |
| कुमठा ( कारवार ) | तांदूळ. |
| कुमठा ( कारवार ) | खाऱ्या जमिनींत येणारा तांदूळ. |
| जगलबेट ( कारवार ) | तांदूळ, नाचणी. |

**इंग्लंडमधील सुवर्णाच्या सांठ्याला गळती**

ब्रिटिश सरकार आपल्या डॉलर्सच्या आणि सुवर्णाच्या सांठ्यांत झालेली घट लवकरच जाहीर करील, असें कळतें. हा सांठा आतां ३० कोटी पौंडाच्याही खालीं घसरला आहे अशी वार्ता आहे. अर्जेंटायना देशानें आपल्या चलनाचें अवमूल्यन केल्यामुळें त्या देशाकडून मिळणाऱ्या मांसाच्या किंमती वाढल्या आहेत. त्यासंबंधीं ब्रिटिश सरकार विचार करीत आहे.

**पाकिस्तानचा चहा कसा परवडणार ?**

पाकिस्ताननें आपल्या रुपयाची किंमत कमी केलेली नाहीं. त्यामुळें आणि दर पौंडावर ८ आणे निर्यात कर बसविण्याच्या पाकिस्तानच्या निर्णयामुळें ब्रिटनचें अन्नखातें पाकिस्तानकडून घ्यावयाच्या चहांत कपात करणार आहे. पाकिस्तानऐवजीं भारताकडून इंग्लंड अधिक चहा घेण्याचा संभव आहे.




( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

दि मिरज स्टेट बँक लि.

–मिरज–

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.
के. डी. शिराळकर मॅनेजर

# गुंतविणारावरील अरिष्ट

## शृंगापत्तींतून मार्ग कसा काढणार ?

लेखकः—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम., पुणें.

१९४७ च्या लिथकत अंदाजपत्रकापासून गुंतविणाराच्या दुर्दशेस सुरवात झाली ती आजतागायत. या अडीच वर्षांच्या काळांत मार देण्याकरता जसा कांहीं निवडून काढलेला असेल तर तो विशेषतः गुंतविणारा मध्यमवर्ग. भांडवलवाला वर्ग पुंजीच्या जोरावर तग धरूं शकतो. मजूर वर्ग संपाच्या शस्त्राचा मुबलक उपयोग करून स्वतःची तोंडमिळवणी करूं शकतो पण कंपन्यांच्या डिव्हिडंड वारंटकडे डोळे लावून बसणारा मध्यम वर्ग ( याला सुद्धा भाई लोक भांडवलवाला म्हणतात ) याला त्राता कोण ? अजापुत्रं बलिं दद्यात् देवो दुर्बल घातकः। कारखानदारीस लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतींत सरसकट वाढ चालू आहे, उत्पादनास लागणारा पक्का परदेशी माल महाग, त्याचा खर्च कमी करणें कारखानदाराच्या ताब्यांत नाहीं, मजुरी कमी करणें शक्य नाहीं, मग किंमती वाढवा, सरकारला धान्य आयात करावयाचें आहे, व्यवस्था खर्च मोठा आहे, लष्करी खर्च कमी करणें शक्य नाहीं आणि निर्वासित पाहुण्यांची सोय लावणें प्रथम जरूर आहे, मग तुटीचें अंदाजपत्रक टाळायचें कसें ? बसवा नवे नवे कर, जुने कमी करण्याची गोष्टच लांब. मध्यवर्ती सरकारची ही स्थिति असतांना प्रांतांच्या बद्दल बोलावयासच नको. दारूबंदीपासून उत्पन्नांत माठाच खड्डा पडला आहे आणि तो पुढील वर्षापासून वाढतच जाणार आहे. दारूबंदीच्या दुष्परिणामापासून बांधवांना वांचवण्याकरतां आम जनतेला घस सोसणें जरूर आहे. सर्व जनता सुशिक्षित करावयाची आणि अशीच सर्वांगीण सर्वोदयात्मक योजना करावयाची आणि पुढच्या पाच-पन्नास पिढ्यांच्या सुखाची आतांच तजवीज करून ठेवावयाची, तर आतांच जनतेनें स्वार्थत्यागपूर्वक सरकारला जास्त जास्त कर स्वखुषीनें देणें जरूर आहे. तेव्हां स्थावरावरील कर, विक्रीकर, वगैरे याद्या लांबतच चालल्या आहेत. या सगळ्या घेणेकऱ्यांची आपल्या तुटपुंज्या उत्पन्नांतून भरती करून मग देशाच्या औद्योगिक उत्कर्षाला हातभार लावण्याचें कर्तव्य बजावण्याकरता बचत करून कंपन्यांच्या भांडवल उभारणीस शेअर घेऊन मदत करावयाची. बचत करण्यावर विशेष कटाक्ष असणाऱ्या मध्यमवर्गाच्या दुर्दशेचें यापेक्षां जास्त शब्दांत वर्णन करून सांगण्याची जरूरी नाहीं. जखमेवर मीठ चोळण्याकरतांच कीं काय, नुकतेंच गव्हर्नर जनरल श्री. चक्रवर्ती राजाजी यांनीं मध्यमवर्गाला डोक्यानें काम करण्याचें सोडून हातानें काम करण्याचा आदेश दिला आहे. देशाची संस्कृति, बौद्धिक पातळीचें स्थिरत्व, तसेंच देशाचें आणि समाजाचें नेतृत्व या आदेशाने कसाला लागणार आहे यांत शंका नाहीं.

### मध्यम वर्गाकडे कोण लक्ष देणार ?

परीस्थिति आणि ध्येय यांच्या कचाट्यांत सांपडलेल्या सरकारच्या हातून यापेक्षां जास्त अपेक्षा गुंतविणारानें न करणेंच श्रेयस्कर. इतकेंच नव्हे तर, गुंतविणाराला आपला गुंतविण्याबाबतचा दृष्टिकोनही पूर्णपणें बदलावा लागणार आहे. आतापर्यंतची गुंतविणाराची कल्पना अशी कीं; आपण चालू उत्पन्नांतून खर्चाची काटकसरीनें तरतूद करून दोन पैसे उतार वयांत व मुलाबाळांच्या उपयोगाकरतां मार्गे टाकतांना औद्योगिक प्रगतीला हातभार लावून स्वार्थ आणि परमार्थ दोन्हींही साधीत होतों. अर्थवेत्ते हेहि याच समजुतीला पाठिंबा देत आले. "जेवढी बचत कराल तेवढें तुमचें उत्पादन वाढेल." पण यापुढें या कल्पनेला धक्का मिळणार आहे. उद्योगधंदा, कारखाना, हे भांडवलवाला ( ? ) म्हणजे बचत करणारा हा चालवत नसून ते केवळ मजुरांच्या श्रमामुळें चालणार आहेत. आजपर्यंत भांडवलवाल्यांनीं पुष्कळ नफा मिळवला आहे. साठे तुंबून राहिल्यानें ते टाळेबंदी करूं पाहतात हें साफ खोटें आहे. किंमती कमी केल्यानंतर सांठा केव्हांच खलास होऊं शकतो हें सामान्य तत्त्व सुद्धां सरकारला किंवा कारखानदारांना कळत नाहीं हें कसें खरें असेल ? भांडवलवाल्यांना आपला नफा कायम पाहिजे म्हणून किंमती कमी नकोत; केवळ मजूर आपला बोनस सोडावयास तयार नाहींत म्हणून किंमती कमी करता येत नाहींत हा शुद्ध कांगावा आहे. बिचारें सरकार ! सरकारी मालकीचे कारखाने आज करता येत नाहींत मग भांडवलवाल्यांना ते चालवूं देणेंच जरूर. त्यांचेंही थोडें ऐकलें पाहिजे. मजूरवर्गाला महागाईच्या मानानें मजुरी, बोनस वगैरे तर दिलेंच पाहिजे. त्याशिवाय ते काम करणार नाहींत, संपावर जातील व सर्व गाडाच थांबून पडेल. तेव्हां मजुरांचेंही ऐकलें पाहिजे. शेतकऱ्याला सुखी करण्याकरता त्याच्या मालाला चढत्या किंमती यायलाच हव्यात. त्याच्या धान्य खरेदीची तरतूद करण्याकरता जास्त पैसा पाहिजे. तेव्हां करही वाढवले पाहिजेत. तें न करावें, त्याला संरक्षण न यावें तर कदाचित ज्यांनीं आतांपर्यंत स्वातंत्र्ययुद्धास हातभार लावला, आज सत्ताधिष्ठित करण्यास मतें दिलीं, त्यांची पुढच्या खेपेस सहानुभूति गमावून बसावें लागेल. या शृंगापत्तींतून मार्ग काढणार कसा ? हे इतके महत्वाचे प्रश्न समोर असता गुंतविणाऱ्याच्या डिव्हिडंड वारंटकडे लक्ष देण्याला कोणाला फुरसत असणें शक्य नाहीं. उद्या त्याच्या हातांत वारंटाऐवजी कोरा कागद पोस्टानें आला तर नवल नाहीं.

### सावधान !

काळ बदलतो आहे, जुनीं तत्त्वें मागें पडून नवीं तत्त्वें दंड थोपटून पुढें येत आहेत. युक्तिवाद हा ध्येयसाधनाचा मार्ग न राहून प्रतिपक्षाला पेचांत टाकणारा सत्याग्रह हाच ईप्सिताचा मार्ग रहाणार आहे. व्यक्तिगत बचतीला महत्त्व कमी कमी होत जाऊन सरकारी अर्थात् सार्वदेशिक सरकारनियंत्रित बचतीला महत्त्व येणार आहे. बचत हवी आहेच, कारण त्या शिवाय उद्योगनिर्मिती आणि प्रगति होणेंच अशक्य. भांडवली अर्थशास्त्राच्या नांवानें कितीहि बोटें मोडलीं तरी हें प्रमेय कांहीं चुकवता येत नाहीं. पण बचत कोणी करावी हें तरी सत्तेच्या जोरावर सांगता येतेंच कीं नाहीं ? तेव्हां व्यक्तिशः गुंतविणारांनो सावधान ! तुमच्या तिजोरींत ठेवलेल्या शेअरच्या भावांकडे लक्ष ठेवण्याऐवजीं उद्या कोणचा राजकीय पक्ष सत्तारूढ होत आहे इकडे लक्ष ठेवा आणि श्री. राजाजींनीं दिलेल्या आदेशाची कास धरून हातानें काम करण्याचें शिक्षण सुरू करा !

# धी बँक ऑफ सिटिझन्स लि.

स्थापना १९२७

मुख्य कचेरी : १५१४ मारुती गल्ली, बेळगांव.

शाखा : बेळगांव, धारवाड, विजापूर व कारवार जिल्ह्यांतील मुख्य ठिकाणीं.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | ७,००,००० रु. |
| भरलेलें भांडवल | ३,४७,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० रु. |
| खेळतें भांडवल | ३६,००,००० रु. |

जनरल मॅनेजर.

बँक ऑफ सिटिझन्स लि.

बेळगांव.



# वडिल भाऊ.

आपल्याला अडीअडचण आली तर आपला पाठीराखा वडील भाऊ आहे ही गोष्ट बहिणीला व भावाला नेहमींच निश्चिंतता आणि धैर्य प्राप्त करून देते. 'सह्याद्रि' चा विमा हाही आपला वडील भाऊच आहे. त्याचें अस्तित्व नेहमींच धैर्यदायक असतें व दिवाळीसारख्या सणावारीं आपला आनंद तो द्विगुणित करतो. एक कार्ड टाका अगर आमच्या सर्वत्र असलेल्या एजंटांपैकीं कोणालाही भेटा. सर्व माहिती आपल्याला मिळेल.

## दि सह्याद्रि विमा कं. लि.,

नासिक.

गो. ग. सौंदणकर,

मॅनेजिंग डायरेक्टर.



नगर जिल्ह्याची सर्वांत जुनी सहकारी बँक, म्हणजेच

## दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को. बँक लि., अहमदनगर

स्थापना सन १९१०

हेड ऑफिसः—अहमदनगर शहर

शाखा—१ संगमनेर (जि. नगर) २ भिंगार (ता. नगर)

३ बेलापूर रोड—श्रीरामपूर (जि. नगर)

४ वांबोरी (जि. नगर)

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ४,००,००० |
| (२) | भरलेलें भांडवल ... | रु. | ३,४५,५०० |
| (३) | रिझर्व्ह फंड ... | रु. | २,४२,१२७ |
| (४) | इतर फंड ... | रु. | १,७१,६४७ |
| (५) | चालू ठेवी ... | रु. | ३६,८२,०९० |
| (६) | सेव्हिंग्ज ठेवी ... | रु. | ८,४७,३८४ |
| (७) | मुदत ठेवी ... | रु. | १३,१५,४८१ |
| (८) | खेळतें भांडवल ... | रु. | ६६,३५,७५६ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक, हुंडी, सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री, वगैरेचा सर्व व्यवहार केला जातो.

या जिल्ह्यांत सर्व किरकोळ कापड दुकानदारांना बँकेतर्फे कापड पुरविलें जातें.

दागदागिने, मौल्यवान वस्तू व कागदपत्र सुरक्षित ठेवणेसाठीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची व्यवस्था या बँकेंतच आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा. जास्त माहितीकरतां हेड ऑफिस अगर शाखा कचेर्‍यांकडे लिहा.

तारीख ६ ऑक्टोबर, १९४९. मो. कुं. फिरोदिया, चेअरमन



सुरक्षितता व समाधान हाच सुखाचा व आनंदाचा आधार !

मोटार विम्याबाबत हा आधार म्हणजेच कर्नाटक-महाराष्ट्रांतील अग्रगण्य मोटार विमा कंपनी.

# दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शु. कं. लि.

या कंपनींतच आपल्या मोटारीचा विश्वासानें विमा उतरून

- ★ प्रीमियमचे दर अत्यंत माफक.
- ★ तिमाही हप्त्यानें प्रीमियम घेण्याची सोय.
- ★ गाडी बंद असल्यास विमा तहकुबीची सवलत.
- ★ मोटार विम्याबाबत इतर अपूर्व सवलती व सल्ला.
- ★ सर्व प्रकारच्या गाड्यांना संपूर्ण विम्याचा (कॉम्प्रिहेन्सिव्ह रिस्क) स्वीकार.
- ★ मोटार धंद्यांतील तज्ज्ञांच्या देखरेखीखालील चोख व काटकसरीची व्यवस्था.
- ★ समाधानकारक नुकसान भरपाई, वगैरे

**अनेक फायद्याचे वांटेकरी व्हा.**

*अधिक माहितीसाठीं लिहा अगर भेटा.*

मुख्य कचेरी : फोर्ट रोड, बेळगांव.

| शाखा : | शाखा : |
|---|---|
| ९७४, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २. | पोवार बिल्डिंग, शिवाजी रोड, बिन्दु चौकाजवळ, कोल्हापूर. |

*ही दिवाळी आमच्या अनेक विमेदारांस, प्रतिनिधींस व हितचिंतकांस आनंदाची जावो.*

# उत्पादनाचा मजबूत व टिकाऊ पाया

( लेखक:—श्री. शंकर ज. जोशी, बी. कॉम., त्रावणकोर ओगले ग्लास कंपनी, अलुवाये ( द. भारत ).

उत्पादन ही एक मानसिक अवस्था आहे. प्रत्यक्ष उत्पादन-कार्यांत गुंतलेल्या मंडळींनीं मनांत आणलें तर तें टिकतें, वाढतें, नाहीं तर पडतें ! जुनाट यंत्रांवर अपुऱ्या हातांनीं काम करून उत्पादनाचे अन् निर्गतीचे प्रत्यही नवीन उच्चांक गांठणाऱ्या इंग्लंडच्या अनुभवांवरून हेंच नाहीं का दिसत ?

### यंत्रसाधनें

दोनच दोन हातांनीं होणाऱ्या कामास आपोआपच मर्यादा पडतात. हाताला यंत्राची जोड मिळाली कीं काम किती तरी अधिक होतें. यंत्रसाहाय्यानें शेती केली तरी ती संपूर्ण यांत्रिक होऊं शकत नाहीं; त्याला हातांची जोड लागतेच. म्हणूनच, मला वाटतें, अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांतहि दर माणशी शेतकी उत्पादन औद्योगिक उत्पादनाचे मानानें कमी पडतें.

अनेक कारणांनीं आज आपल्याला नवीन यंत्रें मिळणें कठीण होत आहे. म्हणून त्यांविना काय करतां येईल याचाच विचार आपण केलेला बरा.

देशांतील यांत्रिक उत्पादनशक्ति व प्रत्यक्ष उत्पादन यांचे आंकडे तपासले असतां असें दिसून येईल कीं, हातीं असलेल्या यंत्रांचे सहाय्यानें उत्पादनांत ३०–४० टक्के वाढ होणें अगदी शक्य आहे.

### कामाची गति

अद्यावत् यंत्रें आपल्या हातीं दिल्यानें इतरांच्या बरोबरीनें आपल्या कामांचे ढीग लागतील असें नाहीं. इतर ठिकाणचा अनुभव तसा नाहीं. अमेरिकन कारखानदारांनीं युरोपांत आपले कारखाने सुरू केले. अमेरिकन तज्ज्ञ, अमेरिकन पद्धत, अमेरिकन यंत्रें, सर्व कांहीं अमेरिकन. तथापि प्रत्यक्ष अनुभव असा कीं, युरोपिअन कामगाराचे हातून अमेरिकन कामगाराचे बरोबरीनें काम होत नाहीं. त्याचीं कारणें कामगार संघटनेच्या पद्धती, धोरण व कामगारांची त्याबाबतची निष्ठा, स्थानिक रीति–रिवाज, अशीं अनेक आहेत.

उलट, युरोपिअन कारखानदारांना त्यांच्या अमेरिकेंतील कारखान्यांत असा अनुभव आला कीं अपेक्षेबाहेर काम झालें. अधिक कार्यक्षम अमेरिकन कामगारानें युरोपिअन व्यवस्थेखालीं काम करूनही अधिक उत्पादन केलें.

येथें सांगावयाचें एवढेंच कीं, यंत्रसाहाय्य दिलें तरी त्यांवर माणसांनींच कामें करावयाचीं असतात अन् कामाची गति निरनिराळ्या देशांत स्थानिक परिस्थितीनुसार निरनिराळी असते.

### अधिक वेतन : अधिक काम ?

ज्या प्रमाणांत अधिक वेतन दिलें त्या प्रमाणांत अधिक काम मिळत नाहीं हा सर्वांचाच अनुभव आहे. आपण होऊन अधिक वेतन दिल्यास साधारणतः प्रथम कांहीं काळ सुधारणा दिसते, नाहीं असें नाहीं. परंतु कालान्तरानें, मिळालेलें अधिक वेतन ‘ हक्काचें ’ होतें अन् कामांतील सुधारणा अल्पकालीनच ठरते !

कामगाराला वेतन काय मिळतें यापेक्षां त्याला मिळणाऱ्या वेतनांतून त्याच्या गरजा कितपत व कशा भागतात हा महत्त्वाचा प्रश्न असतो. तोच त्याचा ‘खरा’ पगार. ज्या देशांत ‘खरें’ वेतन अधिक तेथील कामगाराची कामाची गति अधिक असा अनुभव आहे.

याबाबत वैयक्तिक प्रयत्न कधीच पुरे पडणार नाहींत हें येथें नमूद करून ठेवलेलें बरें.

### कामगार आणि वेतन

कामगार काम चांगलें अगर वाईट, जलद अथवा हळू करतो तें त्याला मिळणाऱ्या वेतनावर अवलंबून नसून त्याला त्याबाबत काय वाटतें ह्यावर ! युनिअन अधिकारी, स्थानिक पुढारी व इतर मंडळी यांच्या मतांचा त्याच्यावर अर्थात् पुष्कळच परिणाम होत असतो.

एखाद्या कारखान्यांत किंवा एखाद्या भागांतील सर्व कारखान्यांत “ तुम्हाला वाईट रीतीनें वागविण्यांत येत आहे; तुम्हाला न्याय्य तें मिळत नाहीं, ” ( मग तें खरें असो वा नसो ) असें या मंडळींनीं कामगाराला सांगितलें अन् तें त्याला पटल्यासारखें झालें म्हणजे तो असुखी होतो अन् मग त्याचे हातून काम कमी कमी होऊं लागतें. राष्ट्रांतील किती तरी संपत्ति या मार्गानें पदरीं पडूं शकत नाहीं.

### कामगार आणि स्वदेशाभिमान

उत्पादन–अधिकारी अनुभवी असतील, सहानुभूतीचे असतील, कामगारांना अडीअडचणींत मदत करणारे असतील तर उत्पादन अधिक व चांगलें निघतें. अन् याचे जोडीला कामगार स्वदेशाभिमानानें भारावलेले असतील तर काम किती तरी पटींनें अधिक होतें. अमेरिका, जर्मनी, जपानमध्यें असा अनुभव आहे.

### उद्योगपति आणि नफा

धंदा करावयाचा तो पैसा मिळविण्यासाठीं—नफ्यासाठीं. नफा झाला तर धंदा जगतो-वाढतो. तोटा खाल्ला तर तो बुडतो. उद्योगधंद्यांची कार्यक्षमता सर्वसाधारण सर्वत्र सारखीच असते. सर्व देशांत सर्व धंद्यांत हीच स्थिति असते. औद्योगिक कार्यक्षमता परिस्थितिसापेक्ष असते. जितका नेट लावावा, उत्तेजन द्यावें, तेवढी कार्यक्षमता अधिक वाढूं शकते.

आपल्या देशांतील उद्योगधंदे अधिकाधिक कार्यक्षम होऊन तयार वस्तूंच्या किंमती स्वस्त, अधिक स्वस्त, कशा होतील याचा विचार करून, त्याप्रमाणें धोरण आंखणें हें प्रत्येक सरकारचें कर्तव्यच आहे. हें करतांना देशाला कमीत कमी तोशीस लागेल इकडेही लक्ष देणें जरूरीचें असतें.

### सरकारी कर आकारणी

जपानमध्यें गेल्या महायुद्धापूर्वीच्या कालांत औद्योगिक कंपन्यांच्या नफ्यावर कर मुद्दाम कमी ठेवण्यांत आले होते. त्या मानानें शेतकी उत्पादनावरील कर दुपटी–तिपटीनें अधिक होते अशी माहिती सर एम्. विश्वेश्वरअय्या यांनीं नुकतीच सांगितली.

### ज्ञान आणि कुवत

उद्योगपतींच्या ज्ञानावर, माहितीवर, त्यांच्या कुवतीवर, हिंमतीवर उद्योगधंद्यांची त्या त्या मानानें कार्यक्षमता असते असा सर्वसाधारण समज आहे.

अमेरिकन कारखानदारांचें तांत्रिक ज्ञान अधिक आहे हें मुख्य कारण नसून अमेरिकन सरकारनें वेळोवेळीं स्वीकारलेलें उपकारक धोरण हेंच अमेरिकन उद्योगधंद्यांच्या कार्यक्षमतेचें प्रमुख कारण आहे.

### उत्पादन : उत्पादनक्षमता

देशांतील संपत्ति एकूण उत्पादनावर, तर राहणीचें मान दर

## दि महाड को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि:, महाड.

स्थापना १९२१

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ९०,००० |
| खपलेलें भांडवल | ६७,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | ५६,००० |
| ठेवी | ८,००,००० |
| खेळतें भांडवल | १०,००,००० |

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ भागीदारांस सर्व प्रकारचे तारणावर कर्ज, कॅशक्रेडिट व ओव्हरड्राफ्ट दिला जातो.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

★ बचतीच्या आकर्षक योजना.

मा. गो. धारप, B. Sc. (Hons.) मॅनेजर

वि. गो. मेहता, B. A., LL B. मॅ. डायरेक्टर

द. न. वैद्य. B. A., LL B. चेअरमन

---

एकाच भेटींत एकाच ठिकाणीं भारतीय कलाकौशल्याच्या सहस्रावधि वस्तु आपणांस पहाणें व खरीदणें असल्यास

## " लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय पुणें "

या संस्थेच्या

### " व्यापार संवर्धन-गृहास " अवश्य भेट द्या.

जगप्रसिद्ध काश्मीरी कलाकौशल्य; मीन्याचें उत्कृष्ट काम; लखनौचीं मातीचीं चित्रें; त्रावणकोर, म्हैसूर, होनावर येथील मनमोहक हस्तीदंती व चंदनी कोरीव वस्तू व देवांच्या मूर्ति; चभापट्टगचीं व दुसरीं अनेकविध खेळणीं; बाहुल्या, लाखी रंगाचे पावडरचे डबे, शांतिनिकेतनचीं कातडीं पाकिटें, फणेरी पेट्या, श्रीराम सिल्क मिल्स बंगलोरचें सर्व तऱ्हेचें कापड; भेंडाचीं फुलें; जादूचे शिंपले; हातमागाचें सर्व प्रकारचें कापड; उत्तम शिलाईचे अतिस्वस्त तयार कपडे; होजियरी; फळांचे टिकविलेले रस व मोरंबे; फर्निचर, देव्हारे, मध, केशर, सुवासिक उदबत्त्या, हातविणीचे स्वेटर्स, घायपाताच्या वस्तू, टिकाऊ पादत्राणें अशा उत्तमोत्तम नानाविध वस्तु आपण आपल्या प्रियजनांना भेट देणेकरितां व संग्रहीं ठेवणेकरितां निवडूं शकाल.

(जागा—कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २.)

---

## पूर्व खानदेश मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड

स्थापना १९१६

तार : EKCOBANK टेलिफोन : ५४

### मुख्य कचेरी : जळगांव ( पू. खा. )

चेअरमनः—श्री. बी. डी. देशमूख, बी. ए., एलएल्. बी., एम्. एल्. ए.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ९,०१,७०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. १४,००,०९३ |
| ठेवी | रु. १,५६,४६,०२३ |
| खेळतें भांडवल | रु. १,९०,९५,९२९ |

शाखा

(१) अंमळनेर (२) भुसावळ (३) बोदवड
(४) चाळिसगांव (५) चोपडा (६) धरणगांव
(७) एरंडोल (८) फैजपूर (९) जामनेर
(१०) पाचोरा (११) पारोळा (१२) रावेर
(१३) यावल

उपशाखा

(१४) भडगांव (१५) एदलाबाद (१६) नशिराबाद
(१७) सावदा (१८) शेंदुर्णी (१९) वरणगांव

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

*जास्त माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.*

आर. वाय. सोनावणे, मॅनेजिंग डायरेक्टर.

व्ही. आर. शिंदे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर

---

ही दिवाळी व नवें वर्ष बँकेच्या सर्व खातेदारांस, भागीदारांस व इतर संबंधीयांस सुखाचें व भरभराटीचें जावो.

## दी बँक ऑफ औंध लिमिटेड, सातारा.

हेड ऑफीसः—१११-११२, सदाशिव पेठ, सातारा.
शाखाः—औंध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.

—: संचालक मंडळ :—

(१) श्री. नरहर गंगाधर जोशी, बी. ए., एलएल. बी. वकील, चेअरमन, सातारा.
(२) श्री. बाळकृष्ण गणेश चांदोरकर, बी. ए., एलएल्. बी. वकील, सातारा.
(३) श्री. शेट कालिदास भाईचंद, बर्मा शेल एजंट, सातारा.
(४) श्री. मधुकर माधव जोशी, बी. ए., एलएल्. बी. व्यापारी, पुणें.
(५) श्री. शेट झंकारमल मोतीलाल मुथा, बँकर्स, सातारा.
(६) श्री. रघुनाथ दिनकर माजगांवकर, व्यापारी, सातारा.

मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर, कऱ्हाड वगैरे ठिकाणांवर ड्राफ्टस् दिले जातात.

मुदत ठेवी, आकर्षक दरानें १ ते ५ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

*विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.*

बा. वा. घमंडे, C. A., I. I. B. मॅनेजर.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

माणशीं उत्पन्नावर–उत्पादनक्षमतेवर आधारलेलें असतें. देशांतील किती मंडळी प्रत्यक्ष उत्पादनकार्यांत असतात अन् किती अनुत्पादक व्यवसायांत व इतरत्र असतात यावर देशांतील दर माणशीं उत्पन्न अवलंबून असतें.

धान्य पिकवा म्हणून नुसते सांगणारे किती व प्रत्यक्ष धान्य पिकवणारे किती ? जितकीं माणसें अनुत्पादक व्यवसायांत जाणार तेवढीं प्रत्यक्ष उत्पादनाला कमी पडणार. अर्थातच देशांतील उत्पन्नाचा दर माणशीं वाटा तेवढा कमी येणार.

कारखानदारांनीं अनुत्पादक खर्च वाढूं न द्यावयाची कोशीस करावयाची, ती याकरितांच !

युद्धपूर्व जपानी मालाच्या कमाल स्वस्ताईचें रहस्य त्यांच्या निरतिशय राष्ट्रप्रेमांत, विलक्षण कार्यप्रवीणतेंत, किमान अनुत्पादक खर्चाच्या अर्थव्यवस्थेंत सामावलेलें असावें असें वाटतें.

### राष्ट्रीयीकरण व अनुत्पादक खर्च

मध्यवर्ती नियोजन, मध्यवर्ती ताबा, दुरून सूत्रें चालविणें, इत्यादीमुळें अनुत्पादक खर्च वाढतो. प्रत्यक्ष जागेवर हजर असल्यानें ज्या गोष्टींचा विचार ताबडतोब, विनाखर्च होतो त्याच गोष्टी इतर ठिकाणाहून करावयाच्या म्हटल्या कीं कागदपत्रें, तीं तयार करणारी मंडळी असा किती तरी पसारा वाढतो; आणि पैसा, शक्ति, बुद्धि खर्ची पडतात. राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेले व्यवसाय कार्यक्षमतेंत खाजगी धंद्यांशीं बरोबरी कधींच करूं शकत नाहींत !

अमेरिकन सरकार जेव्हां खाजगी धंदा–कारखाना चालवावयास घेतें तेव्हां त्याची व्यवस्था पाहण्यासाठीं संचालक मंडळ नेमतें. राजकीय किंवा सरकारी अडथळे कामांत येता उपयोगी नाहींत म्हणून तशी स्पष्ट व्यवस्था करारांत करण्यांत येते. अनुभव असा आहे कीं संचालक मंडळी योग्य रीतीनें निवडली गेलेली असली आणि राजकीय–सरकारी हस्तक्षेप झाले नाहींत तर खाजगी कारखान्याच्या सर्वसाधारण बरोबरीनें काम होतें.

इंग्लंडमध्यें सरकारनें उद्योगधंदा–कारखाना हातीं घेतला, राष्ट्रीयीकरण केलें म्हणजे राजकारणी पुढाऱ्यांची हुकमत सुरू होते. जो धंद्यांतला नाहीं तो धंदा कसा करणार? अन् जरी त्यांतला असला तरी वरून आदेश देऊन धंदा कितपत चालणार? अशानें उत्पादनक्षमता टिकणार–वाढणार कशी ? शिवाय अनुत्पादक कामाचा पसारा वाढतो तो निराळाच !

राष्ट्रीयीकरण झालेल्या इंग्लंडांतील कोळशाच्या खाणींत प्रत्यक्ष उत्पादनकार्य करणारे शेंकडा २५ असल्याचें आढळून आलें; तर अमेरिकेंतील कामगारांचें हें प्रमाण ७० टक्के आहे. इंग्लंडांतील खाणींना अनुत्पादक कामगारांचा कितीतरी बोजा सहन करावा लागतो. त्या प्रमाणांत कोळसा महाग पडणार हें उघड आहे.

इंग्लंडमध्यें कांहीं धंद्यांत सरकारनें 'कार्य समित्या' नेमल्या आहेत. समितीचे सभासद : ४ युनिअन प्रतिनिधी, ४ कारखानदार, ४ बाहेरचे, एकूण १२ प्रातिनिधी. प्रातिनिधिक समितीच्या अहवालांचें साधारण स्वरूप असें :

काम कमी होतें हें मान्य करून सरकारच्या पद्धति व धोरण त्याला कारणीभूत आहे असें म्हणून त्याबाबत उपाययोजना सुचविण्याचें समिति टाळतें !

यंत्रसाहित्यांत सुधारणा करण्याबाबत खूपच सूचना करण्यांत आल्या. त्या समितीच्या सभासदांनीं केल्या म्हणण्याऐवजीं उत्पादक तज्ज्ञांनीं केल्या असें म्हणणें अधिक योग्य होईल. प्रत्यक्ष काम करणारे मुकादम, फोरमन, अधिकारी तज्ज्ञ यांचें म्हणणें ऐकल्यास किती तरी सुधारणा होणें शक्य आहे असें आढळून आलें आहे.

उत्पादनविषयक अधिक माहिती, अधिक आंकडे पाहिजेत, शास्त्रीय पद्धतीची व्यवस्था असली पाहिजे, वरूनच सर्व नियोजित–योजना झाल्या पाहिजेत, संशोधन कार्याकरितां धंद्याकडून सक्तीनें रकम गोळा करावी, सरकारी नियंत्रण व हस्तक्षेप अधिक असावा, अशा अर्थाच्या शिफारसी ती करते.

अनुत्पादक व त्यांच्या कामाचा पसारा वाढला–खर्च वाढला. प्रत्यक्ष उत्पादन वाढण्याच्या योजना नाहींत. सर्व समित्यांचा अहवालांच्या मजकुराचें स्वरूप साधारणतः याच प्रकारचें !

कम्युनिस्ट रशियांत गेल्या तीस वर्षांत उत्पादन प्रचंड प्रमाणांत वाढलें. त्या मानानें कामगार व सर्वसामान्य जनता यांची स्थिति सुधारली नाहीं. याचें एक कारण असें कीं प्रत्यक्ष उत्पादकांच्या मानानें अनुत्पादक फार. सरकार, लष्कर, पोलीस, पक्ष, नियोजन पद्धति या अशा कामांत किती मनुष्यशक्ति खर्ची पडत आहे !

आपल्या हिंदुस्थानांत गेल्या दहा वर्षांत मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचें खर्च २८६ वरून १०६९ कोटी रुपयांवर गेले आहेत. लष्करी खर्च ४६ वरून १५५ कोटि रुपयांपर्यंत चढला आहे. खर्च तिपटी–चौपटीनें वाढला. देशांतील उत्पादन वाढविण्याच्या कामीं किती खर्च झाले ? प्रत्यक्ष उत्पादन किती वाढलें ?

आपल्यांतील किती तरी मंडळींना रोजगार मिळाला खरा; परंतु हा एवढा प्रचंड अनुत्पादक खर्च करून उत्पादन वाढण्यास अपेक्षित मदत झाली नाहीं–उत्पादन वाढलें नाहीं.

आपल्या देशांतील महागाई, पदार्थांचा तुटवडा, राहणीची निकृष्टावस्था या अनर्थ परंपरेचें एक प्रमुख कारण हा वाढता अनुत्पादक सरकारी खर्च हें आहे.

### उत्पादन आणि सरकार

उत्पादनाचें–उत्पादनक्षमतेचें मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र अन् राजकारण हें असें आहे.

उत्पादन कार्यांत सरकारची प्रधान भूमिका आहे, असते.

पुढारलेल्या देशांच्या तोडीची आपली उत्पादनक्षमता असावी, उत्पादन असावें असें सरकारला वाटत असलें तर त्या त्या देशांतील सरकारांनीं काय केलें, कोणतें धोरण स्वीकारलें हें पाहून, अभ्यासून यावें व तसें येथें करावें; तसें वातावरण येथें निर्माण करावें. जी जबाबदारी सरकाराची; त्याबाबत इतरांना दोष देण्यांत अर्थ नाहीं.

### आपलें सरकार व उद्योगपती

" आपली व्यवस्था खरी उत्पादन व्यवस्था नाहीं. जास्तींत जास्त उत्पादन, चांगलें उत्पादन, कमी खर्चाचें उत्पादन, राष्ट्रीय संपत्तीच्या दृष्टीनें युक्त उत्पादनपद्धति ही दृष्टि आपणांकडे अभावानें दिसेल. उत्कृष्ट व प्रामाणिक कारखानदार म्हणून हिंदुस्थानांत कीर्ति मिळविणारे बहुतेक उद्योगधंद्यांत अजूनहि परकीयच आहेत. बाजार तेजीचा असला म्हणजे वाईट माल गिऱ्हाइकाचे माथीं मारून स्वतःच्या देशांतच नव्हे तर परदेशांतहि अनेकवार हिंदी कारखानदार व व्यापारी यांनीं अप्रतिष्ठा मिळविलेली आहे. कर चुकविणें, सरकारी नियंत्रणें पद्धतशीर रीतीनें मोडणें, वजनामापांत व किंमतींत गिऱ्हाइकांस फसविणें, सट्टेबाजी व सट्टेबाजी करणें; एवंच सर्व तऱ्हेच्या लबाड्या करणारे प्रत्येक देशांत आढळतात. देशांदेशांतील मुख्य फरक म्हणजे ते केवळ्या प्रमाणांत व कोणत्या थरांत आढळतात याबद्दलचा. सन्या पुढारलेल्या देशांत हे अल्प असतात, इतकेंच नव्हे धुरीण समजल्या जाणाऱ्यांच्यांत असे सहसा सांपडत नाहीं. चीन–हिंदुस्थान सारख्या देशांत लहान–मोठे सगळेच एका माळेचे मणि, किंबहुना जेवढा

मोठा धानिक तेवढा त्याचा दुर्लौकिकहि मोठा अशी बऱ्याच वेळेस परिस्थिति असते. ज्यांना समाजकंटक म्हणून साक्षेपानें वगळावे ते आमच्या राजधानींत मोठे मानाचे सद्गगार म्हणून मिरवितात." प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं केलेलें हें सद्य:स्थितीचें विदारक वर्णन वस्तुस्थितिनिदर्शक नाहीं असें कसें म्हणतां येईल?

**महाराष्ट्रीय कारखानदारीचा आदर्श.**

गेल्या ८–१० वर्षांतील गिरण्या व इतर कारखाने यांच्या खरेदी–विक्रीचे व्यवहार पाहतां कारखानदारांतील सटोडियांचें प्रमाण डोळ्यांत भरण्या इतकें वाढत असल्याचें दिसतें. कारखानदारीची त्यांना ना माहिती, ना कारखान्याबद्दल प्रेम. आपल्या कुटुंबियांना, सगेवाल्यांना, कारखान्यांच्या निरनिराळ्या व्यवहारांत पेरून सर्वांनीं मिळून धंद्यांतील मलई खाण्याबाबत त्यांच्या साऱ्या खटपटी अन् प्रयत्न! कित्येक प्रमुख हिंदी उद्योगपती प्रथम सटोडे असतात. त्यांना व्यापारी म्हटलें जातें अन् ते कारखाने विकत घेतात म्हणून कारखानदारांच्या उच्च श्रेणींत जाऊन बसतात; तें त्यांचें खरें स्थान नव्हेच!

उलट, आपल्या महाराष्ट्रीय उद्योगपतींचा पिंडच मुळीं कारखानदारीचा आहे. कामगार, विश्वविद्यालयीन किंवा तत्सम जीवनांतून त्यांची कारखानदारी जन्माला येत असते. पैशांचें फारसें पाठबळ नसतांनाहि ते कारखाने काढतात, टिकवतात, वाढवतात. असीम कष्ट करूनहि, वेळेवर हातीं भरपूर भांडवल नाहीं म्हणून अपेक्षित यश कित्येक वेळीं त्यांचे वांट्याला आलेलें नाहीं. तरीपण कारखानदारीचें व्रत कांहीं त्यांनीं सोडलें नाहीं.


## दि प्रेसिडेन्सी इण्डस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

[ शिड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस: प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें २.

मुंबई शाखा : ८२ मेडोज स्ट्रीट, कॉमनवेल्थ बिल्डिंग, फोर्ट, मुंबई १.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१५,५२५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

अध्यक्ष:–श्री. ग. रा. साठे उपाध्यक्ष:–श्री. वा. ग. बापट.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.—

गो. धों. जोगळेकर — बी. ए. (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर

चिं. त्रिं. चितळे — मॅनेजिंग डायरेक्टर




## श्री लक्ष्मी सं. को. बँक लि., फलटण.

जि. उत्तर सातारा.

[ स्थापना–१९२६ ]

दि. ३० जून १९४९

| | | |
|---|---|---|
| मागितें भांडवल | रु. | ६६,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ६७,५०० |
| इतर फंड | रु. | ९१,५०० |
| ठेवी | रु. | ११,५०,००० |



हीं दीपावली सर्वांना भाग्याची होवो.

श्री. वि. शं. झिरपे, B. A., LL. B. अध्यक्ष.
श्री. मा. शं. पवार, उपाध्यक्ष.
श्री. मो. रा. कोठारी, संचालक.
श्री. प. आ. शिपकुले, संचालक.
श्री. श्री. ह. तळवलकर, A. C. R. A. व्यवस्थापक.



## सरकारनें रु. २,००,००० (दोन लाख) दर्शनी किंमतीचे शेअर्स घेऊन पुरस्कारिलेली "अिंडस्ट्रिअल बँक लिमिटेड सांगली"

*बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.*

अिंडस्ट्रियल बँक लि. सांगली, करितां
महादेव आण्णाजी कुलकर्णी
कुसनाळकर, B. A., LL. B.
सेक्रेटरी व अकौंटंट.



## पेण तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, लि. पेण.

स्थापना : एप्रिल, १९४५

ही दिवाळी आणि नूतन संवत्सर आमच्या सर्व शेतकरी आणि नागरी सभासदांना आणि हितचिंतकांना सुखसमृद्धीचें जावो!

चेअरमन.

# दुसऱ्या महायुद्धाचे अर्थशास्त्रावर परिणाम

## परिस्थितीवर अवलंबून असणारें अर्थशास्त्र

लेखक :—श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए.

अर्थशास्त्रावरच्या कोणत्याहि ग्रंथाची पुन्हा आवृत्ति काढाव याची झाल्यास मूळ ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं फेरबदल करावे लागतात किंवा माहिती परिपूर्ण करण्यासाठी नवीन माहिती घालावी लागते. १५।२० वर्षांपूर्वी लिहिलेला ग्रंथ तर आजच्या काळांत फारसा उपयोगी पडत नाहीं. अर्थशास्त्राच्या तत्त्वांची चर्चा करणारें पुस्तक घेतलें तरीहि त्या पुस्तकांतील शास्त्रीय विवेचनाची मांडणी करतांना पुस्तक ज्या काळांत प्रसिद्ध झालें असेल त्या काळांतील महत्त्वाची परिस्थिति विचारांत घ्यावी लागते. अर्थशास्त्रावरील वाङ्मयांत औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळांत व त्यांतल्या त्यांत गेल्या शंभर वर्षांत प्रामुख्यानें भर पडली आहे. मार्क्सच्या विचारसरणीचा प्रभाव गेल्या शतकाच्या उत्तरार्धापासून विशेष दिसून येतो. मार्क्सची विचारसरणी जशीच्या तशी कोणीच स्वीकारली नाहीं, तरी भांडवलशाहीबद्दलच्या तत्कालीन प्रचलित कल्पनांना त्यानें दिलेल्या जबरदस्त धक्क्यामुळें, भांडवलशाहीची तरफदारी करणाराच्या विचारसरणीला नवें वळण लागलें व पूर्वीची अनिर्बंध खाजगी मालकी व भांडवलदारांचें वैयक्तिक स्वातंत्र्य ह्या कल्पना जाऊन योग्य तेथें सरकारनियंत्रण ही कल्पना रूढ झाली. एवढेंच नव्हे तर प्रत्येक देशांत राज्यकारभाराचीं चक्रें वाढत्या भांडवलशाहीबरोबर सरकार-नियंत्रणाच्या दिशेनें फिरूं लागलीं. भांडवलशाहीमुळें निर्माण झालेल्या आर्थिक विषमतेवर एक उपाययोजना म्हणून प्राप्तीवरील कर इ. प्रकारांच्यामुळें राष्ट्रीय कर-पद्धतींत फरक पडत चालला. पहिल्या महायुद्धाच्या काळांत विशेषतः मजूर-विषयक प्रश्नांकडे पाहण्याची दिशा आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेमुळें बदलली, व सुधारलेल्या राष्ट्रांनीं ह्या संघटनेनें केलेल्या शिफारसींना जरूर ते कायदे करून वेळोवेळीं मान्यता दिली. मजुरांचे हक्क हा प्रश्न १९ व्या शतकांत हळू हळू उदयास आला व सध्यां या बाबतींत तर इतकी प्रगति झाली आहे कीं जीवन-वेतन, बेकारीचा विमा, म्हातारपणीचें पेन्शन, कामाचे तास, इ. गोष्टी अगदी जुन्या झाल्या असून औद्योगिक नफ्यांत मजुरांचा वाटा हें तत्त्वहि स्वीकारलें जात आहे. गेल्याच वर्षी भारत सरकारनें सुरवात म्हणून सहा प्रमुख धंद्यांच्या बाबतींत ह्या तत्त्वाला मान्यता दिली आहे. पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यापाराबद्दलच्या कल्पनांमध्यें संरक्षित व्यापार व एकेका राष्ट्रापुरती संकुचित दृष्टि स्वीकारली गेल्यामुळें फरक पडत चालला.

### परिस्थिति व तत्त्वें

ब्रिटिश साम्राज्यानें साम्राज्यान्तर्गत सवलतींच्या धोरणाचा विशेष प्रकारें स्वीकार केला व त्यांतूनच १९३२ चा सुप्रसिद्ध ओटावा करार निर्माण झाला. चलनपद्धतिमध्यें गेल्या शतकांत कागदी चलन रूढ झाल्यापासून देशांतील अंतर्गत चलनाचा पुरवठा, परराष्ट्रीय देणीं, बँकिंगचे व्यवहार ह्यावाबत महत्त्वाचे फरक झाले. इंग्लंडनें सुवर्ण-चलन सोडल्यापासून चलनपद्धतीवर आणखी परिणाम झाला. एका मोठ्या उद्योगप्रधान व संपन्न देशामध्यें निर्माण होणारी मंदी हळू हळू सर्व जगभर कशी पसरते हा अनुभव १९२९ नंतरच्या अमेरिकेंत सुरू झालेल्या मंदीमुळें सर्वांना आला. सुप्रसिद्ध इंग्लिश अर्थशास्त्रज्ञ जी. डी. एच्. कोल ह्यांनीं ह्याच काळांत त्या मंदीची कल्पना स्पष्टपणें सर्वांना यावी या उद्देशानें आपलें सुंदर पुस्तक लिहिलें. सारांश, अर्थशास्त्र हें संपत्तीचें उत्पादन, संपत्तीची विभागणी, संपत्तीचा उपभोग, देवघेव, इत्यादि प्रश्नांचा विचार करतांना कोणत्याहि वेळच्या समाजाच्या परिस्थितीच्या दृष्टीनें करीत असतें, व समाजाची परिस्थिति ही नेहमींच कमीजास्त प्रमाणांत बदलत असल्यामुळें अर्थशास्त्राचीं पुस्तकें नवीन आवृत्ति काढतांना सुधारावीं लागतात, किंवा बऱ्याच कालांतरानें त्या पुस्तकांचें स्वरूपहि बरेंच पालटतें. मूळचीं तत्त्वें जरी खरीं असलीं तरी प्रत्येक तत्त्व असें असतें कीं त्याची मांडणी विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेऊनच करावी लागते. रिकार्डोची शेतीच्या बाबतींत "खंडा"ची कल्पना सहज सुलभ विपुल जमिनींचा पुरवठा अमेरिकेसारख्या नवीन देशांत होता त्या परिस्थितीला उद्देशून प्रतिपादण्यांत आली आहे. ही कल्पना आजच्या बदललेल्या परिस्थितींत उपयुक्त ठरत नाहीं. अर्थशास्त्राचीं मूळचीं तत्त्वें अगदी साधीं व सर्वमान्य असलीं तरी बदलत जाणाऱ्या परिस्थितीचें प्रतिबिंब किंवा प्रतिक्रिया तत्त्वांवर होते, व म्हणूनच ह्या शास्त्रांतील माहिती ही नेहमींच सापेक्ष असते. इतर शास्त्रांमध्यें नवीन शोध लागल्यावर परिस्थिति बदलते असें दिसतें, तर अर्थशास्त्रामध्यें बदलत जाणाऱ्या परिस्थितीचें चित्र त्या त्या कालच्या विचारसरणींत उमटलेलें दिसतें. दुसऱ्या महायुद्धामध्यें ज्या घडामोडी झाल्या त्यांचा परिणाम आर्थिक परिस्थितीवर होणें अपरिहार्य होतें. दुसऱ्या महायुद्धामुळें आर्थिक विचारसरणीच्या दृष्टीनें प्रत्यक्ष परिस्थितींत कोणते महत्त्वाचे बदल घडून आले, याचें थोडक्यांत विवेचन आतां करूं.

### अनेक आंतरराष्ट्रीय संस्था

व्यापारी जगांत उद्भवणारीं संकटें टाळावीं या उद्देशानें आंतरराष्ट्रीय चलन निधी ह्या संस्थेची स्थापना युद्धानंतर झाली. या संस्थेचा उद्देश एखाद्या सभासद-देशाला एखाद्या वर्षी परराष्ट्रीय व्यापारांत तूट आल्यास, अशा देशाला चलन-निधीकडून तात्पुरतें कर्ज देण्यांत यावें असा आहे. भारताला गेलीं तीन वर्षें परराष्ट्रीय व्यापारांत तूट येत आहे व गेल्या वर्षींची तूट भरून काढण्यासाठी ह्या संस्थेकडून कर्ज घेण्यांत आलें. आंतरराष्ट्रीय व्यापारांत येणाऱ्या प्रतिकूल तफावतीमुळें आर्थिक जगांत अनेक बिकट प्रश्न उपस्थित होतात, हें लक्षांत घेतां सदरहू चलननिधी ही एक उपयुक्त संस्था ठरेल असें दिसतें. जगांतील देशांना पुनर्घटनेच्या कार्यासाठीं कर्जे मिळावीं ह्या उद्देशानें जागतिक बँक स्थापन करण्यांत आली आहे. भारतालाहि ह्या बँकेकडून रेल्वेच्या खर्चासाठी ३४० लक्ष डॉलर्सचें कर्ज नुकतेंच मिळालें आहे, व आणखी शेतीच्या योजनांसाठी कर्ज मिळण्याचा संभव आहे. निरनिराळ्या देशांतील सामाजिक व सांस्कृतिक संबंध दृढ व्हावे, या उद्देशानेंहि एक आंतरराष्ट्रीय संस्था स्थापन झाली आहे. मजूर संघटनेचेंहि कार्य वाढत्या प्रमाणांत आहे. जगांतील आरोग्याचे प्रश्न सोडविण्यासाठीं एक संस्था स्थापन झाली आहे. जगांतील असहाय्य मुलांना मदत करणारीहि एक संस्था आहे. हवाई वहातुकीचे प्रश्न आंतरराष्ट्रीय दृष्ट्या विचार करून सोडविले जातात. 'यूनो' ही संस्था राजकीय क्षेत्रांत शांतता राखण्याचें काम करीत आहे. या प्रमाणें दुसऱ्या महायुद्धानंतर जीवनाच्या विविध बाबतींत,

## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लि., पुणें

**( स्थापना : १८ जानेवारी १९०६ )**

कामाची वेळ–सकाळीं ८॥ ते ११॥ सायंकाळीं ५॥ ते ७

शनिवारीं फक्त सकाळीं ८॥ ते ११॥

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,२५,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १,००,९४० |
| गंगाजळी | रु. ६१,१८३ |

**हप्तेबंद ( रिकरिंग ) व कायम ठेवीवरील व्याजाचा** दरः– एक वर्ष १॥ टक्का, २ वर्षे २ टक्के व ३ वर्षे २॥ टक्के.

बँक आपल्या सभासदांनाच दोन जामीन, घर, सरकारी कर्जरोखे, कायम ठेव, सोनें, पोस्टल पॉलिसी अगर बँकेनें पसंत केलेल्या विमा कंपन्यांच्या पॉलिसी वगैरे तारणावर कर्ज देतें. सोन्याच्या तारणावर व्याजाचा दर ४॥ टक्केप्रमाणें आहे. तसेंच माफक व्याजाच्या दरानें सभासदांना ओव्हरड्राफ्ट देण्यांत येतात. सरकारी नोकरांचा पगार, पेन्शन, बिलेंवसुली इत्यादि बँकिंगचे व्यवहार बँक करते. तसेंच सभासदांस नियमितपणा, काटकसर व शिल्लक ठेवणेची सवय लागावी या हेतूनें नवीन बँकेनें हप्तेबंद ठेव घेणेस सुरवात केली आहे. बँकेनें सुरक्षिततेसाठीं सेफ कस्टडी खातेंहि नवीनच सुरू केलें आहे. नियमासंबंधीं कचेरींत चौकशी करावी.

य. श्री. शाळिग्राम, कार्यवाह
गो. शं. देशमूख, डी. सी. ई., एल. एस. जी. डी., कार्याध्यक्ष

---

## दि पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

**पंढरपूर ( जि. सोलापूर )**

**(स्थापना १९१२)**

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ७५,००० |
| खपलेलें शेअर भांडवल | ४९,९१० |
| रिझर्व व इतर फंडस् | ७१,६२० |
| खेळतें भांडवल | ९,१९,९४७ |

ह्या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेच्या सभासदांना, स्थावर व जामिनावर, मालावर व सोनेचांदीवर योग्य व्याजाचे दरानें कर्जें दिलीं जातात. तसेंच व्यापार उद्योगधंद्यासाठीं योग्य जामिनावर कॅश क्रेडीट दिलें जातें. चेक्स-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे यांची खरेदीविक्री व व्याज वसुली, रशीदी वसुली, वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.**

बँक जिल्ह्यांतील इतर सहकारी बँकांच्या मानानें सर्वांत जुनी असून गेलीं सतत ६ वर्षें 'अ' वर्गांत दाखल आहे. मुंबई सरकारनें कार्यक्षम म्हणून निवड केलेल्या चौदा सहकारी अर्बन बँकांमध्यें ही बँक दाखल आहे.

पी. आर. कुलकर्णी, जी. डी. सी अँड ए., ॲ. मॅनेजर.
वा. कृ. उत्पात, बी. ए., एल्एल्. बी., वकील. चेअरमन.

---

## दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. सोलापूर

स्थापनाः–१९१८

हेड ऑफीसः– सोलापूर.

**—: शाखा :—**

**कुर्डुवाडी, पंढरपूर, करमाळा, मोहोळ, सांगोला व अक्कलकोट.**

चेअरमन, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

श्री. ह. वि. केळकर, बी. ए., एल्एल्. बी., वकील, सोलापूर.

**— भांडवल —**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १,८५,९०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. २,३६,०७० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६६,५१,८१८ |
| सन १९४८-४९ चा नफा | रु. ३३,४३० |

**मंजूर झालेलें डिव्हिडंड पांच टक्के.**

हेड ऑफिसांत व शाखा ऑफिसांत सर्व प्रकारचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. ठेवींचे दरांबाबत व नियमाबाबत समक्ष ऑफिसांत चौकशी करावी अथवा अर्ज करून नियम मागवावेत.

जे. के. जोशी, मॅनेजर.
हरी विष्णू केळकर, चेअरमन.

---

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें शहर.

टेलिफोन नंबर २४८३ **( स्थापना १९१७ )** पोस्ट बॉक्स नंबर ५११

**शाखा– खेड, जुन्नर, मंचर, घोडनदी, सासवड, दौंड, इन्दापूर, बारामती, नीरा, डेक्कन जिमखाना व एस. पी. कॉलेज शाखा, पुणें.**

**हेड ऑफिस व शाखा कचेऱ्या येथें बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

बँकेनें नवीन सातशे लॉकर्स सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें बसविले असून ते ता. ५–९–४९ पासुन भाड्यानें देण्यास सुरवात केली आहे. सदर लॉकर्समध्यें आपआपल्या मौल्यवान जिन्नसा, दागदागिने, कागदपत्रें वगैरे ठेवतां येतात. भाडें दरमहा १ रुपयापासून आकाराचे मानानें रु. ८ पर्यंत आहे.

याशिवाय

सीलबंद पेट्याहि सुरक्षिततेसाठीं स्वीकारल्या जातात. दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

**तरी याचा फायदा सर्वांनीं घ्यावा अशी विनंती आहे.**

पुणें शहर
२७–९–४९

द. दि. चितळे. मॅनेजिंग डायरेक्टर.

सहकार्यानें' काम करणाऱ्या अनेक आंतरराष्ट्रीय संस्था मानवी सौख्यांत भर घालण्याच्या उद्देशानें स्थापन झाल्या आहेत, व त्यांपैकी पुष्कळशा संस्था आर्थिक जीवनावर परिणाम करणाऱ्या आहेत. त्या सर्व संस्थांचें कार्य उदात्त पातळीवरून चालल्यास जगांतील पुष्कळसे आर्थिक प्रश्न सुटतील, व मानवी समाजाची प्रगति 'एक जग' ह्या दृष्टीनें शक्य होईल.

### सहकार्याचें आर्थिक जीवन

सरकारी नियंत्रणांच्या योगानें बाजारभाव मर्यादेंत कसे राखतां येतात, व त्यामुळें महागाईचें संकट कसें कमी होतें याचा चांगला अनुभव दुसऱ्या महायुद्धांत आला. हिंदुस्थानांत इतर महागाई पुष्कळ झाली तरी सरकारी नियंत्रणामुळें रेल्वेचे वहातुकीचे दर, पोस्टाचे दर, सरकारी कर्जरोख्यांचे भाव हे जवळ जवळ स्थिर राहिले. शुद्ध आर्थिक व्यवहारांत दुसऱ्या महायुद्धानें एक विशेष गोष्ट शिकविली असेल तर ती ही कीं, जनतेला बचत करावयास लावून त्या पैशाचा उपयोग सरकारनें आपल्या कामासाठीं तात्पुरता करणें. हा मार्ग हिंदुस्थानांतहि अल्प प्रमाणांत अनुसरला गेला. भावनियंत्रण व वांटप ह्या गोष्टी उत्पादनापेक्षांहि आपत् प्रसंगीं उपयुक्त असतात हा अनुभव आल्यामुळें युद्धानंतरच्या काळांतहि उत्पादनाचे प्रश्न सोडवीत असतांना, तारतम्यानें निदान भावनियंत्रणाचा उपयोग करून सरकारला जनतेची आर्थिक परिस्थिति सुधारतां येईल हें अर्थशास्त्रानें शिकविलें आहे. योजनाबद्ध कार्यक्रम हातीं घेण्याची आवश्यकता दुसऱ्या महायुद्धानें पटवून दिली आहे. उत्पादन व मालाची वाटणी यांवर नियंत्रणें ठेवल्यास आर्थिक जीवनाचे प्रश्न सोडवणें सोपें जाईल. आर्थिक व्यवहारांतहि शक्य तितकें आंतरराष्ट्रीय सहकार्य साधण्याकडे दृष्टि निर्माण झाली आहे. मंदी येण्याचा संभव दिसल्यास त्यावर अगाऊ उपाय योजना करतां येणें शक्य आहे. दुसऱ्या महायुद्धानें आर्थिक व्यवहारांवर नियंत्रणें ठेवून संकटांना तोंड कसें द्यावयाचें हें शिकविलें आहे, व यापुढें सहकार्यानें जागतिक आर्थिक जीवन सुधारेल हें दाखविलें आहे.

### युद्धाची आर्थिक आघाडी

दुसऱ्या महायुद्धांत अमेरिकेनें उधार-उसनवार पद्धतीनें युद्ध प्रयत्नांसाठीं दोस्त राष्ट्रांना जीं कर्जें दिलीं तीं एक नवीन पद्धति होती. या मार्गावरून युद्धाची आर्थिक आघाडीचा विचार करणारांना कांहीं उपयुक्त माहिती मिळूं शकेल. इंग्लंडनें हिंदुस्थान, इजिप्त, सीलोन, आयर इत्यादि देशांपासून त्यांना कोणत्याहि प्रकारें रोख किंमत न देतां जें युद्धसाहित्य खरेदी केलें त्यामुळें स्टर्लिंग बॅलन्सेसचा प्रश्न ह्या देशांत निर्माण झाला. हें स्टर्लिंग कर्ज कसें परत करावें हा युद्ध संपल्यानंतर बिकट प्रश्न झाला आहे. युद्ध चालू असतांना हिंदुस्थान सरकारनें डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस व नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्सच्या रूपानें जनतेकडून थोडेंबहुत कर्ज मिळविलें. खालच्या पातळींतील उत्पन्नावरील कर देणारांना कराच्या कांहीं पट रकम डिफेन्स सेव्हिंग बँकेंत ठेवल्यास कर माफी देऊन कांहीं अल्प कर्ज उभारण्यांत आलें. ह्याहि गोष्टी युद्धविषयक कर्जें कशीं उभारतात या प्रश्नामध्यें येतात.

प्रत्यक्ष महायुद्धाच्या काळांत आंतरराष्ट्रीय व्यापार बंद पडल्यामुळें इंग्लंडसारख्या देशांत अन्न-टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठीं वांटप पद्धति सुरू करण्यांत आली. १९४३ पासून हिंदुस्थानमध्यें वांटप पद्धति व नियंत्रणें ह्यांना हळू हळू सुरवात करण्यांत आली. अन्नधान्य, साखर, डाळी, रॉकेल, कापड इ. पदार्थ वांटप पद्धतींत समाविष्ट झाले. इंग्लंडमध्यें वांटप पद्धति बहुतेक प्रत्येक आवश्यक जीवनविषयक वस्तूंचे बाबतींत सुरू झाली. युद्धकाळांत नियंत्रणें व वांटप पद्धति ह्या गोष्टी आंतरराष्ट्रीय व्यापार व नेहमींचें उत्पादन बंद पडल्यामुळें सरकारला कशा सुरू कराव्या लागतात, याचा अनुभव दुसऱ्या महायुद्धांत पुष्कळ देशांना आला. हा अनुभव पुन्हा कधीं महायुद्ध झाल्यास उपयोगी पडेलच, परंतु कोणत्याहि सरकारला आर्थिक नियोजन करावयाचें झाल्यास हा अनुभव मार्गदर्शक ठरेल.

अन्नविषयक जागतिक टंचाईला तोंड देण्यासाठीं युद्धाच्या अखेरच्या काळांत अन्न-सल्लागार मंडळ अस्तित्वांत आलें व त्याच्या सल्ल्यानुसार धान्याचें वांटप निरनिराळ्या देशांत करण्यांत आलें. अन्नटंचाई जागतिक दृष्ट्या सोडविण्याचा हा पहिलाच प्रयत्न. अशा प्रकारच्या सल्लागार मंडळाच्या दिग्दर्शनाखालीं जागतिक धान्याचा व्यापार चालल्यास शांततेच्या काळांतहि धान्याचें कमी उत्पादन असणाऱ्या देशांना जरूर त्या अन्नाची टंचाई भासणार नाहीं. व्यापारी जगांत सहकार साधण्याचें हें एक चांगलें उदाहरण आहे. तांदुळासारख्या पिकाची लागवड कशी सुधारतां येईल, याहि प्रश्नाकडे हल्लीं लक्ष दिलें जात आहे.

### पुनर्घटना

महायुद्धानंतर अमेरिकेच्या पुरस्कारानें आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना ही संस्था निर्माण झाली आहे. जगाच्या निरनिराळ्या देशांतील व्यापार मोकळेपणानें चालावा, कोणत्याहि राष्ट्रानें सामान्यपणें संरक्षक जकाती ठेवून व्यापाराची कोंडी करूं नये, जगांत कोठेंहि बेकारी असूं नये, कोणत्याहि देशाच्या भांडवलाला इतर देशांत प्रवेश असावा, जगांतील संपत्तीचें उत्पादन वाढावें, ह्या उच्च ध्येयानें ही संस्था स्थापन झाली आहे. ह्या संस्थेचें उद्दिष्ट थोडेंबहुत साध्य झालें तरी मानवी सौख्यांत भर पडेल. १९२९ नंतरची अमेरिकेंत सुरू झालेली मंदी सर्व जगाला दुसरें महायुद्ध सुरू होईपर्यंत भोंवली. हें लक्षांत घेतां, आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेसारखी संस्था जागतिक मंदी ताब्यांत आणूं शकेल असें वाटतें.

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेर 'युद्धोत्तर पुनर्घटनेच्या' प्रश्नाकडे जगांतील प्रमुख देशांचें लक्ष वळलें. हिंदुस्थानमध्येंहि टाटा-बिर्ला ही पुनर्घटनेची योजना खाजगी रीत्या पुढें आली. महायुद्ध संपल्यानंतर पुनर्घटना करणें कसें आवश्यक आहे हें सर्वांना पटलें व अशी पुनर्घटना करतांना समाजांतील शेतकरी, मजूर, मध्यम वर्ग व भांडवलदार ह्या सर्व वर्गांचें हित साध्य करण्याकडे कोणत्याहि योजनेची दृष्टि असते. पुनर्घटना आली कीं तेथें आर्थिक नियोजन आलेंच; व हें आर्थिक नियोजन सरकारतर्फे असल्यामुळें वैयक्तिक हितसंबंधांना मुरड घालून जास्तींत ज्यास्त सार्वजनिक हिताकडे लक्ष दिलें जातें. अशा तऱ्हेचा हा उपक्रम नवीन आहे व ह्या उपक्रमाचे अर्थशास्त्राच्या प्रत्येक भागावर परिणाम होतील. भांडवलदार वर्गामध्यें समतेची दृष्टि निर्माण व्हावयाला त्यामुळें मदत होईल, व सरकारचें कार्यक्षेत्र त्यामुळें बरेंच विस्तृत होईल. 'यूनो'च्या एका कमिटीनें आशिया खंडांतील मागसलेल्या देशांची आर्थिक पाहणी करून त्या देशांची सुधारणा करण्यासाठीं काय केलें पाहिजे, याबद्दलचा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. प्रेसिडेंट ट्रुमन यांचाहि दृष्टिकोन जगांतील मागसलेल्या देशांना आर्थिक उन्नति करण्यासाठीं मदत करणें हा आहे. पुनर्घटनेच्या प्रश्नांकडे याप्रमाणें लक्ष दिलें जात आहे, ही गोष्ट महायुद्धाचाच परिणाम आहे. जपानचेंहि औद्योगिक जीवन जवळ जवळ पूर्ववत् सुरू करण्याचें अमेरिकेनें ठरविलें आहे.

विश्वासाची सहस्रपटींनीं वाढ.
कामाची तत्परता, चोख व्यवहार व मूर्तिमंत स्नेह इ. गोष्टी

कॉमनवेल्थ विमा कंपनी
लि. पुणें

चें वैशिष्ट्य म्हणून दाखवितां येतील.
अनेक कुटुंबांनीं अत्यंत तत्परतेनें कॉमनवेल्थ विमा कंपनीवरील आपला दृढ विश्वास प्रगट केला आहे.
कर्तबगार प्रतिनिधींना आकर्षक अटी व सवलती.
विशेष माहितीकरितां कृपेनें लिहा.

श्री. म. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर.

कुलाबा

★ धुण्याचे सर्व प्रकारचे साबण.
★ फिनाईल्स व इतर जंतुनाशकें.
★ ब्लॅक व गुलाबी टूथपावडर्स.
★ ब्रिलियंटाईन व टॉयलेट पावडर्स.
★ हेअर ऑईल, वगैरे वगैरे.

महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख शहरीं आकर्षक अटींवर स्टॉकिस्ट नेमणें आहेत.

कुलाबा इंडस्ट्रीज
पनवेल — कुलाबा.

ज्योतिषशास्त्रांतील आश्चर्यकारक संशोधनामुळें
व अचूक तारीखवार भविष्य वर्तविण्याच्या पद्धतीमुळें नवभारतांत ख्यातनाम झालेले
राजज्योतिषी-सिद्धान्त गणिती
सायनाचार्य-श्रीधरशास्त्री जोशी
श्रीकानडा मारुती समोर, नाशीक.
( कारखानाधंद्याची प्रगति व व्यापारी भविष्य या बाबतींत निश्चित शास्त्रीय सल्ला देऊं. )

आपल्या कुटुंबियांची तसेंच आपल्या भविष्यकाळची योग्य तरतूद करण्यास जाणते लोक विमेदारांच्या मालकीची

दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनीच पसंत करतात.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर भेटा.

त्र्यं. द्वा. देशपांडे, बी. ए., एलएल. बी.
सेक्रेटरी.

व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी.
मॅनेजर.

दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी लि.
पायोनिअर हाऊस, ९४७ सदाशिव पेठ, पुणें शहर.

# सहकारी सोसायट्यांच्या कायद्याची पुनर्रचना करण्याची आतां वेळ आली आहे काय ?

( लेखकः—दत्तशर्मा )

कोणत्याही राष्ट्रांतील बहुसंख्य समाज हा आर्थिक विषमतेमुळें असंतुष्ट राहिला तर त्या देशांत अंतस्थ अस्वस्थता निर्माण होऊन तिची झळ सर्व राष्ट्रास सोसावी लागते असा सर्वत्र अनुभव आहेच. आपल्या देशांत व विशेषतः महाराष्ट्रांत सुमारे पाऊणशें वर्षापूर्वी हीच परिस्थिति निर्माण झाली होती. बहुतेक सर्व शेतकरी कर्जात बुडालेले असून त्यांतून आपली कधीच सुटका होण्याची त्यांना आशा न राहिल्यानें त्यांच्यापैकी कांहीं लोकांनीं सावकारांविरुद्ध बंड उभारून देशांत अस्वास्थ्य निर्माण केलें, हें महाराष्ट्राच्या इतिहासांत नमूद आहेच. सावकार व त्यांची कुळें यांची नातीं इतकीं दुरावलीं कीं कित्येक सावकारांना आपलीं नाकें अगर इतर अवयव यांना कायमचे मुकावें लागलें; तर कांहीं सावकारांचे खून झाले. या बंडानें एवढें मोठें स्वरूप धारण केलें कीं, या बंडामागील असलेली तीव्र आर्थिक विषमता ही कशी दूर करावी याबद्दल त्या वेळेच्या पुढाऱ्यांनीं अगर समाजसेवकांनीं अनेक दिशेनें विचार सुरू केले व त्यांनीं अनेक उपाय आपापल्या कल्पनेप्रमाणें सरकारास सुचविले. यापुढें खाजगी सावकाराची जागा सरकारनेंच घ्यावी; एकाद्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रासाठी स्वतंत्र अशी शेतकऱ्यांची बँक स्थापन करून त्या बँकेमार्फत त्या क्षेत्रांतील शेतकऱ्यांना कर्ज देण्याचा प्रयोग करून पहावा; लोकांनीं आपल्या अडचणी स्वतः आपणच सोडवाव्यात, मात्र त्या कामीं ते जे जे प्रयत्न करतील त्या त्या प्रयत्नांत सरकारानें त्यांना सढळ हातानें सर्व प्रकारची मदत करावी व आपली आर्थिक उन्नति परस्परांच्या मदतीनें व सहाय्यानें करवून घेण्यास त्यांना उत्तेजन द्यावें; वगैरे वगैरे अनेक सूचना सरकारकडे पाठविण्यांत आल्या. ही बंडाळी थांबविण्याचे कामीं सरकारनें विशेष लक्ष घालावें अशा आग्रहाच्या मागण्याहि करण्यांत आल्या. सरकारनेंही या सर्व सूचनांचा विचार करून व आलेल्या सूचनांपैकीं कांहीं प्रयोगादाखल अमलांत आणून शेवटीं ही गंभीर परिस्थिति सुधारावयाची असेल तर लोकांनाच आपली आर्थिक उन्नति करण्यास उद्युक्त करावें व त्याकामीं जरूर ते कायदे-कानू करून त्यांना जरूर ती मदत व प्रोत्साहन द्यावें असेंच ठरविलें.

### पहिल्या कायद्याचा हेतु

वर सांगितलेल्या पार्श्वभूमिकेवरून आधारलेला असा पहिला सहकारी क्रेडिट सोसायट्यांचा ( पतपेढ्यांचा ) कायदा हिंदुस्थान सरकारनें सन १९०४ सालीं मंजूर करून तो अमलांत आणला. हा कायदा मुख्यतः गरीब शेतकरी, कारागीर वगैरे लोकांत काटकसर, स्वावलंबन व सहकार्य या गुणांचा परिपोष व्हावा या हेतूनें करण्यांत आला होता, हें या कायद्याच्या सरनाम्यावरून स्पष्टपणें दिसून येईल.[१]

या सरनाम्यांतील " कनिष्ट आर्थिक पातळीचे " (of Limited Means) हे शब्द फार महत्त्वाचे आहेत असें आम्हांस वाटतें. हा कायदा गरिबांसाठीं करण्यांत आला होता व त्याचा गैरफायदा इतर लोक घेणार नाहींत हें बारकाईनें पाहिलें जावें अशा सूचना हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांना दिल्या होत्या असें दिसतें. त्याबाबत हिंदुस्थान सरकारनें केलेल्या ठरावांतील (ठराव नं १/६३/३ ता. २९।४।१९०४ डिपार्टमेंट ऑफ रेव्हिन्यू ॲंड अग्रिकल्चर ) कांहीं वाक्यें येथें उधृत केल्यास तें अस्थानीं होणार नाहीं असें वाटतें. सदर ठरावांतील परिच्छेद नं. ७,९, व १३ पहावेत.[२]

### गरीब कोणास म्हणावयाचें ?

वाचकांचे हें लक्षांत आलें असेल कीं समाजांतील आर्थिक दृष्टीनें गरीब अगर खालच्या पातळीवर असलेल्या शेतकरी, कारागीर वगैरे लोकांना कर्ज मिळण्याची सोय म्हणूनच सहकारी पतपेढ्या स्थापन व्हाव्यात. या संस्थांचा फायदा मोठाले शेतकरी अगर श्रीमान कारागीर यांना मिळता कामा नये. शेतकरी व कारागीर हे गरीब व श्रीमंत असे दोन प्रकारचे असूं शकतात हें या कायद्यानें मान्य केलें आहे. परंतु गरीब कोणास म्हणावें याची निश्चित व्याख्या अगर वर्णन या कायद्यांत कोठेंही केल्याचें दिसून येत नाहीं.

" कनिष्ट आर्थिक पातळीचे " कोणास म्हणावें हा प्रश्न आहे. हे शब्द सापेक्ष असल्यानें हिंदुस्थानांतील सर्वच छोटे-मोठे शेतकरी व कारागीर हे इंग्लंड-अमेरिकेंतील शेतकरी–कारागीर यांचे मानानें " कनिष्ट आर्थिक पातळीचे " आहेत यांत शंका नाहीं. हिंदुस्थानांतील शेतकरी-कारागीर यांच्यामध्यें दोन भाग करावयाचे म्हटल्यास कोणत्या मर्यादेचे आंतील लोकांना सहकारी संस्थांचा फायदा मिळावा व कोणास तो मिळूं नये हें ठरविणें फारच अडचणीचें आहे. असो.

या सहकारी सोसायट्यांच्या कायद्याची पुनर्रचना सन १९१२ सालीं करण्यांत आली हें सर्वश्रुत आहेच. या पुनर्रचनेचे वेळींही सदर कायद्याच्या सरनाम्यांत महत्त्वाचा असा फेरफार केल्याचें दिसून येत नाहीं.[३]

### कायद्याच्या व्याप्तींत वाढ

सन १९१२ च्या कायद्यांत मुख्यतः दोन-तीन सुधारणा करण्यांत आल्या. त्या म्हणजे सन १९०४ चा कायदा हा फक्त पतपेढ्यांनाच ( क्रेडिट सोसायट्यांना ) लागू करण्यांत आला होता परंतु त्या कायद्याची आतां व्याप्ति वाढवून तो पतपेढ्यांशिवाय इतर प्रकारच्या सर्व सहकारी संस्थांनाही लागू करण्यांत आला, पूर्वी सोसायट्यांचे ग्रामीण व नागरी एवढेच दोन विभाग मान्य केले होते ते रद्द करून त्या ऐवजी सोसायट्यांची वर्गवारी वेगळया एका शास्त्रीय पद्धतीवर करण्यांत आली, मध्यवर्ती सहकारी बँका काढण्यास परवानगी देण्यांत आली, इत्यादि फेरफार या नवीन कायद्यांत करण्यांत आले. तथापि हा कायदा सुद्धां गरीब शेतकरी-कारागीर वगैरेसाठीच आहे हें मूळ कायद्यांतील तत्त्व यांहीं कायद्यांत तसेंच कायम ठेवण्यांत आलें होतें.

पुढें कांहीं वर्षांनीं सहकारी सोसायट्यांची वेगवेगळया दिशेनें झालेली प्रगती व त्या चालविताना आलेल्या अनेक व्यावहारिक अडचणी या लक्षांत घेऊन तसेंच मध्यंतरी सन १९१९ सालीं प्रांतिक सरकारांना या विषयाबाबतचे कायदे करण्यास स्वायत्तता मिळाली होती तिचाही उपयोग करून मुंबई प्रांतानें सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांत आमूलाग्र अनेक फेरफार केले व हल्ली अमलांत असलेला सहकारी सोसायट्यांच्या कायदा सन १९२५ सालीं मंजूर केला, हें वाचकांना माहित आहेच. या कायद्याची रचना करताना सहकारी सोसायट्यांचा कायदा हा फक्त गरिबांसाठी आहे, त्याचा फायदा श्रीमंतांना मिळता कामा नये, या मूळ

# किर्लोस्कर वीव्हिंग मिल्स, सोलापूर

यांची

मोहक, टिकाऊ, पक्क्या रंगाचीं अशीं

## किर्लोस्कर पातळें

खालील विक्रेत्यांकडे मिळूं शकतील.

१ मुंबई—आठवले शहाडे आणि कंपनी लि., गिरगांव.
,, —जी. एस. म्हसकर लि., गिरगांव.
,, —गिरगांव पंचे डेपो लि., दादर.
२ पुणें—बलवंत एजन्सी, लक्ष्मी रोड.
३ विजापूर—व्ही. व्ही. रानडे.
४ हुबळी—हुबळी वस्त्र भांडार.
५ बेळगांव—नाईक बंधु.
६ हैद्राबाद—गजानन स्टोअर्स.

हिंदुस्थानांत पोस्टानें कोठेंही माल पाठवितां येतो.



# ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कंपनी लि.

( हिंदुस्थानांत स्थापन झालेली हिंदी कंपनी ).
( हेड ऑफिसः-मेहता हाऊस, अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई )

मोटार, फायर, मरीन वगैरे क्षेत्रांत सतत पंचवीस वर्षांपेक्षां जास्त

यशस्वी रीतीनें काम करून जनतेच्या विश्वासास पात्र झालेली आतां

## आयुष्याचा विमा

स्वीकारूं लागली आहे.

महाराष्ट्र व कर्नाटक प्रांतांत एजंट व ऑर्गेनायझर होऊं इच्छिणाऱ्यांनीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावें.

मोतीमाणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड, पुणें.

ब्रँच मॅनेजर
ब्रिटिश इंडिया जनरल
इन्शुअरन्स कं. लि., पुणें.



नवीन वर्ष आमच्या सर्व सभासदांना व गिऱ्हाइकांना सुखाचें जावो.

# दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

( स्थापनाः २४ जानेवारी, १९१७ )

चेअरमनः—श्री. पु. पां. गोखले, बी. ए., एम्. एल. ए.

| | रुपये |
|---|---|
| भाग वसूल भांडवलः | १,४१ ७०० |
| गंगाजळी व इतर निधीः | १,७६,२५० |
| एकूण ठेवींची रक्कम : | २२,७५,४२५ |
| एकूण खेळतें भांडवलः | २६,७५,००० |

सभासद प्रॉ. फंड ह्या अभिनव योजनेंत सभासद उत्साहानें भाग घेत आहेत.

ठेवींचे दरः—( १ ) चालू ठेवः रु. ०–१२–० ( २ ) सेव्हिंग्ज ठेव : रु. १–११–० ( ३ ) मुदत ठेव रु. ३%

सतत १८ वर्षें ' अ ' वर्गांत दाखल असलेली ही बँक ठेवीदारांचा विश्वास व सभासदांचें सहकार्य यांचे बलावर स्वातंत्र्याचे काळांत जनतेची सेवा अधिक प्रमाणांत करण्याची उमेद बाळगते.

शं. पु. कुलकर्णी
मॅनेजिंग डायरेक्टर.



# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापनाः-१९३५ )

( २४–९–१९४९ रोजीं )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १,०९,२८० |
| रिझर्व्ह फंड | रु. ३३,०४६ |
| इतर फंड | रु. ३६,६०० |
| ठेवी | रु. ११,८७,७४२ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १४,६६,६६८ |

डायरेक्टर्स

(१) श्री. ग. कों. गोडबोले, B. A., LL. B. चेअरमन.
(२) ,, ज. वि. करमरकर, सराफ.
(३) ,, गं. गो. विनीवाले.
(४) ,, म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
(५) ,, अ. वि. इनामदार.
(६) ,, ल. द. भिडे.
(७) ,, वा. वि. वाटवे, B. A., LL. B.
(८) ,, ग. का. दांडेकर.
(९) ,, म. ल. महाबळ.

बँकिंगचीं सर्व कामें केलीं जातात.

ल. ब. लागू, B. A., LL. B.,
मॅनेजर.

तत्त्वाचा बराच खल होऊन " कनिष्ठ आर्थिक पातळीच्या " या ऐवजी " सारख्या आर्थिक गरजा असणारा" ( विथ कॉमन् एकॉनॉमिक नीड्स् ) हे शब्द दाखल करण्यांत येऊन सरनाम्याची भाषा पुन्हा ठरविण्यांत आली. [४]

सन १९२५ चा कायदा करताना त्याचा फायदा गरिबांशिवाय इतरांना मिळूं नये या तत्वास जरी बगल देण्यांत आली व गरिबाप्रमाणें इतरांनाही आपल्या संघटना करून त्यांचे मार्फत या कायद्याचा फायदा उपभोगण्याची मोकळीक देण्यांत आली, तरी या श्रीमंतांनीं आपले संघ सहकार्याचे आधारावर प्रथम स्थापन केले पाहिजेत, ही अट चालू ठेवलीच. गरिबाप्रमाणें श्रीमंतांनाही आपापल्या सोसायट्या काढण्यास परवानगी मिळाली. गरिबांच्या संघांत कांहीं थोड्या श्रीमंतांना घुसून आपला वैयक्तिक फायदा करून घेण्यास आतां सदर परवानगी मिळाली आहे असा याचा अर्थ नव्हे. तसेंच शेतकऱ्यांच्या ( ॲग्रिकल्चरल ) बँका व सहकारी सोसायट्या यांच्यांतील मूलभूत असलेला फरक आतां नष्ट करण्यांत आला असाही याचा अर्थ होऊं शकणार नाहीं.

### कामकाजांतील स्थित्यंतर : कायदा बदला

हिंदुस्थानांतील पतवान शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारें अल्प व लांब मुदतीचें भांडवल पुरविण्याची व्यवस्था झाल्याशिवाय त्यांची उत्पादन शक्ति वाढणार नाहीं व, मग शेतकीपासून व्हावयास पाहिजे असलेलें कमाईचें अधिक उत्पन्न राष्ट्रांत निर्माण होणार नाहीं, ही अडचण लक्षांत घेऊन त्यावर उपाय सुचविण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक समिति प्रि. धनंजयराव गाडगीळ यांचे अध्यक्षतेखालीं नेमली होती हें वाचकांना माहित असेलच. सदर समितीनें अशी शिफारस केली आहे कीं हिंदुस्थानांतील वेगवेगळया प्रांतांनीं यासाठी सरकार पुरस्कृत अशी एक स्वतंत्र ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशन या नांवाची संस्था स्थापन करून तिचे मार्फतीनें त्या प्रांतांतील सर्व पतवान शेतकऱ्यांना लागणारें सर्व प्रकारचें भांडवल पुरविण्याची व्यवस्था करावी. मात्र ज्या प्रांतिक सरकारांस असें वाटत असेल कीं, आपल्या प्रांतांतील सहकारी चळवळीची प्रगती योग्य प्रकारें झाली असल्यामुळें अशी शेतकऱ्यास कर्ज देणारी स्वतंत्र संस्था स्थापन न करतां हें काम सहकारी संस्थांमार्फत करवून घ्यावें, त्या प्रांतांत तशी व्यवस्था करून पहाण्यास हरकत नाहीं, अशीही पुस्ती सदर सूचनेस जोडण्यांत आली होती. समितीच्या दृष्टीनें असे प्रांत फक्त मुंबई व मद्रास हे दोनच आहेत. गाडगीळ समितीच्या या सूचनेचा विचार होऊन आपल्या प्रांताचे दृष्टीनें असें ठरविण्यांत आलें आहे कीं, या प्रांतांतील सर्व पतवान शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारें सर्व प्रकारचें कर्ज सहकारी सोसायट्या अगर मध्यवर्ती बँकांकडून, अशा शेतकऱ्यांना सभासद अगर तें शक्य झालें नाहीं तर नाममात्र सभासद करून घेऊन, देण्यांत यावें. या योजनेमुळें गरीब व श्रीमंत शेतकरी लोकांची एकाच संस्थेंत खिचडी होईल व त्यामुळें संघामध्यें जी एकता असावयास पाहिजे ती रहाणार नाहीं व सहकारी सोसायटीस हळूहळू शेतकऱ्यांच्या बँकेचें (ॲग्रिकल्चरल बँकेचें) स्वरूप प्राप्त होईल. शेतकऱ्यांची बँक व सहकारी सोसायटी यांची मांडणी भिन्न भिन्न पायावर असावयास पाहिजे हें जें तत्त्व सन १९०४ चा कायदा तयार करताना सरकारच्या नजरेसमोर होतें तें तसें यापुढें बदललेल्या परिस्थितीनुरूप राहूं शकणार नाहीं अशी परिस्थिति आहे. जर सहकारी सोसायटीनें शेतकऱ्यांच्या बँकेचें काम करावें हें इष्ट वाटत असेल तर त्याप्रमाणें कायद्यांत स्पष्टपणें नमूद होणें जरूर आहे. ज्याप्रमाणें श्रीमंतांनाही आपापले संघ स्थापन करण्यास परवानगी देणें इष्ट वाटल्यावरून सन १९२५ चे कायद्यांत त्याप्रमाणें योजना करण्यांत आली, त्याचप्रमाणें आतां शेतकी सहकारी सोसायट्यांत शेतकऱ्यांचे बँकेचा समावेश होत आहे असें नमूद व्हावें असें आम्हांस वाटतें. तसेंच " सारख्या आर्थिक गरजा असणारे " या शब्दामधील " सारख्या " याचाही अर्थ अधिक स्पष्ट करता आल्यास तोही करण्यांत यावा. " सारख्या " याचा अर्थ कर्जाचें कारण समान असावें एवढेंच समजावयाचें किंवा घावयाच्या कर्जाच्या रकमेंत समानत्व असावयास पाहिजे, अशीही शंका निर्माण होते. अशी शंका यापुढें राहूं नये म्हणून सरनाम्यांतील शब्दरचनेंत फेरफार करणें जरूर आहे काय, याचा कायदेपंडितांनीं विचार करून सहकारी खात्यास आपल्या सूचना करण्याची आतां वेळ आली आहे असें आम्हांस वाटतें. आपला सहकारी कायदा मंजूर होऊन सुमारें २५ वर्षे होत आलीं असल्यामुळें व दरम्यानचे काळांत सहकारी संस्थांचे कामकाजांतही अनेक स्थित्यंतरें झालीं असल्यानें या कायद्याची आतां पुनर्रचना करण्याची वेळ आलेली आहे असें आमचें मत आहे व त्या दृष्टीनें सरकारनें या विषयाचा विचार करावा अशी आमची त्यास नम्र सूचना आहे.

---

१ हा सरनामा पुढीलप्रमाणें आहेः—

"Whereas it is expedient to encourage thrift, self-help and Co-operation among agriculturists, artisans and persons of limited means and for that purpose to provide for the constitution and control of Co-operative Credit Societies, It is hereby enacted as follows":—

२ The object of agricultural banks is to provide capital to finance the general agriculture of the country; their operations are of ordinary banking nature and on a considerable scale; and whatever special privileges it might be found possible to extend to them, the ordinary companies Law of India would still continue to apply to them. The object of the societies contemplated by this Act ( X of 1904) is far more special and limited. ... ... ... They will be "small and simple credit societies for small and simple folk with simple needs and requiring small sums only."

'And thirdly, since they ( societies ) were to enjoy exemption from the general law and facilities of special nature, it was necessary to take such precautions as might be needed in order to prevent speculators and capitalists from availing themselves, under colourable pretexts, of privileges which were not intended for them.'

'Local Governments should remember, however, that the object of the Act (X of 1904) is mainly to assist small people, and should take precautions against its provisions being made use of by persons for whom they were not intended.'

३ हें सदर कायद्याच्या खालील सरनाम्यावरून दिसून येईलः—

"Whereas it is expedient further to facilitate the formation of Co-operative Societies for the promotion of thrift and self-help among agriculturists, artisans and persons of limited means and for that purpose to amend the law relating to Co-operative Societies: It is hereby enacted as follows :—"

४ हा सरनामा पुढीलप्रमाणें आहेः—

'Whereas it is expedient further to facilitate the formation and working of Co-operative Societies for the promotion of thrift, self-help and mutual aid among agriculturists and other persons with common economic needs so as to bring about better liv,ng, better business and better methods of production and for that purpose to consolidate and amend the law relating to Co-operative Societies in the Presidency of Bombay ... ... ... It is hereby enacted as follows:—"

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,१३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार

या बँकेमार्फत केले जातात.

**ना. पां. ठाणेदार** — मॅनेजर

**भ. अं. दप्तरदार**, बी. ए. — चेअरमन.



## भोर स्टेट बँक लि.

### मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६७,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलूएल्. बी.
श्री. वा. ग. धंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

पुणें कचेरी ५१५ बुधवार — अधिक माहितीसाठी लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.) मॅनेजर.



## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

*—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

**श्री. बी. बी. पाटील**, B. A., LL. B., वकील सांगली, चेअरमन

**श्री. गं. सि. चौगुले**, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर



## बांठिया बँक लिमिटेड

हेड ऑफिस—पनवेल जि. कुलाबा.

| | |
|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ४,७७,२५० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ४७,००० |
| खेळतें भांडवल | रु. ६३,००,००० |

शाखा

| | |
|---|---|
| मुंबईः—६५।६७ झव्हेरी बझार. | पुणें:—१२६८ भवानी पेठ. |
| अहमदनगरः—बझार पेठ. | बेलापूररोडः—पोस्टासमोर, |
| कल्याणः—शिवाजी चौक. | भिवंडीः—बझार पेठ. |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्रीमंत शेट रतनचंद भिकमदास बांठिया-अध्यक्ष.
" " केशरचंद आनंदराम बांठिया.
" " खिवराज आनंदराम बांठिया.
" " बिरदीचंद भूरचंद बांठिया-मॅ.डायरेक्टर.
" " चुनिलाल जसरूप मुनोथ.
" " रवजी भिमजी रंगपरिया. (ऑ. मॅजिस्ट्रेट.)
श्रीमंत गंगाधर विष्णू ऊर्फ नानासाहेब पुराणिक.
श्री.रा. केशव गोविंद लिमये बी. ए. एलएल., बी. वकील पनवेल.
" जे. एस. कासट बी. कॉम.
" एस. आर. घासवाला (सेंट्रल ऑटो सर्व्हिस)
" ताराचंद दगडूराम भंडारी कापडाचे व्यापारी अहमदनगर.

श्री. रा. गणेश भैरव साठे, जनरल मॅनेजर.

★ *बँकिंगचीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात.* ★

*विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.*

श्री. आर. पी. जोशी, B. A., Cert. A. I. I. B. मॅनेजर.

# उद्यम स्वातंत्र्यावर नियंत्रण नको !

## ' शॉप्स ॲन्ड एस्टॅब्लिशमेंट्स ॲक्ट ' मध्यें कांहीं आवश्यक दुरुस्त्या

लेखकः-श्री. स. वा. दातार, बी. एस्सी., एलएल. बी.

' मुंबई प्रांतांतील दुकानें व व्यवसाय केंद्रें ह्यांच्या कायद्या'-बाबत साप्ताहिक ' अर्थ ' नें बरीच महत्त्वाची कामगिरी आजपर्यंत केली आहे व ती शुद्ध विधायक दृष्टीनें केली आहे ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे.

### ' अर्थ ' ची कामगिरी

१९४७ च्या प्रारंभास मुंबई सरकारनें एक समिति नेमली व तिजकडे दुकानें व व्यावसायिक कचेऱ्या ह्यांमध्यें काम करणाऱ्या नोकरवर्गाच्या हितसंरक्षणार्थ तत्कालीं प्रचलित असलेल्या कायद्याची अंमलबजावणी कशी होत आहे व त्या कायद्यांत कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत? ह्या प्रश्नाचा विचार करण्याची कामगिरी त्या समितीकडे सोंपविली. तदनुसार त्या समितीपुढें मांडण्यासाठीं साप्ताहिक ' अर्थ ' नें आपल्या २ जुलै १९४७ च्या अंकांत दोन महत्त्वाच्या सूचना तदनुषंगिक विवेचनासह प्रसिद्ध केल्या. पुढें ३ ऑगस्ट १९४७ रोजीं समितीच्या निमंत्रणावरून साप्ताहिक ' अर्थ ' तर्फे श्री. स. वा. दातार ह्यांनीं साक्षहि दिली. ' अर्थ ' मध्यें ज्या दोन सूचना मांडल्या होत्या त्या अशा: (१) नोकरास कामावरून काढण्यापूर्वी कांहीं विशिष्ट मुदतीची नोटीस त्यास देणें आवश्यक असल्याचें कायद्यांत ग्रथित करावें व (२) थकलेला पगार वसूल करून मिळण्यासाठीं ' पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट ' खालील सुलभ व स्वस्त उपाय उपलब्ध असावा. ह्या दोन्हींहि सूचना नव्या कायद्यांत स्वीकारल्या गेल्या आहेत हें निराळें सांगावयास नकोच.

त्यानंतर नवा कायदा अंमलांत येण्यापूर्वी अत्यंत जागरूकपणानें त्या कायद्याची ' व्यावसायिकांसाठीं संपूर्ण सुबोध माहिती ', साप्ताहिक ' अर्थ ' नेंच सर्वांचे आधीं व जनतेच्या ऐन गरजेच्या वेळीं स्वस्त दरांत प्रसिद्ध केली आहे. अशा प्रकारें साप्ताहिक ' अर्थ ' ची भूमिका प्रथमपासूनच विधायक होती व आजहि त्याच दृष्टीनें पुढील विचार मांडलेले आहेत.

### उद्यम स्वातंत्र्यावर नियंत्रण

नव्या कायद्याचा एक फार मोठा दुष्परिणाम अनपेक्षितपणें घडून आला आहे, तो असा कीं, त्याचेमुळें कामगारांच्या व नोकरांच्या उद्यम स्वातंत्र्यावर निष्कारण व गैरवाजवी नियंत्रण न कळत घातलें गेलें आहे.

कामगारांना व नोकरांना नव्या कायद्याखालीं दर दिवशीं नऊ तासांपेक्षां व आठवड्यांत अठ्ठेचाळीस तासांपेक्षां जास्त काम करता येणार नाहीं. ह्या मूलभूत कामाच्या तासांमध्यें अगदीं मोजक्या व अल्प अशा जादा कामाच्या तासांची भर घालतां येण्यास वाव आहे. पण तो सबंध वर्षांतल्या कांहीं दिवशींच असून अगदीं अपुरा आहे. शिवाय, अशा जादा कामाबाबत आगाऊ अथवा तदनंतर तावडतोब अधिकाऱ्यांना नोटीस देणें आवश्यक ठरविण्यांत आलें आहे.

कामगारांना व नोकरांना साप्ताहिक सुट्टी देणें आवश्यक आहे व म्हणून सर्व दुकानें व व्यवसायकेंद्रें आठवड्यांतून एक दिवस बंद ठेवण्याची सक्ति झालेली असून अशा सुट्टीवर अथवा वार्षिक भरपगारी रजेवर असलेल्या नोकरास काम देणें अथवा काम करूं देणें हा गुन्हा ठरविण्यांत आला आहे.

अनपेक्षितपणें वरील दोन्ही गोष्टींचा परिणाम असा झाला आहे कीं, नोकरांचें उद्यमस्वातंत्र्य हिरावून घेतलें गेलें आहे.

### सक्ति नको पण खुषीला वावहि हवा !

कायद्याचें बंधन नसल्यामुळें पूर्वी मालक लोक नोकरांकडून हवा तेवढा वेळ चोपून काम करून घेत होते. पूर्वीच्या कायद्यांतहि साप्ताहिक सुट्टी नोकरांना देणें आवश्यक होतें. पण त्यासाठीं आठवड्यांतून एक दिवस सक्तीची टाळेबंदी आवश्यक नव्हती; व आळीपाळीनें नोकरांना सुट्ट्या देण्यासहि मुभा होती. ह्या गोष्टींचा फायदा गफलतबाजी करून नोकराला सुट्टी न मिळूं देण्याकडे होणें शक्य होतें हीहि गोष्ट खरी. त्यामुळें वरील प्रकारच्या योजना कायद्यामध्यें ग्रथित करण्यांत विधिमंडळाचा सद्धेतूच दिसून येतो यांत वाद अथवा शंका नाहीं. परंतु अशा प्रकारच्या कायद्यांचा हेतु हा नोकरवर्गावर अनियंत्रितपणें जिवापाड श्रम सक्तीनें लादले जावूं नयेत एवढाच आहे व एवढाच असावयास पाहिजे. त्यापलीकडे खुषीच्या मेहेनतीला व चढाऊ वृत्तीच्या उद्यमशीलतेला वावच उरूं नये असा मात्र ह्या कायद्याचा हेतु वा परिणाम असावयास नको.

### उद्यमशीलतेची आवश्यकता

आजच्या नोकरवर्गांत उद्यमशीलतेची व जादा परिश्रमांची आवश्यकता वा अपरिहार्यता ज्यांना आहे असे लोक पुष्कळच आहेत. नोकरांचे कामाचे तास ह्या कायद्यानें नियमित केले आहेत खरे; परंतु तेवढ्या नियमित तासांचें काम करून आपल्या गरजा भागण्याइतका किमान पगार प्रत्येक नोकरास मिळावाच अशी तरतूद वा हमी कांहीं ह्या कायद्यांत नाहीं, ही गोष्ट जरूर ध्यानांत घेण्यासारखी आहे. बरें, किमान पगार ठरवून देता येईल अशी आपली विद्यमान अर्थव्यवस्थाहि नाहीं आणि दुकान मालकांची आर्थिक परिस्थितीहि नाहीं. किमान पगार ठरवितांना नोकर जें काम करीत असेल तें तेवढें लक्षांत घेऊन कांहीं तरतुदी करण्याचा विचार ठरवला तर मोठीच दिशाभूल होईल. कारण, किमान पगार ठरविण्यास नोकराच्या गरजा लक्षांत घ्याव्या लागतील; व तात्त्विक दृष्ट्या सध्यांच्या जीवनमान-निदर्शक आंकड्याप्रमाणें ( कॉस्ट ऑफ लिव्हिंग इंडेक्स) तरी पगार प्रत्येक नोकरास द्यावा लागेल. मग तो दरवाजावर बसणारा पहारेकरी असो वा मालकाला चहा आणून देणारा पोऱ्या असो ! अशी कांहीं सध्याची आपल्या देशाची अर्थव्यवस्था नाहीं. देशांतील सर्व नागरिकांची उपजीविका सरकारनें स्वतःकडे घेतलेली नाहीं. तेव्हां आपल्या स्वतःच्या परिश्रमानें आपल्या स्वतःच्या कमी-जास्त गरजा भागविण्यास ह्या कायद्यानें प्रतिबंध व्हावा ही गोष्ट अपेक्षित नाहीं. शिवाय, सध्याच्या समाजव्यवस्थेंत आपल्या नोकर वर्गांत केवळ स्वतःच्या वैयक्तिकच नव्हे तर आप्तेष्ट परिवाराच्याहि कमी-अधिक जबाबदाऱ्या वाहणारे लोक आहेत. अशा परिस्थितींत खुषीच्या उद्यमशीलतेवर नियंत्रण येणें म्हणजे ' आई जेवूं घालीना व बाप भीक मागूं देईना ' अशीच अवस्था निर्माण करणें होय !

### आरोग्यरक्षणाची सबब सांगतां येणार नाहीं !

समाजांतील कोणाहि व्यक्तीनें अमर्यादित कष्ट करून आपल्या शरीरसंपदेची व जीवनाची हानी करून घेऊं नयें ह्या बाबत जागरूकता सरकारनें घेणें हें केव्हांहि उचीतच होय. परंतु आपल्या

व आपल्या परिवाराच्या प्राथमिक गरजाहि पुरेशा भागविल्या जात नसतांना व अंगीं धमक असूनहि उपाशी पोटीं व उघड्या अंगानें सक्तीची विश्रांति नशिबीं येईल तर त्यापासून आरोग्यरक्षण होणें कदापि शक्य नाहीं. दुसऱ्याकरितां माणसानें मोलानें किती श्रम करावे याला मर्यादा जरूर आहे व ती नव्या कायद्यानें जी घालून दिली आहे ती वावगीहि नाहीं. परंतु खुषीच्या श्रमांना मर्यादा घालतांच येणार नाहीं; खुषीच्या श्रमांनीं मनुष्याची आरोग्य हानीं होणें अगदीं दुरापास्त आहे. जादा श्रम हा जादा महत्त्व प्राप्त करून घेण्याचा मनुष्यप्राण्याचा निसर्गसिद्ध मार्ग आहे, व तो मोकळा राहण्यांतच व्यक्तीच्या व समाजाच्या प्रगतीची आशा आहे. जगांत पुढें आलेले व मान्यता पावलेले बहुतेक सर्व लोक जादा श्रम करूनच पुढें आलेले आहेत. म्हणून माणसांच्या उद्यम स्वातंत्र्यावर नियंत्रण घालणें मुळीच हितप्रद नाहीं. सायंकाळीं ८–८॥ पासून सकाळीं ८–८॥ पर्यंत व्यवहारबंदी असणें आणि रात्रीं १२–१२॥ पासून सकाळीं ५ पर्यंत भटकत फिरण्यास बंदी असणें ह्यांत गैर कांहीं नाहीं, व त्याला विरोधहि येथें दर्शवावयाचा नाहीं. परंतु मर्जी असेल तेव्हां रात्रीचे दिवसहि करून दुसऱ्यास उपद्रव न देतां हवें तें धंदा–उद्योगाचें काम जागच्याजागीं मन मानेल तोंपर्यंत करावयास पूर्ण मोकळीक असलीच पाहिजे.

## समाजाची गरज

सध्यांच्या समाजाच्या परिस्थितींत तांतडीनें कामें करून घेण्याची जरूर पदोपदीं पडते. कित्येक कामें हंगामी असतात व तीं त्याच वेळीं उद्भवून त्याच वेळीं पुरीं व्हावीं लागतात. गणपतीच्या मूर्ती कलाकार लोक गणेशचतुर्थीचे आधी महिना–दीड महिना रात्ररात्र जागून पुऱ्या करीत असतात. दसऱ्याचे आधी दुकानांच्या पाट्या रंगवण्याचें काम एकदम निघतें व जादा तास काम केल्याशिवाय तें पुरें होऊं शकत नाहीं. नाटक-सिनेमा ह्यांचे नवे खेळ लागावयाचे झाले कीं पडदे, जाहिराती, भित्तिफलक वगैरे रंगविण्याचें व छपाईचें काम एकदमच निघतें व तें तांतडीनेंच पुरें करावें लागतें. लग्नसराईत किती तरी विवाह एकदम ठरतात व अगदीं नजीकचे मुहूर्त धरावे लागतात. अशा वेळीं वधुवरांचे पोषाख वगैरे शिवणें तांतडीचेंच काम ठरतें. कित्येक वेळां इमारतींचे बांधकाम, दुरुस्ती अथवा रंगकाम वगैरे तांतडीनें उरकण्याची आवश्यकता असते. अशा अनेकविध प्रसंगीं नोकरांना आपली करामत दाखवून धंद्याच्या स्पर्धेत आघाडी मारणें आवश्यक व आपखुषीचें असतें.

समाजानें आपले वरील प्रकारचे व्यवहार अशा तांतडीनें ठरवूं नयेत, नियोजनपूर्वक ठरवावेत, हें म्हणणें ठीक आहे. कायद्याचा उपयोग समाजांत सुधारणा करण्यासाठीं करणेंहि अयुक्त नाहीं. परंतु कायदा करतांना समाजाची विद्यमान अवस्था, त्या अवस्थेंतील समाजाच्या गरजा, त्या पुऱ्या होण्यास उपलब्ध असलेलीं साधनें व मार्ग आणि कायद्याचे अनभिप्रेत व अभिप्रेत परिणाम लक्षांत घेणें जरूर असतें. वर्षावर्षांच्या योजना व कार्यक्रम आंखून त्यांच्यासाठी आर्थिक तरतूद करून ठेवण्यासारखी सध्यां आपल्या समाजांतील किती टक्के लोकांची तयारी आहे ? सध्यांचे समाजजीवन व आर्थिक परिस्थिती अस्थिर नाहीं काय ? मग निष्कारण नागरिकांच्या उद्यम स्वातंत्र्यावर नियंत्रण घालण्यांत काय राम आहे ?

## अडचणीची पळवाट

नोकरानें अंगावर घेऊन एखादें काम करावयास हरकत नाहीं अशी पळवाट नव्या कायद्यांतूनहि काढतां येण्यासारखी आहे व काढली जात आहे; परंतु ती सर्वच ठिकाणीं सोईची नसून बहुतांशीं अडचणीचीच आहे. एक तर नोकरांना अंगावर घेतलेलें काम दुकानाची वेळ संपल्यावर दुकानांत बसून करतां येण्यासारखें नाहीं व काम घरीं न्यावें तर जागा, साधनें, हत्यारें, उसंत, ह्या सर्वांचीच अडचण असते. नोकरानें शिवणाचे जादा काम अंगावर घेऊन घरीं न्यावें तर घरीं मोकळ्या जागेबरोबरच शिवण्याचें यंत्रहि असावयास पाहिजेत. सध्याच्या जागेच्या टंचाईच्या दिवसांत नोकरांच्या प्रपंचाला सामान्यपणें किती जागा वाट्याला आलेली असते त्याची कल्पनाच केलेली बरी. घरीं जादा मोकळें मशिन राखून ठेवावें त्यास ३।४ शें रुपयांची किंमत असते. एवढा पैसा गांठी असून तो मशीनमध्यें अडकवून ठेवता यावा अशी आपल्या समाजांतील नोकरीधंद्याच्या लोकांची सर्व सामान्य स्थिति आहे काय ? ह्याच प्रकारचे विचार अन्य धंद्यांच्या बाबतींतहि कमी अधिक फरकांत लागू पडणारे आहेत. अशा परिस्थितींत व्यवहारबंदी व संचार बंदी विशिष्ट कालानंतर असली तरी उद्योग–धंद्याच्या नेहमींच्या जागीं हवा तेवढा वेळ बसून स्वतःला परवडेल तेवढें जादा काम करण्याच्या नोकरांच्या उद्यम स्वातंत्र्यावर बंदी मात्र मुळींच नको ! जादा कामाबाबत कोणाहि नोकरावर कोणत्याहि प्रकारें सक्ती होता कामा नये; व जादा कामाबद्दल कायद्यानें ठरवून दिलेल्या जादा दरानें नोकरास वेतन मिळालें जावें; हे दोनच नियम कायद्यानें कडकपणानें घालून द्यावे एवढीच योजना ह्या बाबतींत सद्यः परिस्थितींत न्याय्य व हितप्रद ठरणार आहे. अशा प्रकारची पहिली दुरुस्ती ह्या कायद्यांत झाली पाहिजे.

## औचित्यभंग व मर्यादातिक्रम

शॉप ॲक्टखालीं शाळा कॉलेजांकडून फॉर्म्स भरून घेण्यांत आलेले आहेत. ह्या प्रकारांत फार मोठा औचित्यभंग व मर्यादातिक्रम घडून आला आहे असें खेदानें म्हणावें लागतें. शाळा कॉलेजांत ज्ञानाचा बाजार व दुकानें मांडलीं आहेत व तेथील व्यवहार भाडोत्रीपणानें चालले आहेत असें मानणें कदाचित् वस्तुस्थितीला शोभणारें असलें तरीहि सौजन्याला, शिष्टाचाराला व सामाजप्रतिष्ठेला धरून बिलकूल नाहीं ! त्यामुळें शाळा कॉलेजांतील शिक्षक–प्राध्यापकांना दुकान नोकरांच्या दावणींत आणून बसवण्यांत ‘श्वानं युवानं मघवानम्’ असा प्रकार न कळत घडून आला आहे. प्रापंचिक व्यवहाराच्या दृष्टीनें शिक्षक प्राध्यापकांना रुपये–आणे–पैंत पगार देणें अपरिहार्य असलें तरी त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का लावणें गैर ठरतें. राष्ट्राच्या ज्या भावी पिढीला ज्ञानदानाचें महत्त्वाचें कार्य हा नोकरवर्ग करीत असतो त्याबद्दल विपरित भावना विद्यार्थ्यांच्या कोंवळ्या मनांत उद्भून होणें ही गोष्ट समाजहिताची मुळींच नाहीं. शिवाय, शिक्षणसंस्थांतील कामाचे तास हे शिक्षक–नोकरांच्या कार्यशक्तीच्या मर्यादेवरूनच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या ग्रहणशक्तीचा आवर आणि तीव्रता लक्षांत घेऊनहि ठरवावयाचे असतात. तर मग दुकान नोकरांचा कायदा शिक्षण संस्थांना लावणें कसें योग्य ठरेल ? बरें शिक्षणसंस्थांकरितां ह्या बाबत निराळा स्वतंत्र कायदा करणेंहि सध्याच्या बहुप्रसव विधिमंडळास अशक्य नाहीं. म्हणून प्रांतांतील कारखान्यांसाठी जसा स्वतंत्र कायदा विधिमंडळानें केलेला आहे तसाच स्वतंत्र कायदा शिक्षण संस्थांसाठी जरूर तर विधिमंडळानें करावा व ह्या कायद्यांतून शिक्षण संस्थांना स्पष्टपणें वगळण्यांत यावें, अशी दुरुस्ती ह्या कायद्यांत होणें अगत्याचें आहे.

# कोल्हापूर जिल्ह्यांतील ऊंसकरी शेतकऱ्यांचे पेंचप्रसंग

लेखकः—श्री. अदगोंड बाळगोंड पाटील, उपाध्यक्ष, शाहूपुरी मर्चेंट्स असोसिएशन व सभासद, सामुदायिक शेती, सरकडे.

मुंबई इलाख्यांत कोल्हापूर संस्थान विलीन झाल्यामुळें संस्थानी राजवटींत ऊंसकरी शेतकऱ्यांना ज्या सोई व सवलती मिळाल्या होत्या त्या सर्व आज सुधारणेच्या व शेतकरीवर्गाचें कल्याण करणाऱ्या कर्जनिवारण व सावकारी नियंत्रण कायद्याखाली निघून गेल्या! कोल्हापूर जिल्ह्यांत तीन कोट रुपये किंमतीचें उंसाचें पीक तयार होतें त्यास हंगामी कर्ज देण्याकरितां शाहुपुरी पेठेंतून सोय होत होती त्यामुळें उंसाच्या शेतीची वाढ झाली. पण आतां मोठा पेंचप्रसंग पैशाच्या पुरवठ्याच्या गैरसोईबाबत निर्माण झाला आहे.

मुंबई इलाख्यांतील कोल्हापूर हा बावीसावा जिल्हा आहे. पण त्या मानानें उंसाच्या पिकाचें उत्पादन इलाख्याचे एकचतुर्थांश इतकें आहे. कष्टाळू शेतकरी सह्याद्रिच्या माथ्यांतून वहात येणाऱ्या नदीनाल्यांना मातीचे बंधारे घालून अन्नधान्य पिकविण्यास निकस पण उंसास योग्य अशा जमिनींत उंसाचें पीक करीत आले आहेत. या सर्व पिकांस शाहुपुरी पेठेंतून एक कोटी रुपये भांडवल मिळालें नसतें तर सातारा जिल्ह्यांतील महाबळेश्वर डोंगरांतील शेजारील पंधरा वीस मैलांचे रुंदीचे व बऱ्याच मोठ्या लांबीच्या प्रदेशांतील खेडुतांची स्थिति पहातों तीच येथें पहाण्यास मिळाली असती.

### उंसाच्या पिकाचें महत्त्व

एका कोल्हापूर जिल्ह्यांत १,७०० पंपिंग मशिनरी सेटस उंसाचे चामाईत पिकाकरितां व ६५० वर इंडस्ट्रीकरितां काम करीत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यांतील पूर्व व पश्चिम भाग यांतील पिकाचें मान निरनिराळ्या दृष्टीनें निरनिराळें आहे. पूर्व भागांत पैशाचें पीक म्हणून तंबाखू, हळद, शेंग, ऊंस थोड्या प्रमाणांत पिकविला जातो. या भागांत भाताशिवाय इतर पिकें अन्नधान्यांत समाविष्ट होणारीं जोंधळा, बाजरी, मका, तूर व हरबरा जमिनीचे मगदुराप्रमाणें केलीं जातात. पश्चिम भागांत भात, नाचणी, वरी, मका हीं अन्नधान्यें केलीं जातात. पैशाचें पीक करावयाचें झालें तर उंसाशिवाय दुसरें निघूं शकत नाहीं. अगदी थोड्या जमिनींत शेंगाचे पीक केलें जातें. अन्नधान्यें पिकविल्या जाणाऱ्या जमिनींत उंसाचें पीक करणें शेतकऱ्यास परवडत नाहीं. कारण उंसापेक्षां भात शेतीकरितां ज्या जमिनी योग्य आहेत त्यांत भाताचें पीक हें जास्त किंमतीचें निघतें. त्यामुळें सहसा आपली भाताची शेती खंडानें कोणी ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यास देत नाहींत किंवा स्वतः कोणी ऊंस लावीत नाहीं. पश्चिम भागांत पावसाचें प्रमाण व निसर्गाची अनुकूलताही अधिक असल्यामुळें जानेवारी ते जून या महिन्यापर्यंतच उंसास पाणी द्यावें लागतें. इतर भागांत ऊंस केला तर त्याला बारा महिने पाणी द्यावें लागतें व तें खर्चाचे दृष्टीनें परवडत नाहीं. बंगालमध्यें विविक्षित भागांत ताग हेंच पीक ज्याप्रमाणें फायदेशीर आहे व इतरत्र तें फायदेशीर होऊं शकत नाहीं त्याप्रमाणेंच या जिल्ह्यांतील पश्चिम भागांत उंसाचें पीक काढणें फायदेशीर आहे. म्हणून उसाचे लागणीबाबत बंधन या भागांत राहूं नये. धान्य पिकवून या भागांतील लोकांची गुजराण जितके दिवस होईल त्याहून ऊंस पिकवून त्याचे पैशांतून अधिक दिवस गुजराण करण्याकरितां या उसाचे पिकाचा उपयोग या भागांतील लोकांना होत आहे. उंसाचा धंदा हा बारा महिने चालणारा असल्यामुळें मजुरांस मजुरी मिळते, सरकारी सारा, वस्त्रप्रावरण व इतर जीवनोपयोगी कामांत या पिकाचा फार उपयोग होत आहे. शिवाय गूळ हा जिन्नस गुजराथ, काठेवाड, कच्छ या भागांतील गरिबांचें खाद्य आहे. त्याला खरेदी करण्यास त्या भागांतील लोक येतात. या भागांतील विशिष्ट तऱ्हेच्या गुणधर्माचा व निरनिराळ्या उत्तम, मध्यम, कनिष्ट प्रतीचा गूळ असूनहि पावसाळयांत टिकाऊपणा या वैशिष्ट्यमय गुणामुळें या भागांतील पिकणाऱ्या गुळास हिंदुस्थानांत विशेष महत्त्व आहे. याबद्दल दुमत नाहीं. या सर्व कारणांसाठी या पिकाची निसर्गानुकुलतेनें जी जात्याच वाढ झाली आहे, ती अनिर्बंधपणें तशी चालेल इकडे लक्ष्य पुरविणें अत्यंत आवश्यक आहे. एंजिनिअर श्री. गुपचुप यांनीं कोयना व्हॅली स्कीम तयार केली आहे. त्यांत त्यांनीं या योजनेस २५३ कोटी रुपये खर्च येणार व त्या स्कीममधील योजनेप्रमाणें विजापुरापर्यंत कालवा नेऊन जीं निरनिराळीं पिकें निघणार असा अंदाज आहे, त्यांत उंसाचें क्षेत्र ३६ हजार एकर होईल असा त्यांचा कयास आहे. एवढें मोठें भांडवल खर्ची पडून उंसाची लागण ज्या भागांतून तो कालवा जाणार त्या भागांत होणार आहे. पण ज्या जिल्ह्यांत उंसाची लागण ३२,००० एकर पूर्वीपासून चालू आहे त्याच्या संरक्षणाचा विचार सरकारनें योग्य त्यावेळीं करूनच बॉंबे ॲग्रिकल्चर डेट रिलीफ ॲक्ट लागूं करावयाला पाहिजे होता.

### ऊंसकऱ्यास आतां भांडवल कोण देणार ?

या पिकाच्या उत्पादनाकरितां एक कोट रुपयांची आवश्यकता शेतकऱ्यांना आहे. तिची सोय कोऑपरेटिव्ह सोसायट्या, बँका व इतर ज्या साधनांनीं करतां येईल त्या मार्गानें करावी. सध्यां या जिल्ह्यांत जवळजवळ नऊशेच्या घरांत कोआपरेटिव्ह सोसायट्या आहेत. त्यांचें भांडवल पाऊणकोटीच्या अंदाजांत आहे पण या सोसायट्या कर्ज ऊंसकरी शेतकऱ्यांना देण्याच्या प्रधान हेतूनें यापूर्वी तरी चालविलेल्या नाहींत. खेड्यांतील मनीलेन्डर्स लायसेन्स काढलेले सव्वापांचशेंच्यावर सावकार आहेत. त्यांचें भांडवल जवळजवळ एक कोटीपर्यंत आहे. पण तेंहि जवळजवळ पाऊणशे टक्के या उंसाचे कारणाकरिता नाहीं; हें त्यांचे गहाण गहाणवट स्वरूपाचे रजिस्टर दस्ताचे व्यवहारावरून दिसून येणार आहे. तेव्हां ऊंसकरी शेतकऱ्यांच्या तातडीचा प्रश्न कसा सोडविला जाणार व हंगामशीर असे ज्या त्या वेळीं त्यांना पैसे पिकाचे लागवडीसाठी मिळून त्यांची सोय होणार हा एक मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आतां त्यांना लागणाऱ्या हंगामशीर मदतीची आवश्यकता कित्येक दिवसांवर येऊन बसली आहे. गुऱ्हाळ हंगामाबरोबर लागणी हंगाम ऑटोमॅटिक चालतो. आतां बाजारांत गूळ येण्यास सुरवात झाली. एकदम यक्षिणीची कांडी फिरविल्याप्रमाणें सर्व सोसायट्या, स्टेट बँक, यांत ठेवी व शेअर भांडवलमध्यें वाढ होणार नाहीं.

विशेष दुःखाची गोष्ट म्हणजे लहानसहान दहा-वीस गुंठ्याचे जमिनीचे मालक दहा-बाराचे संख्येनें एकत्रित येऊन जो आज बऱ्याच वर्षांपासून उंसाचा फड करीत आले आहेत त्यांची लायकी म्हणजे फड किंवा पीक हेंच समजून जे लोन दलाल पेठेंतून मिळत होतें त्यांना पैसा मिळणें अत्यंत दुरापास्त होणार आहे. सरकारानें कर्ज देण्याचें बंद केलें तरी सहकारी सोसायट्यांचे रूपानें

सरकार आपल्या पाठीशीं आहे; कल्याण करण्यासाठीं उभे आहे; असा विश्वास या सोसायट्यांकडे पहातांना शेतकऱ्यांना वाटला पाहिजे. त्यांचे नियम खेड्यांतल्या आजच्या ऊंसकरी शेतकऱ्याच्या अडचणी सोडविण्यास सोईचे होतील असे बनविले पाहिजेत. शेतकऱ्याची प्रत्येक गरज या सोसायट्यातर्फेच भागविली जाईल इतकें तिचें क्षेत्र विस्तृत झालें पाहिजे. तरच आज शेतकऱ्यांच्यापुढें पदोपदीं येऊन पडणारे विविध प्रश्न सोडविले जातील.

### तांतडीच्या उपाययोजनेचें अगत्य

सध्या शेतकऱ्यांची सर्व बाबतींत निराशा झालेली आहे. नुसते कायदे त्यांचें समाधान करूं शकत नाहींत. तगाई घेतांना ज्या प्रकारच्या अडचणींतून शेतकऱ्यांचे तगाईचे अर्ज पास होतात ते पहातां चांगल्या लायक शेतकऱ्यानांहि ते मिळविणें कठीण पडतें व त्यांस व लिफ्ट इरिगेशनला अडीच लाख रुपये मंजूर झालेत ते या जिल्ह्याच्या अडचणींच्या मानानें कमी आहेत. खेड्यापाड्यांतून तो उतारपेठेपर्यंत सहकारी सोसायट्यांचें जाळें विणा व मग जुनी शेतकऱ्यांनीं उपयोगी आणली जाणारीं साधनें याचा त्याग करण्यास शेतकऱ्यांना लावा. त्याशिवाय शेतकऱ्यांना त्याचा कांहीं उपयोग नाहीं. शेतकऱ्यांच्या हिताचें म्हणून जे कायदे पास केलेत ते लागू करताना या सर्व गोष्टींचा विचार या जिल्ह्यांतील सोईगैरसोईकडे लक्ष्य देऊन सरकारनें पाऊल टाकलें असतें तर शेतकऱ्यांना सध्या जो पेचप्रसंग निर्माण झाला आहे तो झाला नसता. अजूनहि सरकार या सर्व गोष्टींचा विचार करून यांतून मार्ग काढील तर बरें होईल. प्रत्यक्ष शेतकऱ्यांना उंसासारख्या पिकांना कर्ज देणारी आजवर चालत आलेली शाहुपुरी पेठेतलि व्यवस्था आपणास विधायक कांहीं करता येईपर्यंत चालू ठेवण्यांतच सरकारच्या दृष्टीनेंहि योग्य आहे. अगोदर सोय शेतकऱ्याची करा.

---

### सांगली एंजिनिअरिंग कॉलेजला देणग्या

जुलै १९४९ पासून सांगली येथील न्यू सांगली एंजिनिअरिंग कॉलेजला १५,००० रुपयांच्या देणग्या मिळाल्या आहेत आणि ५८,५०० रुपयांच्या मुदतींच्या ठेवी मिळाल्या आहेत असें अधिकृतपणें जाहीर करण्यांत आलें आहे.

### सीलोनमधील विद्यार्थ्यांना कदान्न

सीलोन विद्यापीठाच्या शारीरशास्त्रशाखेतर्फे सीलोनमधील विद्यापीठांतून शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी करण्यांत आली. तपासणींत असें आढळून आलें कीं, कमी उत्पन्न असलेल्या वर्गांतील विद्यार्थ्यांना सकस अन्न मिळत नाहीं.

### अलीगड विद्यापीठाला देणगी

अलीगढ येथील मुस्लीम विद्यापीठाच्या एंजिनिअरिंग कॉलेजचा विस्तार करण्यासाठीं भारत सरकारनें १९४९ सालीं १८,००,००० रुपयांची देणगी मंजूर केली आहे. दुसरीहि एक २,५०,००० रुपयांची देणगी मंजूर झाली आहे. दोन्ही देणग्या एकदाच दिल्या जाणार आहेत.

### नवीं पोस्टाचीं कार्डें

१७ ऑक्टोबर, १९४९ पासून त्रिमूर्तींचा मुखवटा असणारीं पोस्ट कार्डें विक्रीस ठेवण्यांत आलीं आहेत. राजाचा मुखवटा असलेलीं कार्डें संपेपर्यंत तींहि पण विकण्यांत येणार आहेत. कांहीं दिवस हीं नवीन कार्डें फक्त दिल्ली, मुंबई, कलकत्ता आणि मद्रास ह्या शहरांतूनच मिळतील.

---


दी

# बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली. ]

स्थापनाः १९२६.

मुख्य कचेरी :

सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट– -- ) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.



# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरीः— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
( मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली )

स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. २०,६२,२५० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २९,३८,२०० |
| ठेवी | रु. ७,४७,०९,९०० |
| खेळतें भांडवल | रु. १०,६३,००,००० |

प्रांतांतील बारा जिल्ह्यांमध्यें ५६ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरीकडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

(United Advertisers)

# महाराष्ट्रांतील उदयोन्मुख शास्त्रज्ञांसाठी—

लेखकः—डॉ. मो वा. चिपळूणकर, एम्. एस्सी., डी. एस्सी., पुणें.

भारतीय शास्त्रीय परिषदेचें ३७ वें अधिवेशन यंदाच्या वर्षी पुणें येथें दिनांक २ जानेवारी ते दिनांक ८ जानेवारी, १९५० पर्यंत भरणार आहे. तेव्हां पुण्यांतील प्रथितयश शास्त्रज्ञांनाच नव्हे तर उदयोन्मुख शास्त्रज्ञांना व एकंदर शास्त्रीय विषयासंबंधी आस्था बाळगणारांना या निमित्तानें येथें जमणाऱ्या सुप्रसिद्ध शास्त्रज्ञांच्या सहवासाचा अपूर्व लाभ सतत कांहीं दिवस मिळणार आहे. पुणें विद्यापीठाचे कामाला अजून नीट सुरवात झालेली नाहीं; त्याचप्रमाणें येथें होऊं घातलेली नॅशनल केमिकल लॅबोरेटरीसुद्धां अजून बांधून होत आहे, तेव्हां कित्येकांच्या मतें यंदाच पुण्याला हें अधिवेशन भरविण्याची कांहीं घाई नव्हती; तें कांहींही असलें तरी इतर कांहीं कारणास्तव ही आगामी घटना एकंदरींत फार चांगली होत आहे असेंच म्हणावेसें वाटतें. यावेळीं सर्व हिंदुस्थानांतून अदमासे दीड दोन हजार प्रसिद्ध संशोधक जमतील असा अंदाज आहे. त्याचप्रमाणें परदेशांतूनहि कांहीं जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ येणार आहेत. या परिषदेचें अधिवेशन पुण्यास भरण्याचा प्रसंग आजपर्यंत आला नव्हता व शिवाय शास्त्रज्ञांचा एवढा मोठा मेळावाहि पुण्यांत यापूर्वी कधीं जमला नव्हता. तेव्हां आजच्या परिस्थितींत अशा प्रसंगाचा जर कोणाला सर्वांत अधिक फायदा करून घेता येणें शक्य असेल तर तो येथील उदयोन्मुख शास्त्रज्ञांनाच होय, असें प्रस्तुत लेखकाचें मत आहे आणि म्हणूनच त्यांना योग्य वेळेवर जागें करून व मुद्दाम त्यांना उद्देशून या ठिकाणीं कांहीं विचार त्यांच्यापुढें मांडले आहेत.

> **शास्त्रज्ञांच्या मेळाव्याचा फायदा घ्या.**
>
> कोणत्याहि राष्ट्राचा अभ्युदय तेथील शास्त्रीय प्रगतीवरच पुष्कळसा अवलंबून असतो. भारतीय शास्त्रीय परिषद ही हिंदुस्थानांतील प्रमुख प्रातिनिधिक संस्था असून तिची गेल्या तीस पसतीस वर्षांतील प्रगति हीच गोष्ट दर्शविते. तिच्या एकंदर कार्यांतील आपला भाग हें आपल्या प्रगतीचें द्योतक मानिल्यास महाराष्ट्राचें स्थान बरेंच गौण ठरतें. तेव्हां ही परिस्थिति स्पष्टपणें उमगण्यास या परिषदेचें पुणें येथें यंदा भरणारें अधिवेशन ही एक अमूल्य संधीच होय.

### भारतीय शास्त्रीय परिषद

प्रो. मॅक्-महोन (लखनौ) व प्रो. सायमॉनसेन (मद्रास) ह्या दोघा रसायनशास्त्रज्ञांच्या खटपटीनें कलकत्त्यास प्रथम अगदीं लहान प्रमाणावर ही परिषद् बरीच अलिकडे म्हणजे इ. स. १९१३ सालीं सुरू झाली. सुरुवातीचें तिचें कामकाज कलकत्त्याच्या एशिआटिक सोसायटी ऑफ बेंगाल ह्या संस्थेमार्फत चालत असें व पुढें मात्र "इंडियन सायन्स कॉंग्रेस असोसिएशन" या नांवाची एक स्वतंत्र संस्था स्थापिली जाऊन तिच्यामार्फत आजवरचें तिचें सर्व कार्य होत आलें आहे. सुरुवातीस परिषदेचे एकंदर सदस्य व विषयवार केलेले विभागहि फार कमी होते, पण आज सदस्यांची संख्या हजारावर गेली असून विभाग तेरा झाले आहेत. परिषदेस खरें अखिल भारतीय स्वरूप तर बरेंच वर्षांपासून आलें आहे, पण अलीकडे तिला आंतरराष्ट्रीय महत्त्वहि येऊं पहात आहे. परिषदेचें मूळचें ध्येय "शास्त्रीय संशोधनाला जोराची चालना आणि व्यवस्थित वळण लावून देशांतील निरनिराळ्या शास्त्रीय संस्था व व्यक्ती यांचें सहकार्य घडवून आणणें, शास्त्रांच्या शुद्ध नि युक्त विभागांच्या उद्देशाकडे लक्ष वेधणें व शास्त्रीय संशोधनाच्या आड येणारे कोणतेहि सार्वजनिक प्रकारचे अडथळे काढून टाकणें" असें होतें. पण आजचें तिचें एकमेव कार्य म्हणजे दरवर्षी फक्त एकदा सर्व हिंदी शास्त्रज्ञांचें सम्मेलन भरवून त्याचा इत्थंभूत वृत्तांत प्रसिद्ध करणें हें झालें आहे. इ. स. १९१४ पासून आजपर्यंत नियमितपणें दरवर्षी हिंदुस्थानांतील निरनिराळ्या शहरीं परिषदेचीं अधिवेशनें भरविण्यांत आलीं आहेत; तीं अशी : कलकत्ता (६ वेळा), मद्रास (४ वेळा), बंगलोर (४ वेळा), मुंबई (३ वेळा), नागपूर (३ वेळा), लाहोर (३ वेळा), अलाहाबाद (२ वेळा), लखनौ (२ वेळा), बनारस (२ वेळा), पाटणा (२ वेळा), दिल्ली (२ वेळा), इंदूर (१ वेळ), बडोदा (१ वेळ) आणि हैद्राबाद (१ वेळ). इ. स. १९३४ सालच्या अधिवेशनाचें नियोजित स्थळ पुणें होतें पण त्या वर्षीच्या प्लेगमुळें तें अधिवेशन मुंबईस भरविण्यांत आलें. प्रत्येक अधिवेशनासाठीं (वर्षासाठीं) हिंदुस्थानांतील एखाद्या सुप्रसिद्ध शास्त्रज्ञाला अधिवेशनाचा मुख्य अध्यक्ष म्हणून निवडण्यांत येतें, व परिषदेच्या सदस्यांतून प्रत्येक विभागाच्या अध्यक्षाचे जागीं एक एक प्रथितयश शास्त्रज्ञ निवडला जातो. बहुधा अधिवेशनाची सुरुवात व्हाइसरॉय, प्रांताचा गव्हर्नर, संस्थानिक अथवा विद्यापीठाचे उपकुलगुरु यांच्या हस्तें मोठ्या थाटानें होते व त्याच वेळीं सम्मेलनाच्या नियोजित मुख्य अध्यक्षाचें त्याच्या स्वतःच्या शास्त्रीय विषयावर भाषण होतें. नंतर निरनिराळ्या विभागांच्या कामास, एकदमच सुरुवात होते. त्या त्या अध्यक्षांचीं आपल्या संशोधन विषयांचा आढावा घेणारीं मुख्य भाषणें सोईप्रमाणें त्या त्या विभागासमोर होतात. त्यानंतर प्रत्येक संशोधकानें आपापल्या नवीन संशोधनाची माहिती आपल्या विभागांतील संशोधकांपुढें थोडक्यांत मांडून त्यावर चर्चा होते. त्याचप्रमाणें अलीकडे आगाऊ जाहीर केलेल्या कांहीं विषयांवर स्वतंत्र चर्चांचें त्यांना अनषंगिक असलेल्या विभागांचे संयुक्त कार्यक्रम होत असतात. बहुतेक रोज संध्याकाळीं सुप्रसिद्ध शास्त्रज्ञांची सर्वसामान्य माणसांना समजतील अशी जाहीर व्याख्यानेंहि केलीं जातात. शिवाय अधिवेशनाच्या स्थळाजवळील औद्योगिक केंद्रें, ऐतिहासिक स्थळें, प्रसिद्ध संस्था वगैरे ठिकाणीं सम्मेलनाच्या सदस्यांच्या सहली काढल्या जातात. अधिवेशनांत चहापानांचे, करमणुकीचे इत्यादिहि कार्यक्रम असतातच. सर्व हिंदुस्थानांतील सर्व शास्त्रीय विषयांचे तज्ज्ञ या निमित्तानें एकत्र येत असल्याकारणानें आणखी एक महत्त्वाची गोष्ट याच वेळीं घडून येते. ती अशी कीं हिंदुस्थानांतील ज्या अनेक निरनिराळ्या शास्त्रीय सभा, परिसंस्था, मंडळें, इ. आहेत त्यांच्या कार्यकारिणींच्या किंवा वार्षिक सभा, तेथेंच भरतात. अशांची संख्या बहुतेक २० ते २५ पर्यंत असते.

या ठिकाणीं एक गोष्ट स्पष्टपणें सांगून ठेवावीशी वाटते ती ही कीं, अनुभविक व महत्त्वाकांक्षी संशोधकाला परिषदेच्या या वार्षिक

अधिवेशनापासून अलिकडे खरोखर कांहींही फायदा होईनासा झाला आहे, ही गोष्ट अनेकांना मान्य झाली आहे. याचें कारण अधिवेशनांच्या कार्यक्रमांचा बोजवारा आणि अव्यवस्था होत चालली आहे असें सांगण्यांत येतें. पण आमच्या मतें खरें व महत्त्वाचें कारण म्हणजे या परिषदेच्या पुढारी मंडळींचीच ध्येय-निष्ठा नाहींशी झाली आहे व जो तो आपल्या स्वतःची व आपल्या गोटांतील लोकांची बडेजावी व स्वार्थ साधण्याकडेच सर्व लक्ष पुरवूं लागला आहे. कित्येकजण तर परिषदेच्या अधिवेशनाला जे हजर रहातात ते आपलें स्वतःचें स्थान बळकट करण्यासाठी किंवा नवें मोठें स्थान पटकाविण्यासाठीच येतात. शिवाय अलिकडे निरनिराळ्या संस्थांचे प्रतिनिधी म्हणून संस्थांच्या खर्चानें येणारे दिखाऊ शास्त्रज्ञ वाढत चालल्यामुळें बेफिकीरी, बेजबाबदारपणा वाढून कार्यक्रमांची अव्यवस्था व अनपेक्षित विचित्र प्रकार पुष्कळच होऊं लागले आहेत. परिषदेच्या घटनेंत बदल करून अलिकडे श्रमविभागणी व सुव्यवस्था या गोंडस नांवाखालीं आपापले हस्तक भरण्यासाठी अनेक प्रकारच्या अधिकारांच्या जागा निर्माण केल्या गेल्या आहेत व त्या सर्व भरण्यास पुरेसे अनुभविक आणि तज्ञ लोक मिळूं शकत नसल्यामुळें नालायक व अननुभविक लोकांचा भरणा होऊं लागला आहे. एवढें असलें तरीही वाईटांतून चांगलें या न्यायानें विशेषतः उद्योन्मुख संशोधकांना पुष्कळच नवीन गोष्टी शिकावयास मिळतील यांत मुळीच शंका नाहीं; मात्र त्यांनीं आपली स्वतःची दृष्टी ज्ञानार्जनाची व खऱ्या आत्मोन्नतीची ठेवून असल्या हीन व अंतिम फोल ठरणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्षच केलें पाहिजे.

### महाराष्ट्रीय शास्त्रज्ञ

आतां, वारंवार असें म्हटलें जातें कीं, महाराष्ट्रीयांची अन्यप्रांतीयांकडून पुष्कळशा अन्याय्य मार्गांनीं पिछेहाट केली जात आहे. तेव्हां या आक्षेपाकडे महाराष्ट्रांतील उद्योन्मुख शास्त्रज्ञांनीं मुद्दाम लक्ष देऊन आपल्या जगांतही हीच गोष्ट घडत आहे किंवा काय हें पाहिलें पाहिजे. एकदमच सांगून टाकावयाचें तर, आमच्या मतें यांत जरी थोडा फार तथ्यांश असला तरी त्याला पुष्कळ अंशीं आपणच कारणीभूत आहोंत. आपल्यांतही कांहीं ठळक उणीवा आहेतच; व धूर्त परप्रांतीय जर त्यांचा फायदा घेत असतील तर त्याबद्दल त्यांना का आपल्या स्वतःला दोष द्यावयाचा, हें ज्याचें त्यानेंच ठरवावें. अर्थात् आपली प्रगति व्हावी अशी इच्छा असेल तर त्या उणीवा आपण प्रथम काढून टाकिल्या पाहिजेत हें उघडच आहे. आमच्या मतें आतां ती जबाबदारी व तत्संबंधाचें कर्तव्य महाराष्ट्रांतील उद्योन्मुख शास्त्रज्ञांवरच आहे. त्यासाठी त्यांनीं एकजुटीनें, पद्धतशीर योजना आखून व लोकनीतीच्या तत्त्वांस अनुसरून प्रयत्न केले पाहिजेत.

आतां महाराष्ट्रीयांचें शास्त्रीय जगतांत कोणतें स्थान आहे हें ठरविण्याच्या दृष्टीनें पुढें दिलेली आकडेवार माहिती बरीच उपयुक्त ठरेल असें वाटल्यावरून ती येथें मुद्दाम दिली आहे. भारतीय शास्त्रीय परिषदेच्या अधिवेशनांतील महाराष्ट्रीयांचा भाग हा शास्त्रीय जगतांतील त्यांच्या स्थानाचा एक निदर्शक होय असें येथें गृहीत धरून चालावयास कांहीं हरकत नाहीं. त्यांची तुलना फक्त बंगाली व मद्रासी लोकांशीच करण्याचें ठरवून त्याप्रमाणें वर्गवारी केली आहे.

भारतीय शास्त्रीय परिषदेच्या सदस्यांची वर्गवारी

| वर्ष | बंगाली | मद्रासी | महाराष्ट्रीय | इतर | एकंदर |
|---|---|---|---|---|---|
| १९१४ | १३ | ५ | २ | ५० (युरोपिअन्) | १०५ |
| १९१८ | २६ | १८ | ४ | २३० | २७८ |
| १९२८ | १७९ | ६५ | ४० | २५४ | ५३८ |
| १९३८* | ७९७ | २९४ | १५५ | ८५८ | २००४ |
| १९४८ | २८३ | १५५ | १०४ | ४३० | ९७२ |

* या वर्षी भा. शा. प. चा रौप्य महोत्सव साजरा झाला.

भारतीय शास्त्रीय परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाचे वेळीं वाचलेल्या निबंधांच्या लेखकांची वर्गवारी.

| लेखक / वर्ष | बंगाली | मद्रासी | महाराष्ट्रीय | युरोपियन | एकंदर |
|---|---|---|---|---|---|
| १९१४ | ९ | ५ | ० | २२ | ३५ |
| १९१८ | १४ | १४ | ३ | ७० | ११२ |
| १९२८ | २०८ | ११४ | २९ | युरोपिअनांची वेगळी संख्या काढलेली नाहीं. | ४६९ |
| १९३८* | ३४२ | २१५ | १०० | | ८६९ |
| १९४८ | ३५३ | २४० | ९४ | | ७१६ |

* या वर्षी भा. शा. प चा रौप्य महोत्सव साजरा झाला.

कोष्टकांतील माहितीचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. महाराष्ट्र शास्त्रीय बाबतींत इतरांच्या फार मागे आहे हीच गोष्ट आणखी एका मुद्यानें सिद्ध होते, ती अशीः भारतीय शास्त्रीय परिषदेच्या अधिवेशनाचे मुख्य अध्यक्षपदाचा मान आजवर एकाहि महाराष्ट्रीय शास्त्रज्ञास लाभलेला नाहीं! व आजपर्यंतच्या एकंदर विभागांच्या अध्यक्षपदांचा मान एकंदर ३४७ पैकीं फक्त २० च महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांना मिळाला आहे!! यांत मात्र खरा अर्थ भरलेला आहे. वरील माहितीवरून निघालेल्या अनुमानानुसार व आमच्या आजपर्यंतच्या अनुभवानुसार असें म्हणतां येतें कीं, महाराष्ट्रीयांना स्वतःचा व आपल्या कार्यांचा गाजावाजा किंवा जाहिरात करण्याची इच्छा (आवड) नसते किंवा त्यांना येतच नाहीं आणि म्हणून ते मागे पडतात. महत्त्वपूर्ण संशोधन करण्यासाठी लागणारी कुशाग्र बुद्धि, कर्तृत्व, चिकाटी, इत्यादि गुण आमच्यांत नाहींत असें मुळीच नाहीं पण याहून अधिक प्रबळ कारण म्हणजे महाराष्ट्रांत मुबलक पैसा नाहीं व त्यामुळें सघन संशोधन संस्था व प्रयोगशाळा नाहींत व त्यामुळें त्यांना वाव मिळत नाहीं. जगांतील शास्त्रज्ञांत कांहीं महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचें स्थान केवळ त्यांच्या भरीव आणि उच्च दर्जाच्या संशोधनामुळें मानाचें ठरलें आहे व त्याच्याबद्दल महाराष्ट्रालाच काय पण अखिल हिंदुस्थानला ते भूषणच झाले आहेत. केवळ उदाहरणाकरितांच म्हणून येथें कांहींचा नामनिर्देश करावासा वाटतोः—प्रो. एस. पी. आघारकर, प्रिं. डॉ. एस. एस. जोशी, प्रो. डी. बी.

लिमये, प्रो. व्ही. व्ही. नारळीकर, डॉ. सी. जी. पेंडसे, प्रिं. डॉ. जी. एस. महाजनी, प्रो. डी. डी. कोसांबी, इ. यांच्या संशोधनासंबंधीं मराठी नियतकालिकांतूनहि गौरवपूर्ण उल्लेख पुष्कळांच्या वाचनांत आले असतील. एकंदर महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांसंबंधीं लिहितांना प्रस्तुत लेखकास त्यांच्यासंबंधींची दुसरी, म्हणजे त्यांच्या अवगुणांची बाजूहि योग्य प्रकारें मांडावयास पाहिजे. तथापि त्या सर्वांचा निष्कर्ष म्हणून महाराष्ट्रांतील उदयोन्मुख शास्त्रज्ञांनीं यापुढें काय करावें असें आम्हास वाटतें तेंच एकदम सांगून टाकिलेलें बरें; तें असें: प्रत्येक व्यक्तीला, ती समाजाच्या, संस्थांच्या अगर सरकारच्या कारभारांतील कोणत्याहि स्थानावर असो, आपलें स्वतःचें कर्तव्य पार पाडून शिवाय देशाच्या प्रगतीला उपयुक्त असें कार्य करतां येणें शक्य आहे. आपल्या स्थानाचा जसा योग्य फायदा प्रत्येकाला मिळतो तसेंच आपलें कर्तव्य, आपल्या स्थानाच्या मर्यादेच्या बाहेर न जातांच करतां येतें व तेंच करणें योग्य होय. स्थानमहात्म्यावर विसंबून दुसऱ्यांच्या मार्गांत अडथळे निर्माण करणें सोपें आहे. पण तसें करण्यानें देशाचें अहित होतें हें कळत असूनसुद्धा आपल्या मोठेपणाच्या चुकीच्या कल्पनामुळें त्या मोहास कित्येक जण बळी पडतात. शास्त्रांच्या अध्ययनानें प्रत्येक गोष्टींच्या मर्यादांची कल्पना मनावर उत्तम प्रकारें बिंबविल्या जात असल्या कारणानें उदयोन्मुख शास्त्रज्ञांस या गोष्टी शिकावयास मुळीच कठिण जाणार नाहींत.

### उदयोन्मुख महाराष्ट्रीय संशोधकांस कांहीं सूचना

महाराष्ट्रांतील योजनापूर्वक शास्त्रीय संशोधनासंबंधीं विचार करितांना, प्रथम संशोधक कोण होऊं शकेल? हा प्रश्न पाहिला पाहिजे. खरा संशोधक होण्यासाठीं बुद्धीची कुशाग्रता, कमालीची चिकाटी, ध्येयनिष्ठा इ. गुण आवश्यक तर खरेच, पण शिवाय संशोधकाच्या मनाची जी एक विशिष्ट प्रकारची ठेवण असते ती असेल तरच त्याचे हातून म्हणण्यासारखें संशोधन होऊं शकेल, नाहीं तर होणार नाहीं. म्हणून वाटेल त्यानें उठावें आणि संशोधनाच्या मागें लागावें; हें शक्य नाहीं आणि योग्यहि नाहीं. कारण तें अंतिम फायदाचें ठरत नाहीं. यामुळेंच तर कित्येक जणांना कांहीं काळानंतर संशोधनांत नुसतेंच अपयश मिळालेलें आहे असें नव्हे तर त्यांच्यामध्यें संशोधनासंबंधींचा एक प्रकारचा तिरस्कार, वीट आणि कंटाळा उत्पन्न झालेला आपण पहातो. यासाठीं प्रत्येक होतकरू संशोधकानें आपली स्वतःची पारख करूनच या दिशेला वळावें. ही पारख इतरांनीं करण्याचे अगोदर ज्याची त्यानेंच केली तर जास्त चांगलें हें उघडच होय. ही पारख अचूक होण्यासाठीं पुढील एका साध्या कसोटीचा त्यास फायदा होईल असें वाटतें. होतकरू संशोधकानें दोन चार सुप्रसिद्ध संशोधकांच्या चरित्रावरून आपली दृष्टी काळजीपूर्वक फिरवावी; त्यांच्या प्रयत्नांचा पूर्ण ठाव घ्यावा; आपल्या मताप्रमाणें त्यांची व त्यांच्या कार्याची किंमत ठरवावी व आपला निकाल इतर तज्ज्ञांच्या मताशीं ताडून पहावा; त्यांत बरीच तफावत दिसून आल्यास ठोकळ मानानें असें समजावें कीं, आपण संशोधनाचा मार्ग चोखाळणें बहुतेक श्रेयस्कर होणार नाहीं. ही गोष्ट अर्थातच दिवंगत शास्त्रज्ञांचे बाबतींत करणें फार सोपें जातें, पण तेंच आधुनिक, हयात शास्त्रज्ञांचे बाबतींत तेवढें सोपें जात नाहीं. तरी पण, कोणत्याहि प्रसिद्ध शास्त्रज्ञाशीं प्रत्यक्ष बोलण्याची, मुलाखत घेण्याची किंवा संशोधनविषयावर चर्चा करण्याची संधी मिळाली तर त्याच्या इतकी दुसरी उत्तम गोष्ट होणार नाहीं हें नक्की ध्यानांत ठेवावें. आणि याच गोष्टीचा लाभ करून घेण्याची फार मोठी संधी यंदाच्या भारतीय शास्त्रीय परिषदेच्या पुणें येथील अधिवेशनाचे वेळीं येथील उदयोन्मुख संशोधकांना मिळणार आहे. त्यासाठी मात्र त्यांनीं जरूर वाटल्यास चारचौघांना विचारून आपली स्वतःची तयारी अगोदरपासून करावयास पाहिजे. जेवढी तयारी अधिक तेवढा फायदा अधिक, हें पूर्णपणें ध्यानांत असूं द्यावें. ज्यांचा कल औद्योगिक संशोधनाकडे असेल अथवा ज्यांना औद्योगिक संशोधनाबद्दल विशेष आस्था वाटत असेल त्यांनीं यंदाच्या अधिवेशनांतील संशोधन व औद्योगीकरण यांचा समन्वय घडवून आणणारांचीं भाषणें, चर्चा व मुलाखतींकडे लक्ष ठेवून त्यांच्या मार्गावर असलें पाहिजे, व या ४–५ दिवसांच्या अवधींतच ह्यांच्या भेटीचा फायदा करून घेतला पाहिजे.

या पुढील मुद्दा असा कीं, लायक विद्यार्थ्यांनींच संशोधनाचे मार्गे लागावें. अर्थात् संशोधनसंस्थांच्या दृष्टीनें विद्यार्थ्यांची निवड केव्हाहि एखाद्या तज्ज्ञांच्या छोट्या समितीनेंच, खोल आणि सर्वांगीण चांचणी परीक्षा घेऊन व वाटल्यास कांहीं दिवस काम करून घेऊनच, केलेली बरी. म्हणजे मग संशोधनासाठीं जो पैसा, वेळ आणि परिश्रम खर्च होतात त्या सर्वांचा भरपूर फायदा व्यक्तीला, संस्थेला आणि देशाला झाल्याशिवाय रहाणार नाहीं. त्याचप्रमाणें एके काळीं केवळ उत्कृष्ट मार्गदर्शन घडल्यामुळें उच्च दर्जाचें संशोधन करणारे आणि पुढें मात्र संशोधनाला विटलेले, आंबलेले किंवा थकलेले, उच्च स्थान अडवून बसणारे "इतिहास–जमा झालेले तज्ज्ञ" यापुढें तरी दृष्टीस पडणार नाहींत.

या बरोबरच आणखी ज्या दोन-तीन गोष्टी आपणांस साधावयास पाहिजेत त्या अशाः– ज्यांनीं संशोधनक्षेत्रांत एकदा पदार्पण केलें त्यांनीं पुढें संशोधनक्षेत्रांतच किंवा तत्सम शास्त्रीय कार्यांतच राहिलें पाहिजे आणि असें शक्य असेल तरच त्यांची निवड केली जावी. संशोधनांत अशा तऱ्हेनें एकदां तयार झालेल्यांना सरकार, कारखानदार, विद्यापीठ अथवा इतर कोणीतरी तसलेंच कामही देण्याची जबाबदारी घेतली पाहिजे व देशांत लागणारे सर्व संशोधक अशा योजनेनुसार एका मागून एक, नवीन नवीन आणि सतत निर्माण होत रहातील अशी त्यांनीं व्यवस्था केली पाहिजे.

प्रत्येक होतकरू संशोधकानें हें नक्की ध्यानांत ठेवावयास पाहिजे कीं, आपण संशोधनाला सुरवात करतों म्हणजेच एका जागतिक स्पर्धेच्या क्षेत्रांत पदार्पण करीत आहोंत. केवळ विद्यार्थ्यांच्या परीक्षांच्या रिंगणांतच चमकणारी नव्हे तर जगाच्या ज्ञानसंचयांत भर टाकणारी व्यक्ती म्हणून त्याकडे बघितलें जाईल; आणि या गोष्टीची जाणीव तो जेवढ्या उत्कटतेनें ठेवील तेवढें अधिक महत्त्वाचें संशोधन त्याचे हातून होईल.

सद्यःस्थितींत उदयोन्मुख शास्त्रज्ञांना आणखी एका गोष्टीचें सूक्ष्म अवलोकन करावयास पाहिजे, तें असें कीं, आज आपल्या देशांत संशोधनासाठी लागणारा पैसा कोठून येतो, कसा येतो व कसा खर्च केला जातो? तसें केल्यास हें सहज कळून येईल कीं, आज आपल्या देशांत पूर्वीच्या मानानें कितीतरी जास्त प्रमाणांत संशोधनासाठी मिळालेला पैसा अनाठायीं खर्च केला जात आहे. याला जबाबदार अर्थातच कोणतीही एक व्यक्ति नसून आजची देशाची परिस्थितीच आहे असें जरी त्याला कोणी गोंडस स्वरूप दिलें तरी त्याचें खापर फुटायचें कांहीं रहात नाहीं; पुढें तें देशाच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट असेंच ठरणार आहे यांत मात्र बिलकुल शंका नाहीं.

### समारोप

संशोधन संस्था नेहमीच खर्चिक असल्याकारणानें दरिद्री महाराष्ट्रानें त्यांमध्यें एकतंत्रीपणा नि वैयक्तिकपणा शिरूं न देतां,

त्यांचें अधिकांत अधिक सांधिक स्वरूप कसोशीनें राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्या सर्वांमध्यें सर्व संशोधन विषयांची थोडी थोडी व तोटकी सोय न करतां कांहीं थोड्याच विषयांपुरती संपूर्ण व्यवस्था मात्र करावयास पाहिजे. महाराष्ट्रांतील आजच्या उद्योन्मुख शास्त्रज्ञांच्या हातीं जेव्हां या संस्था येतील त्यावेळीं त्यांनीं शास्त्रीय संशोधन सर्वांच्या सहकार्यानेंच करण्याची आजही पाश्चिमात्यांमध्यें दिसून येणारी प्रथा पाडावी व त्याला योग्य असेंच सहकारसुलभ आणि योजनानुसार वातावरण निर्माण करण्याचा आतांपासून प्रयत्न करावा; म्हणजे महाराष्ट्राचें पाऊल याहि क्षेत्रांत झपाट्यानें पुढें पडूं लागेल. भारतीय शास्त्रीय परिषद् ही अत्यंत अवजड आणि आवाक्याबाहेर मोठी वाढल्यामुळें आजही महाराष्ट्रानें आपली एक स्वतंत्र परिषद् स्थापिल्यास येथील लोकांच्या दृष्टीनें विशेषतः येथील होतकरू संशोधकांच्या दृष्टीनें, फारच उपयुक्त ठरेल. अर्थात या विधानाची सत्यता यंदाच्या भारतीय शास्त्रीय परिषदेच्या आधिवेशनांत येथील लोकांना प्रत्यक्षच दिसून येईल, अशी खात्री वाटते.


दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

संचालक मंडळ

श्री. धों. कृ. साठे (चेअरमन),
श्री. न. ग. पवार,
श्री. मा. रा. जोशी,
श्री. मा. वि. शहा,
श्री. मा. म. गुप्ते,
श्री. श्री. गो. मराठे (व्हाईस चेअरमन),
श्री. फ. दो. पदमजी,
श्री. शं. ल. किर्लोस्कर,
श्री. मो. रा. ढमढेरे.


दीपावलीनिमित्त खातेदारांचें व भागीदारांचें
आम्ही अभीष्ट चिंतितों.

मुख्य कचेरी :
लक्ष्मी रोड, पुणें २.

मॅनेजर,
चिं. वि. जोग

केंसाच्या सौंदर्याकरितां—
पंढरिनाथ ब्रिलियन्टाईन वापरा.

संतोष दुग्धालय, पुणें.
७८६ सदाशिव पेठ.
स्थापना १९४७.
१०० टक्के कोरें दूध
प्रत्येक महिन्यास ३५० कुटुंबें ११,००० शेर दूध घेतात
आपणाहि घ्या.
योग्य पैशाचा योग्य मोबदला.
दूध स्थानिक व घरपोंच प्रामाणिकपणानें
पुरविलें जातें.
म. गो. कुलकर्णी, फडतरे चौक
सदाशिव पेठ, पुणें.



नूतन वर्ष आमच्या हितचिंतकांस सुखाचें जावो.

# आमच्या बँकेचे मॅ. डायरेक्टर श्री. वैकुंठराय मेहता

## आदर्श कार्यपद्धति

लेखक:— श्री. खं. म. खंडागळे, इन्स्पेक्टर, मुं. प्रां. सहकारी बँक लि., पनवेल.

मुंबई प्रांताचे आजचे अर्थमंत्रि श्री. वैकुंठराय ल. मेहता हे मंत्रिमंडळांत प्रवेश करण्यापूर्वी मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे दीर्घकाल मॅनेजिंग डायरेक्टर होते हें पुष्कळांना माहीत आहे. ह्या ठिकाणीं त्यांचें जें रेखाचित्र मी प्रथामति काढणार आहे तें त्यांच्या ह्या प्रथमाश्रमांतीलच होय.



१९३० सालांतील गोष्ट. मुंबई प्रांतिक सहकारी बँकेंत नोकर म्हणून प्रवेश करून घेण्याच्या मी प्रयत्नांत होतों. श्री. वैकुंठराय मेहता हे त्या दिवशीं बँकेच्या बारामती शाखेला भेट देणार होते. बारामतीला ते सकाळच्या गाडीनें येणार होते. शाखेच्या नोकरवर्गाबरोबर मीही स्टेशनवर गेलों होतों. प्रांतिक सहकारी बँकेचा मॅनेजिंग डायरेक्टर म्हणजे एक बडा साहेब असणार ह्या माझ्या कल्पनेप्रमाणें या बड्या साहेबाचें एक कल्पनाचित्र माझ्या मनांत रंगत होतें. इतक्यांत गाडी स्टेशनांत येतांच त्यांतून उतरणारी मॅनेजिंग डायरेक्टरची मूर्ति पाहून मी तर आश्चर्यचकित झालों ! माझें मन म्हणालें, "ही लहानशी, आपादमस्तक खादीच्या वेषांतील आणि चेहऱ्यावर मोठेपणाच्या मिजाशीची एवढीशीहि चुणूक न दाखविणारी व्यक्ति मुंबई प्रांतिक सहकारी बँकेची मॅनेजिंग डायरेक्टर आहे ?" चणीनें लहान असलेले श्री. वैकुंठराय कामांत वेगवान आहेत, हा अनुभव मला पुढें हळू हळू आला.

श्री. वैकुंठराय शेठ (बँकेच्या नोकरवर्गांत, विशेषत: मुंबई ऑफिसांत, यांना 'मोठे शेठ' म्हणत असत.) यांची ऑफिसामध्यें काम करण्याची पद्धति आदर्शवत् असे. वास्तविक हे बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर. ऑफिसची कर्तुमकर्तुम् शक्ति. वरिष्ठ अधिकारी म्हटला म्हणजे तो ऑफिसला जाण्यांत नियमित क्वचितच असावयाचा. ऑफिसला जाण्यांत जो सर्वांच्या मागें आणि ऑफिस सोडण्यांत जो सर्वांच्या पुढें, तो वरिष्ठ असा बऱ्याच ऑफिसांतला प्रघात असतो. पण आमच्या ऑफिसांत बरोबर उलटें होतें. ऑफिस ११ वाजतां सुरूं व्हावयाचें तर वैकुंठराय शेठ हे बहुधा १०॥ च्या आंतच ऑफिसांत हजर; आणि तेंही पुन्हा अंधेरीहून लोकलनें येऊन ! संध्याकाळीं ऑफिस सोडायचे तेंही इतर सर्व लोक गेल्यावर. सकाळीं ऑफिसांत येऊन एकदां आपल्या चेंबरमधील खुर्चीवर बसले कीं मग दुपारीं ४॥ चे सुमारास कांहीं वेळ उठतील तेवढेंच. बाकीं सर्व वेळ खुर्चीवर बसून काम उरकण्यांत गर्क. नंतर ते जे बसतील ते ६॥–७ पर्यंत. मधून मधून कोणी भेटावयास आलें तर त्यांच्याशीं हातांतल्या कामाच्या कागदाबद्दल विचार चालू ठेवूनच बोलून त्याला निरोप देतील. ज्या दिवसाचें काम त्या दिवशीं झालेंच पाहिजे यावर त्यांचा विशेष कटाक्ष. आज आलेल्या पत्राला सायंकाळच्या टपालानें उत्तर गेलेंच पाहिजे, हा त्यांचा एक आलिखित नियमच झाला होता. त्यावेळीं बाहेर गांवचे लोक मोठ्या कौतुकानें म्हणावयाचे देखील कीं, मुंबई प्रॉव्हिन्शिअल को–ऑपरेटिव्ह बँकेला पाठविलेल्या पत्राचें उत्तर तिसरे दिवशीं हमखास आलेंच पाहिजे. ऑफिसांत मोठे शेठ आहेत, म्हणजे सगळीकडे संयमाचें आणि शांततेचें वातावरण. प्रत्येक नोकराला त्यांच्याबद्दल एक प्रकारचा आदरयुक्त वचक असावयाचा. ऑफिसच्या चेंबरमधील त्यांचें अस्तित्त्व दिसलें नाहीं, तरी जाणवत असे !

आतां स्वातंत्र्याच्या काळांत मोठे मोठे अधिकारी आणि बडे बडे पुढारी खेडेगांवांत जाऊन कंगाल कृषिवलांना भेटी देतात. पण आपण पूर्वींची परिस्थिति लक्षांत आणावी. जिल्हाधिकारी कलेक्टर यांचें देखील दर्शन आतांच्या तुलनेनें दुर्लभ. मुंबईचे मोठे मोठे शेठ अगर पुढारी हे कुठें जात असत खेड्यांतून ? वैकुंठराय शेठ हे जर कै. लल्लूभाई सामळदास यांचे पुत्र नसते तर ते, मला नाहीं वाटत, या सहकारी चळवळींत पडून भारतांतील खेड्यापाड्यांतील लोकांना भेटी देऊं शकले असते. सहकारी चळवळींत पडण्यापूर्वी, वैकुंठराय शेठ हे भारत सेवक समाजांत जाण्याच्या विचारांत होते म्हणतात. पण वडिलार्जित वारसा म्हणून म्हणा किंवा दुसरें कांहीं म्हणा, त्यांनीं या चळवळीस स्वतःस वाहून घेतलें हें खास. या चळवळींत पडल्यामुळेंच त्यांना खेड्यांतील सोसायट्यांच्या सभासदांना अगदीं जवळून निरखतां आलें. बँकेच्या बहुतेक सर्व शाखांना ते वेळेनुसार भेटी देत. भेटीचे वेळीं शेतकी सोसायट्यांच्या प्रतिनिधींना बोलांवून घेऊन त्यांच्याबरोबर विचारविनिमय करीत. त्यांच्या अडचणी समजून घेत. सर्वांशीं प्रेमळपणानें, सौजन्यानें वागून सर्वांवर छाप पाडीत. परत जातांना शाखेंतील प्रत्येक शिपायास बक्षिस देण्यास ते कधींच विसरत नसत.

हाताखालील अधिकाऱ्यानें वर पाठविलेल्या पत्रावर ते डोळे झांकून सह्या करणार नाहींत. सह्या करतां करतां त्यांतील मजकूर वाचून त्यांत कुठें किरकोळ जरी चूक असेल तर ती तावडतोब दुरुस्त करून टाकतील. ऑफिसच्या पत्रव्यवहारापैकीं बऱ्याच पत्रांचीं उत्तरें काय लिहावयाचीं तें स्वतःच तोंडी सांगत. ऑफिसनें पी. सी. दाखवावयाची, नोट तयार करावयाची, ही भानगड त्यांच्याजवळ नाहीं. बहुतेक पत्रांची पी. सी. त्यांच्या स्मरणांतच असते ! त्यांची स्मरणशक्ति फारच तीक्ष्ण आहे. मला आठवतं, एका पत्रकांत एका सोसायटीचा ऑडिट वर्ग चुकीचा लिहिला होता. पण हें पत्रक त्यांच्या समोर जातांच त्यांनीं ती चूक नेमकी हेरून काढिली. ज्याच्या दृष्टीखालून हजारों सोसायट्यांचे ऑडिटवर्ग जायचे त्यास एका विशिष्ट सोसायटीचा ऑडिटवर्ग लक्षांत रहावा याचें जाणत्यांशिवाय इतरांना आश्चर्य वाटणार नाहीं. ऑफिसांतील कनिष्ठ नोकरांपैकीं एकादा होतकरू नोकर हुषार असेल तर ते त्यास वेळप्रसंगीं आर्थिक साहाय्यहि करीत. त्यास दुसरीकडे कोठें चांगला वाव मिळण्याचा संभव असेल आणि तिकडे जाण्याची त्यानें इच्छा दर्शविली तर ते त्यास प्रशस्तिपत्रक देऊन त्याचें कार्य फलद्रूप होण्यास साहाय्यहि करीत. एकादेवेळीं हाताखालील नोकराकडून अनवधानानें कामांत

चूक झाली आणि जर ती त्यानें आपण होऊन कबूल केली, तर ते त्यास क्षमा करीत. एकाद्या नोकरानें त्यांच्या दृष्टीनें उत्कृष्ट काम केलेलें असेल तर त्याचें योग्य चीज ते योग्य वेळीं निःसंशय करीत. बँकेंत असतांनाच ते कितीतरी सामाजिक कार्यें करीत हें एक त्यांनाच ठाऊक. इतर कामासाठीं ते कुठें जाणार असले आणि त्या ठिकाणच्या वाटेवरील गांवीं बँकेची शाखा असेल तर त्या शाखेचीं पत्रकें ते स्टेशनवर मागवून तीं दृष्टीखालून घालीत. थोडक्यांत म्हणजे, त्यांच्या सर्व व्याप्तांत त्यांचें खरें कार्यक्षेत्र मुंबई प्रांतिक सहकारी बँकेंत सामावलेलें होतें!

सहकारी तत्त्वावरील त्यांची निष्ठा अढळ व वाढती आहे. मुंबई प्रांतांतील आजच्या प्रगतिपर सहकारी परिस्थितीचें मोठें श्रेय त्यांनाच आहे. महात्मा गांधीजींच्या प्रभावानें ते राजकारणाकडेहि खेचले गेले. गांधीजींच्या ग्रामोद्योगाचे तर ते एक आधारस्तंभच होते. ग्रामोद्योगाचा प्रभावीपणानें प्रसार होऊन गांधीजींचे या बाबतींतील स्वप्न साकार व्हावें म्हणून तर ते राजकारणाच्या रंगणांत उतरले.

वागणुकींत कमालीचा साधेपणा आणि कल्पनातीत सौजन्य: टापटिपीची त्यांना विशेष आवड आहे. शाखेला भेट देण्यासाठी आले असतांना मध्यंतरीं कुणाला भेटावयाला जायचें तरी चटकन आपल्या प्रवासी बॅगेजवळ जातील, तीतील आरसा–कंगवा काढून कंगव्यानें भांग न पडणारे केस नीटनेटके करून आणि आरशांत तोंड पाहून मग बाहेर पडतील! प्रवासांत कुणाची मोटार मोठेपणाच्या महात्म्यांत फुकट वापरणार नाहींत. किंवा हाताखालील श्रेष्ठ वा कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून 'साहेब—संतुष्टी'त चहा देखील घेणार नाहींत. विनोदाचेंहि त्यांना अंग आहे. वैकुंठरायशेठ मंत्रिमंडळांतील राजकीय वातावरणांत परिभ्रमण करीत असले तरी त्यांचें लक्ष मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या हिताकडे सतत असतें.

बँकेंतील आजचा नोकरवर्ग त्यांच्याबद्दल असेंच म्हणेल कीं:—

* तव स्मरण संतत स्फुरणदायि आम्हां घडो। त्वदीय गुण कीर्तिनध्वनि सुरम्य कर्णीं पडो॥ स्वबँक हितचिंतनाविण दुजी कथा ना रुचो। तुझ्या समचि आमुची तनुहि बँककार्यी झिजो॥

* 'केसरी'तील श्लोकांत बदल करून.


## दि न्यू हिंदुस्थान मेटल वर्क्स
### शहापूर—बेळगांव.

आमचे कारखान्यांत पितळी भिक्षा, समई, नीरंजन अित्यादि सर्व प्रकारचा माल निरनिराळ्या सांईजमध्यें गिऱ्हाइकांच्या पसंतीप्रमाणें सुबक रीतीनें बनविला जातो.

ठोक व किरकोळ ऑर्डरप्रमाणें माल सर्व ठिकाणीं त्वरित पाठविला जातो.

सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी ठेवण्यासाठी
—कोल्हापुरांतील प्रतिष्ठित व्यापारी व सन्मान्य नागरिक यांनीं चालविलेली—

## दि युनियन बँक ऑफ कोल्हापूर लि.

शिवाजी चौक, कोल्हापूर

येथें चौकशी करा अगर भेटा. —जी. जी. श्रीखंडे, मॅ. डायरेक्टर

पहिल्याच वर्षापासून ६। टक्के करमाफ डिव्हिडंड वाटून जनतेला चोख काटकसरीची व्यवस्था दाखविणारी

संपूर्ण तुमच्याच मालकीची

## श्री शिवाजी नॅशनल बँक लि. कोल्हापूर

( पाटगांवकर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी )

ब्रँच

मिरज ( सीनियर )

भांडवलाची सुरक्षितता, पैशाचा योग्य मोबदला, कर्जावरील व ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर, वैशिष्ट्यपूर्ण मंथली फिक्स डिपॉझिटची नाविन्यपूर्ण योजना.

"स्वराज्य बॉन्ड"ची दामदुपटीची अभिनव कल्पना.

शिवाय

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

समक्ष भेटा अगर लिहा.

नारायणराव हणमंतराव साळोखे
कोल्हापूर, लक्ष्मीपुरी. मॅनेजिंग डायरेक्टर

## पुणें शहर म्युनिसिपल सर्व्हंट्स को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड.

७३, बुधवार पेठ, पुणें शहर.

( स्थापना १९१४ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५०,००० |
| वसूल भांडवल | रु. | ३५,७६० |
| रिझर्व्ह फंड | रु. | २०,७९२ |
| ठेवी | रु. | १,२०,२७४ |

चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात. याशिवाय बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

माहितीसाठी व दरांसाठी भेटा अगर लिहा.

गंगाधर काशीनाथ आगरकर
चेअरमन.

# युरोपांतील युद्धोत्तर सरहद्दींची गुंतागुंत

## तहनाम्यांची वाट न पाहतां, मिळेल त्या प्रदेशावर वर्चस्व

प्रादेशिक बदल : १९३८ ते १९४९
( आकडे चौरस मैलांचे )

| | अल्बेनिया | बल्गेरिया | चेकोस्लोव्हाकिया | फ्रान्स | ग्रीस | पोलंड | रशिया | ट्रिएस्ट | युगोस्लाव्हिया | एकूण घट (चौरस मैल) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चेकोस्लोव्हाकिया | | | | | | | ४,९२१ | | | ४,९२१ |
| डॅन्झिग | | | | | | ७५४ | | | | ७५४ |
| एस्टोनिया | | | | | | | १८,३५० | | | १८,३५० |
| फिनलंड | | | | | | | १७,७८० | | | १७,७८० |
| जर्मनी | | | | | | ३८,२३२ | ४,९४० | | | ४३,१७२ |
| हंगेरी | | | २५ | | | | | | | २५ |
| इटली | २ | | | २७५ | १,०३५ | | | २७५ | ३,०२० | ४,६०७ |
| लॅटव्हिया | | | | | | | २५,४०० | | | २५,४०० |
| लिथ्वेनिया | | | | | | | २१,५०० | | | २१,५०० |
| पोलंड | | | | | | | ६९,८६६ | | | ६९,८६६ |
| रुमेनिया | | २,९२५ | | | | | १९,७२५ | | | २२,६५० |
| एकूण वाढ (चौरस मैल) | २ | २,९२५ | २५ | २७५ | १,०३५ | ३८,९८६ | १,८२,४८२ | २७५ | ३,०२० | २,२९,२०५ |

जर्मनी शरण येऊन चार वर्षे होऊन गेलीं तरी युरोपांतील देशांच्या सरहद्दी अद्याप अधिकृत रीत्या पक्क्या झालेल्या नाहींत. रशिया व पोलंड ह्यांनीं युद्धपूर्व जर्मनीचे मोठाले प्रदेश ताब्यांत ठेवले आहेत, त्यास मित्र राष्ट्रांनीं संमति दिलेली नाहीं. जर्मनीशीं तहनामा अद्याप पुरा झालेला नसला तरी इटली, फिनलंड, हंगेरी, रुमेनिया व बल्गेरिया ह्यांचेशीं तहनामे झालेले आहेत. १९३८ पासून आतांपर्यंत रशियानें १,८२,५०० चौरस मैल मुलूख नव्यानें मिळविला आहे. लॅटव्हिया, एस्टोनिया व लिथ्वेनिया हीं बाल्टिक राष्ट्रेंहि आतां सोव्हिएट रशियाचे घटक बनलीं आहेत. ईशान्य प्राशिया रशियानें घशांत घातला आहे आणि फिनलंड, पोलंड, चेकोस्लोव्हाकिया व रुमेनिया ह्यांचेकडून तर तहनाम्यानुसारच त्याला प्रदेश मिळाला आहे. सोबतच्या तक्त्यांत रशियाची मिळकत दाखविली आहे, तींत रशियाच्या अंमलाखालील जर्मनीचा आणि पोलंड, चेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, रुमेनिया, बल्गेरिया, अल्बेनिया आणि कांहीं अंशीं युगोस्लाव्हिया ह्या रशियाचे पंखाखालील "स्वतंत्र" देशांचा समावेश केलेला नाहीं.

प्रदेशांवरील प्रभू बदलले, म्हणजे नवे राज्यकर्ते त्यांतील स्थळांचीं नांवेंहि बदलतात. त्याप्रमाणेंच, युरोपांतहि झालें आहे. जुन्या नांवावर पत्रें टाकलीं, तर "अशा तऱ्हेचें गांव अस्तित्वांत नाहीं" असा शेरा खाऊन तीं पत्रें परत येतात. रशियाच्या नव्या प्रदेशांतील स्थळांच्या जुन्या नांवांचें रशियन नांवांत तरी रूपांतर करण्यांत आलें आहे किंवा पहिल्या नांवांऐवजी अगदीं नवीनच नांवें ठेवण्यांत आलीं आहेत. उदाहरणार्थ, प्राशियांतील कनीग्सबर्गचें आतां कालिनिनग्राड झालें आहे. पोलंडला मिळालेल्या ३८, ९८६ चौरस मैल प्रदेशांत त्यानें स्थळांचीं नांवें पार बदलून टाकलीं आहेत. युगोस्लाव्हियांत जो इटलीचा प्रदेश सामील झाला, त्यांतील इटालिअन नांवें स्लाव्ह बनलीं आहेत.

१० फेब्रुवारी, १९४७ रोजीं पॅरिस येथें इटली, फिनलंड, हंगेरी, रुमेनिया व बल्गेरिया ह्यांच्या तहनाम्यावर सह्या झाल्या. त्याअन्वयें ह्या देशांपैकीं बल्गेरियाखेरीज बाकी सर्व देशांना कांहीं तरी प्रदेश गमवावा लागलेला आहे. हंगेरीचा फक्त २५ चौरस मैल प्रदेश गेला. अमेरिकेनें पांचपैकीं चार तहनाम्यांवर सही केली आहे; फिनलंड व अमेरिका हे युद्धांत प्रतिस्पर्धी नव्हते. अल्बेनिया, ऑस्ट्रिया व चेकोस्लोव्हाकिया हीं राष्ट्रें पुनः स्वायत्त बनलीं आहेत, परंतु अल्बेनिया व चेकोस्लोव्हाकिया हीं रशियाच्या वर्चस्वाखालीं आहेत. एस्टोनिया, लॅटव्हिया व लिथ्वेनिया हीं १९४० सालीं रशियांत सामील झाल्यामुळें रशियाच्या क्षेत्रफळांत सुमारें ६४,००० चौरस मैलांची भर पडली आहे. परंतु त्यास अमेरिकेनें मान्यता दिलेली नाहीं. पोलिश–जर्मन संबंधांत नेहमीं बांधा आणणारें डॅन्झिग हें १९१९ च्या व्हेर्साय्यच्या तहानें निर्माण केलेलें स्वतंत्र शहर जर्मनीनें १ सप्टेंबर, १९३९ रोजीं जर्मनीस जोडलें होतें, परंतु आतां त्याचें ग्डान्स्क ह्या पोलिश शहरांत रूपांतर झालें आहे. जर्मनीशीं तहनामा होईपर्यंत ह्या शहराची व्यवस्था पोलंडनें पाहावी, असें पोट्सडाम परिषदेंत ठरलें; परंतु तहनामा होण्यापूर्वींच पोलंडनें तेथील बहुसंख्य जर्मन लोकांची हकालपट्टी करून त्या शहरास पोलंडचाच भाग बनवलें आहे.

पोलंडचा ६९,८६६ चौ. मैल मुलूख रशियाच्या ताब्यांत गेला आहे, परंतु पश्चिमेचे बाजूस त्याला ३०,८८० चौ. मैल जर्मन मुलूख मिळाला आहे. अशा रीतीनें, युद्धानंतर पोलंडचें ३०,८८० एकूण चौ. मैलांचें नुकसान झालें आहे, परंतु पूर्वीच्या शेतीप्रधान पोलंड-मध्यें आतां बराच औद्योगिक प्रदेश समाविष्ट झाला आहे. जो

जर्मन प्रदेश पोलंडचे व्यवस्थेकडे दिलेला आहे, तो कायमचाच त्या देशाकडे राहाणार ह्या बेतानें पोलंडनें सर्व व्यवस्था चालविली आहे. रशियाला दिलेल्या प्रदेशांतील पोलिश लोक पश्चिमेकडे नेऊन मूळ जर्मनांच्या जागीं त्यांना वसविण्यांत आलें आहे.

फिनलंडनें रशियाच्या लष्करी मागण्या अमान्य केल्या तेव्हां रशियानें त्याचेवर १९३९–४० मध्यें स्वारी केली आणि फिनलंडला शरण यावें लागलें. जून १९४१ मध्यें, जर्मन दडपणामुळें फिनलंड रशियाविरुद्ध युद्धांत पडलें; परंतु सप्टेंबर १९४४ मध्यें, युद्ध संपल्यावर, फिनलंडला रशियाशीं पूर्वी केलेल्या पहिल्या तहाच्या अटी मान्य करून आणखी पुनः नवा प्रदेश सोडावा लागला. फिनलंडच्या उत्तर भागांत अत्यंत मौल्यवान निकेल पुष्कळ सापडतें व वर्षभर तेथून समुद्रमार्गें वहातूक होऊं शकते. हा भाग आतां रशियानें घेतला आहे. त्यामुळें फिनलंडला आर्टिककडे जाण्यास मार्ग उरलेला नाहीं आणि रशिया नॉर्वेच्या सरहद्दीवर येऊन ठेपला आहे.

आइसलंड हें १९१८ सालीं तरी परराष्ट्रीय बाबींत डेन्मार्कच्या नेतृत्वाखालीं होतें. १९४४ मध्यें आइसलंड पूर्णपणें स्वतंत्र झालें आहे. आयर्लंडनें १९४८ सालीं ब्रिटिश साम्राज्याचा संबंध सोडून तें रिपब्लिक बनलें. सिरिया व लेबनॉन हींहि आतां स्वतंत्र बनलीं आहेत. पॅलेस्टाइनची फाळणी करण्यांत आली आहे आणि ग्रेट ब्रिटननें १५ मे, १९४८ रोजीं त्या प्रदेशावरील आपलें मँडेट संपविल्यावरोबर तेथील ज्यू लोकांनीं इसराएलच्या स्वायत्त राष्ट्राची घोषणा केली. अरब लीगनें पॅलेस्टाइनची फाळणी मान्य केलेली नाहीं, परंतु इसराएल ह्या ज्यू राष्ट्रास अमेरिका–प्रभृति राष्ट्रांनीं मान्यता देऊन टाकली आहे. ४ एप्रिल, १९४९ रोजीं वॉशिंग्टन येथें नॉर्थ ॲटलँटिक करारावर ग्रेट ब्रिटन, आइसलंड, नॉर्वे, डेन्मार्क, नेदरलंडस, बेल्जम, लक्झेंबर्ग, फ्रान्स, पोर्तुगाल व इटली ह्या युरोपियन राष्ट्रांच्या बरोबर अमेरिका व कॅनडा ह्यांनींहि सह्या केल्या. ॲटलँटिक महासागराच्या किनाऱ्यावरील फक्त आयर्लंड, स्वीडन व स्पेन ह्यांनीं करारावर सह्या केलेल्या नाहींत. "उत्तर ॲटलँटिक प्रदेशांत स्थैर्य व सुस्थिति निर्माण करणें" हा प्रस्तुत कराराचा उद्देश आहे. त्या उद्देशाच्या सिद्धीस सहाय्य करण्याजोग्या इतर युरोपियन राष्ट्रांनाहि मूळ सही करणाऱ्या राष्ट्रांच्या संमतीनें करारांत दाखल होता येईल.

### सत्तर रुपयांना शंभराची नोट

मध्यभारतांतील खेडुतांकडून, रुपयाचें अवमूल्यन झाल्याचा फायदा घेऊन, कांहीं लोक १०० रुपयांच्या नोटा प्रत्येकीं ७० रुपये देऊन विकत घेत आहेत, असें समजतें. मध्यभारत सरकारनें ह्यासंबंधीं लोकांना इषारा देणारें एक पत्रक काढलें आहे.

### अमेरिकेच्या चित्रपट–निर्यातींत घट

१९४६ च्या प्रारंभापासून अमेरिकेंतून निर्यात होणाऱ्या चित्रपटांच्या संख्येंत घट होऊं लागली होती. ही घट १९४९ च्या पहिल्या सहामाहींतही तशीच चालू राहिली, असें कळतें. १९४९ च्या पहिल्या सहामाहींत १४,०१,६९,६५७ फूट लांबीचे चित्रपट परदेशीं निर्यात करण्यांत आले. १९४८ च्या पहिल्या सहामाहींत १५,३७,७४,६७६ फूट लांबीचे चित्रपट निर्यात करण्यांत आले होते. चित्रपटांच्या डॉलर्समधील किंमतींतही अशीच घट झालेली आहे.

### कारवारला अधिक तांदूळ

कारवारमध्यें कमी प्रतीच्या धान्याचा तुटवडा पडल्यामुळें प्रत्येक व्यक्तीला मिळणाऱ्या तांदुळाच्या शिध्यांत १० टक्के वाढ करण्यांत आली आहे. मुंबई सरकारची मंजुरी मिळण्यापूर्वी स्थानिक कलेक्टरनेंच हा हुकूम काढला आहे.


# दि बँक ऑफ कराड, लि.
## कराड.
( स्थापना : १९४६ )

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... रु. | १,०८,००० |
| खेळतें भांडवल | ... ... रु. | १८,५०,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री· लक्ष्मण महादेव देशपांडे, कराड ( चेअरमन ).
„ द्वारकादास हरीदास वखारिया, जे. पी., मुंबई
„ विष्णू रामचंद्र वेलणकर, सांगली.
„ शंकरराव प्रभाकर ओगले, ओगलेवाडी.
„ पांडुरंग केशव शिराळकर, कराड.
„ मेजर सरदार बी. एन्. पाटणकर, सातारा.
„ खानसाहेब हाजी अलीमहमद कासम, कराड.
„ डॉ. वामन गोविंद देशपांडे, कराड.
„ विष्णू दत्तात्रय शिराळकर, (मॅनेजिंग डायरेक्टर)

ठेवीवरील व्याजाचे दर

चालू ठेव १% सेव्हिंग्ज ठेव २%
मुदतीच्या ठेवी २½% ते ३½%

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

कराड, (जि. सातारा) म. वि. खंडकर
मॅनेजर



नवीन वर्ष आमच्या सभासदांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना सुखाचें जावो !

सतत सोळा वर्षें लोकादरास पात्र झालेली

# दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि., कोल्हापूर.
(स्थापना १९३३)

अधिकृत शेअर भांडवल २,००,००० रु.
वसूल झालेलें शेअर भांडवल ७५,००० रु. वर
रिझर्व्ह व इतर फंड ६०,००० रु. पर्यंत

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

कर्नल के. एस्. खानविलकर–झुंजारराव
प्रेसिडेंट.
व्ही. एन्. यादव
मॅनेजर.

# पौंडाच्या दुखण्याची रशियन मीमांसा !

[ ब्रिटिश पौंडाची किंमत उतरविण्यापूर्वी सुमारें दोन महिने 'न्यू टाइम्स' ह्या रशिअन साप्ताहिकानें पौंडाच्या अवमूल्यनाची केलेली ही मीमांसा आम्हीं येथें मुद्दाम देत आहों. तीवरून रशिआचा एतद्विषयक दृष्टिकोन स्पष्ट होण्यासारखा आहे. ]

गेल्या महिन्यांत ब्रिटननें पौंडाची डॉलरमधलि किंमत उतरविली. १९३० सालींही ब्रिटननें पौंडाची किंमत अशीच कमी केली होती. १९३० सालच्या परिस्थितींत आणि आजच्या परिस्थितींत साम्य अगर भेद काय आहे असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो.

१९३० सालीं आलेल्या मंदींत आपली निर्यात वाढावी आणि प्रतिस्पर्धी नष्ट व्हावे म्हणून भांडवलदार राष्ट्रांनीं आपआपल्या चलनाचे भाव उतरविले. त्यावेळीं त्यांनीं परस्परांच्या ह्या धोरणावर कडक टीकाही केली. १९३४ सालीं अमेरिकेलाही पौंडाच्या मागोमाग आपल्या डॉलरचा भाव ह्याच कारणासाठीं कमी करावा लागला होता. आज मात्र वेगळी परिस्थिति दिसून येते. आतां अमेरिकन भांडवलानें ब्रिटिश पौंडाचा भाव उतरविण्यासाठी दडपण आणलेलें आहे. ब्रिटनच्या स्पर्धा करण्याच्या सामर्थ्यांत वाढ झाली तर आज अमेरिकेला त्याची भीति वाटत नाहीं. आजच्या परिस्थितींत निर्यात मालाच्या किंमतीप्रमाणेंच इतरही बाबी बाजारपेठ मिळविण्याच्या चढाओढींत प्रभावी होत आहेत. आज ब्रिटनचें उत्पादनाचें सामर्थ्य आणि व्यापार, दोन्हींही खिळखिळीं झालेलीं आहेत. अमेरिकन उद्योगधंदे ब्रिटनच्या मानानें बरेच वरचढ आहेत. अमेरिकेचें उत्पादन-तंत्र आणि उत्पादक मजुरी अधिक वरच्या श्रेणीचीं आहेत. ब्रिटिश मजूर एका तासांत जितकें उत्पादन करूं शकतो त्याच्या जवळ जवळ दुप्पट अमेरिकन कामगार उत्पादन करतो. दुसऱ्या महायुद्धापासून भांडवलाच्या निर्यातीचा मक्ता जवळ जवळ संपूर्णपणें अमेरिकेकडे आला आहे. ही निर्यात मुख्यतः अमेरिकन सरकार करतें. त्यामुळें अमेरिकन भांडवलाला परदेशीय बाजारांत जोराच्या धडका मारतां येतात. १९४८ च्या तिसऱ्या तिमाहींत अमेरिकेनें ३९७.१ कोटी डॉलर्सचा माल आणि सेवा कमें निर्यात केलीं. त्यांपैकी ४० टक्यापेक्षां अधिक निर्यात अमेरिकन सरकारनें केली. ब्रिटनजवळ आज असें साधन नाहीं. अमेरिकेची घरची बाजारपेठ विस्तृत आहे. त्यामुळें अमेरिकेला परदेशीं बाजारांत अत्यंत कमी किंमतीनें माल विकणें सहज परवडूं शकते. एकंदर उत्पादनापैकीं अमेरिका सुमारें ९ टक्के माल निर्यात करते. ब्रिटनला सुमारे २५ टक्के माल निर्यात करावा लागतो. त्यामुळें घरच्या बाजार पेठेंत मालाच्या किंमती चढवून, जरूर पडल्यास परदेशीं त्या कमी करणें अमेरिकेला शक्य होतें. ब्रिटनला हा मार्ग फारसा अनुसरतां येत नाहीं. वरवर पहातां अमेरिकन भांडवलापेक्षां ब्रिटिश भांडवल कमताकद दिसतें, पण परिस्थिति अशी चमत्कारिक आहे कीं अमेरिकन भांडवलाच्या सामर्थ्यांतच त्याचें दौर्बल्य लपलेलें आहे आणि ब्रिटनच्या दुर्बलतेमुळेंच ब्रिटनला थोडेबहुत हातपाय हलवितां येण्यासारखे आहेत. अमेरिकेच्या आयातींत आणि निर्यातींत फार मोठी तफावत आहे त्यामुळें जगभर डॉलर्सची टंचाई भासत आहे. अमेरिकन अर्थव्यवस्थेची दुर्बलता हीच आहे. उलटपक्षीं, ब्रिटनची आयात निर्यातीपेक्षां अधिक आहे. अमेरिका स्वतःला लागणारें धान्य आणि कच्चा माल स्वतःच मुबलक निर्माण करते. उलट, ब्रिटनला दोन्ही गोष्टी बऱ्याच मोठ्या प्रमाणांत आयात कराव्या लागतात. अमेरिका जितकी आयात करते त्याच्या जवळ जवळ दुप्पट निर्यात करते. ब्रिटनचें मात्र ह्याच्या उलट आहे. १९४९ च्या पहिल्या तिमाहींत अमेरिकेनें ३२४.२ कोटी डॉलर्सचा माल निर्यात केला. त्याच कालांत ब्रिटननें फक्त १८५.२ कोटी डॉलर्सचा माल आयात केला, तर अमेरिकेनें फक्त १७६.७ कोटी डॉलर्सचा माल आयात केला.

अमेरिका ज्या देशांना माल निर्यात करते, त्यांच्याकडून होणाऱ्या आयातीवर मात्र नियंत्रणें घालते. उलटपक्षीं, ब्रिटन ज्या देशांना माल निर्यात करते, त्यांच्याजवळील अन्नधान्यें आणि कच्चा माल ब्रिटनला हवाच असतो. म्हणजे, आयातीचा उपयोग आपल्या बाजारपेठा भक्कम करण्यासाठी ब्रिटन करीत असते. ह्या व्यवहारांत ब्रिटनचें लक्ष अनकूल किंमतीपेक्षां परस्परांच्या विनिमयाकडेच अधिक असणें साहजिकच आहे. ह्या परिस्थितीचा फायदा करून घेतल्यामुळें गेल्या दोन वर्षांत ब्रिटनची निर्यात ५० टक्यांनीं वाढली आहे. उलटपक्षीं, मार्शल योजना आणि अमेरिकन मालाच्या कमी किंमती ह्या दोन्ही गोष्टी अनुकूल असूनही अमेरिकेची निर्यात ⅓ नें घटली आहे. तथापि, सध्या बाजारपेठांसाठी जी स्पर्धा चालली आहे त्यांत अमेरिकाच जिंकणार ह्यांत शंका नाहीं. ब्रिटनचा परदेशी व्यापार हा पौंडाच्या हुंडणावळीचा निश्चित दर आणि पौंडाची दुसऱ्या हुंडणावळींत अपरिवर्तनीयता ह्यांच्यावर आधारलेला आहे. पौंडाचा बदला करतां आला तर जे देश ब्रिटनला अन्नधान्य आणि कच्चा माल पुरवितात त्यांना आपल्या पौंडांचे डॉलर्स करतां येतील. त्या डॉलर्सचा उपयोग करून त्यांना अमेरिकेकडून यंत्रसामुग्री व पक्का माल अधिक स्वस्त भावानें आणि जरूर पडल्यास उधारीनें घेतां येईल. अर्थातच पौंडाची किंमत कमी करण्याचा अमेरिकन भांडवल जेव्हां आग्रह धरतें, तेव्हां पौंडाचा परकीय हुंडणावळींत बदला करण्याची सोयही त्याला हवी असते. तसा बदला करता आला तरच अमेरिकेला ब्रिटनचें सध्याचें गिऱ्हाइक फोडतां येईल. इंग्लंड आणि पश्चिम युरोपांतील राष्ट्रें ह्यांना अमेरिकन मालाची आयात करावी लागत आहे. उलट, डॉलरच्या कक्षेंतील भागांत निर्यात मात्र त्यांना करतां येत नाहीं. त्यामुळें ब्रिटनला डॉलर्सची टंचाई एकसारखी भासते. ब्रिटननें निरनिराळ्या देशांकडून अन्नधान्य आणि कच्चा माल आयात करावा आणि आपण त्या देशांतून आपला पक्का माल खपवावा अशी सोय अमेरिकन भांडवलाला पाहिजे आहे. पौंडाचा बदला करण्याची सोय असेल तरच अमेरिकेचें हें साध्य शक्य होईल हें उघड आहे. ब्रिटनच्या पौंडांची किंमत कमी झाल्यामुळें कांहीं काळ ब्रिटनची स्पर्धा करण्याची शक्ती वाढेल हें खरें; पण दूरच्या साध्याकडे लक्ष देऊन हा धोका पत्करण्याची अमेरिकन भांडवलाची तयारी आहे. दोन राष्ट्रांतील स्वतंत्र व्यापारी कराराची पद्धत मोडून त्याऐवजीं अनेक राष्ट्रांतील अनिर्बंध व्यापाराची पद्धत ब्रिटनला स्वीकारायला लावली तर आपल्या मालाच्या कमी किंमतींच्या जोरावर, आपण ब्रिटनची बाजार पेठ अखेर काबीज करूं शकूं, असा अमेरिकेचा विश्वास आहे. शिवाय रबर आणि टिन सारखे पदार्थ अमेरिकेला ब्रिटिश साम्राज्याकडून घ्यावे लागतात. त्यांच्या किंमती उतरल्यानें अमेरिकन भांडवलाचा फायदा होईल तो वेगळाच. इंग्लंड आणि पश्चिम युरोपांतील राष्ट्रांच्या चलनाची किंमत कमी केल्यामुळें तेथील उद्योगधंदे अमेरिकेला अगदी स्वस्त भावानें विकत घेण्याची संधीहि मिळेल. ब्रिटन आणि अमेरिका ह्यांच्यांतील सध्याचें स्पर्धेचें स्वरूप

## हिंदुस्थान रबर प्रॉडक्टस्

११० मंगळवार, पुणें.

पुण्यांतील हा जुना व मोठा कारखाना हरतऱ्हेच्या नव्या नव्या रबरी वस्तू विक्रीस काढणार आहे.

आमची रबर स्पंज कुशन्स् लवकरच मिळूं लागतील.

ही दिवाळी आमचे ग्राहकांस सुखाची जावो.

दि सदर्न निटिंग वर्क्स लि.

—पुणें २—

ह्यांनीं तयार केलेली

## ★होजिअरी★

सर्व प्रकारचा सुती, लोकरी आणि जाळीचा, निरनिराळ्या डिझाइन्समधील माल

## इंटरलॉक अंडरवेअर्स व शर्टस्

एस. व्ही. सुपनेकर कुलकर्णी अँड सन्स लि.
मॅनेजिंग एजंटस्

## श्रीलक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लिमिटेड

पो. भाटघर—भोर

महाराष्ट्रांतील हातमागांना उत्तम सूत पुरविणारी सुताची गिरणी.

★ अधिकृत भांडवल १५ लाख
★ विकलेलें व वसूल भांडवल १०॥ लाख
★ कंपनीची मालमत्ता १६ लाखांचे वर

कंपनीचे वाढलेले कामाकरितां ठेवी घेणें आहेत.

व्याजाचे दर : १ वर्ष ५% २ वर्षें ५॥% ३ वर्षें ६% प्रमाणें.

व्याज दर सहामाहीस दिलें जातें.

—मॅनेजिंग एजंटस्—

दि भोर मर्कंटाइल एजन्सी लि०, भोर

★★

द. वा. फाटक
पायोनियर डाईंग हाऊस लि.,
६२५ सदाशिव पेठ, पुणें २.

मा. ग. देसाई
एस. एल. राजर्षि आणि कं.
३८८।९४ शेख मेमन स्ट्रीट, मुंबई २.

केवळ ‘ हुंडणावळींचें युद्ध ’ असें नाहीं. ह्या स्पर्धेच्या निकालावर एक पहिल्या प्रतीचा औद्योगिक आणि निर्यात करणारा देश म्हणून ब्रिटनचें भवितव्यच अवलंबून आहे.

१९४८ च्या प्रारंभालाच भांडवलदार राष्ट्रांच्या निर्यातींत घट होऊं लागली होती. अमेरिकेच्या उत्पादनांत झालेली घट आणि घरच्या बाजारपेठेचें आकुंचन, ह्या दोन कारणांमुळें ब्रिटनची अमेरिकेंतील आधींच कमी झालेली निर्यात आणखी घटली. १९४८ सालीं ब्रिटन दर महिना सुमारे ५९,००,००० पौंडांची निर्यात करत असे. १९४९ च्या एप्रिल, मे आणि जून महिन्यांत ब्रिटनची निर्यात अनुक्रमें ३३,००,००० पौंड, ३६,००,००० पौंड आणि ३०,००,००० पौंड अशी झाली. निर्यातींत झालेल्या ह्या घटीमुळें १९४९–५० सालीं डॉलर विभागांतील खरेदी १०,००,००,००० पौंडानें कमी करण्याचें ब्रिटननें ठरविलें. ब्रिटनचे अर्थमंत्री मि. स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं जाहिर केल्याप्रमाणें १९४९ च्या दुसऱ्या तिमाहींत ब्रिटनचा डॉलरचा तुटवडा १५,७०,००,००० पौंडांच्या घरांत गेला. पहिल्या तिमाहींत हा आकडा ८,२०,००,००० पौंडांचा होता. ह्याच वेळीं पौंडांच्या गटांतील राष्ट्रांच्या जवळील दुर्लभ चलनाचा सांठा कमी झाला. ३१ मार्च १९४९ रोजीं हा सांठा ४७,१०,००,००० पौंडांचा होता; तो जून ३० अखेर ४०,६०,००,००० पौंड इतका खालीं आला.

सारांश, ब्रिटनच्या पौंडाचें दुखणें, त्या देशाचें अमेरिकेच्या मानानें मागासलेलें औद्योगिक उत्पादनाचें तंत्र आणि तज्जन्य निर्यातीची घट ह्या कारणांमधून उद्भवलेलें आहे. १९२९–१९३३ च्या आर्थिक मंदीच्या काळांत ब्रिटन आयात करीत असलेल्या कच्च्या मालाच्या किंमती ब्रिटनाच्या निर्यातीच्या मालाच्या किंमतीपेक्षां अधिक घसरल्या. त्यावेळीं पौंडाची किंमत उतरवून ब्रिटननें परिस्थितीचा फायदा घेतला. परंतु आज तशी परिस्थिति राहिलेली नाहीं. कारण, ब्रिटनच्या निर्यात मालाच्या किंमती जितक्या वाढल्या आहेत त्यापेक्षा अधिक चढ्या किंमती ब्रिटन आयात करीत असलेल्या कच्च्या मालाच्या झालेल्या आहेत. अशा स्थितींत, पौंडांची किंमत कमी करून किती काळ निभाव लागेल हा प्रश्नच आहे.

## राहणीच्या खर्चांत वाढ

१९३७ ते १९४८ ह्या मुदतींत वेगवेगळ्या देशांत राहणीचा खर्च किती वाढला, तें शतमानानें (%) दाखविलें आहे.

**१००% पेक्षां कमी**

| | | |
|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ... | १० |
| न्यूझीलंड | ... | ३६ |
| ऑस्ट्रेलिया | ... | ५० |
| द. आफ्रिका | ... | ५७ |
| कॅनडा | ... | ५८ |
| स्वीडन | ... | ६० |
| नॉर्वे | ... | ६६ |
| स्वित्झर्लंड | ... | ६६ |
| डेन्मार्क | ... | ७० |
| अमेरिका | ... | ७० |
| युराग्वे | ... | ८० |
| आयर्लंड | ... | ८८ |
| वेनेझुएला ( १९४७ ) | ... | ८८ |
| अर्जेंटिना | ... | ९१ |

**१००% ते ३००%**

| | | |
|---|---|---|
| पनामा | ... | १०६ |
| नेदरलंडस | ... | १०७ |
| पोर्तुगाल | ... | ११३ |
| कोस्टारिका | ... | ११४ |
| ग्वाटेमाला | ... | ११८ |
| डोमिनिकन रिपब्लिक | ... | १३३ |
| बेल्जम | ... | १४३ |
| सिलोन | ... | १६३ |
| इजिप्त | ... | १८३ |
| कोलंबिया | ... | १९३ |
| हिंदुस्थान | ... | २०५ |
| लक्झेंबर्ग | ... | २०६ |
| आइसलंड | ... | २२४ |
| झेकोस्लोव्हाकिया | ... | २२८ |
| पेरू | ... | २४८ |
| तुर्कस्तान | ... | २५३ |
| ब्राझील | ... | २७३ |
| मेक्सिको | ... | २७९ |

**३००% ते ५००%**

| | | |
|---|---|---|
| पॅरेग्वे | ... | ३०९ |
| जपान | ... | ३२० |
| फिलिपाइन्स | ... | ३३९ |
| ब्रह्मदेश | ... | ३४० |
| चिली | ... | ३४७ |
| स्पेन | ... | ३५८ |
| लेबेनॉन | ... | ४०७ |
| हंगेरी | ... | ४२३ |

**५००% पेक्षां जास्त**

| | | |
|---|---|---|
| बल्गेरिया ( १९४७ ) | ... | ५६९ |
| बोलिव्हिया | ... | ६१५ |
| इराक | ... | ६२१ |
| इराण | ... | ६९६ |
| फिनलंड | ... | ७४७ |
| निकारॅग्वे | ... | ७७३ |
| इंडोनेशिया | ... | १८४० |
| फ्रान्स | ... | २,१०४ |
| इंडोचायना | ... | ३,३८५ |
| इटली | ... | ४,८३७ |
| पोलंड | ... | १२,९४० |
| ग्रीस | ... | २४,८१५ |
| चीन | | ३१,७१,५२,२०० |

## सुपारी चघळा आणि सुखी व्हा.

### लोकांना शांति देणारा उपाय

अमेरिकेचें राष्ट्रीय जीवन सुधारण्यास सुपारी खाण्याचा उपाय अमेरिकेंतील 'जर्नल ऑफ केमिकल एज्युकेशन' ह्या नियतकालिकांत एका पत्रलेखकानें दिला आहे. तो म्हणतो, "सुपारींत अर्कोलाइन नांवाचा निकोटिनिक ॲसिडचा उपपदार्थ असतो. सुपारी चघळली म्हणजे त्यामुळें स्वास्थ्य, प्रसन्नता व समाधानी वृत्ति निर्माण होते असें गिल्मनच्या ऑरगॅनिक केमिस्ट्रींत सांगितलें आहे. अमेरिकन लोकांना ऐहिक बाबतींत कमरता नसली तरी ते कष्टी, असमाधानी व चिडखोर आढळतात; सर्व तऱ्हेच्या काळज्यांस ते बळी पडतात. तिरस्कार, भीति, इत्यादींचा मग केव्हांतरी अचानक स्फोट होतो. अमेरिकन लोकांची ह्या सर्वांतून मुक्तता करण्याचा मार्ग अर्कोलाइननें दाखवून दिला आहे. २ कोटी डॉलर गुंतवून सरकारनें शेकडो टनावारी अर्कोलाइनचें उत्पादन सुरू करावें. कॉफी, सिगारेटस, आइसक्रीम, बीर, इतर पेयें, ह्या सर्वांतून अर्कोलाइन मिसळण्याची सक्ति करण्यांत यावी. अमेरिकेला हेवा, भीति, चढाईंत येणारें अपयश, वागण्याची वाईट पद्धति, इत्यादींतून सुटका करण्यासाठी ॲटम बॉबची निर्मिती कशाला पाहिजे? अर्कोलाइनचा उपयोग करून पाहा!" न्यू टाइम्समध्यें हें पत्र उद्धृत करण्यांत आलें आहे.

अमेरिकेच्या श्रीमंती दुखण्यावर सुपारीचा उपाय तेथील एका रासायनिक नियतकालिकांत प्रसिद्ध करण्यांत आला, हें कशाचें निदर्शक आहे? स्पर्धामय जीवनाचा अतिरेक अमेरिकेस जाणवूं लागला असून त्यांतून सुटका करून घेण्यासाठी सुपारीकडे धाव कां घेण्यांत येत आहे? अर्कोलाइनचा प्रयोग अमेरिकेनें खरोखरच सुरू केला, तर भारतानें जागतिक शांततेसाठी फारच मोठी कामगिरी केल्यासारखें होईल! आर्थिक उत्कर्षासाठी आपण धडपड करण्याचें टाळतों, त्याचें कारण आपलें सुपारीचें सेवन हें तर नाहींना? परंतु, तसें कसें म्हणता येईल? भारताला स्वराज्याचा मूलमंत्र देणारे लोकमान्य व सुपारी ह्यांचा निकटचा संबंध सुप्रसिद्धच आहे. तेव्हां, आपल्या उत्कर्षासाठी सुपारी-बंदीच्या मोहिमेची येथील हवामानांत तरी आवश्यकता नाहीं आणि ऐहिक सुख परकोटीस जाऊन त्याचे दुष्परिणाम आपणांस भोगावे लागतील, त्याची आज भीति बाळगण्याचें कारण नाहीं. अर्कोलाइन स्वतंत्र बाजूस काढण्याऐवजी प्रत्यक्ष सुपारी चघळणेंच अधिक श्रेयस्कर, असा प्रचार भारत सरकारनें अमेरिकेंत आतांच सुरू केलेला बरा. म्हणजे आपलीं पोफळींचीं झाडें आपणांस डॉलर मिळवून देऊं लागतील आणि सुपारीच्या गुंगींत अमेरिकन सापडले कीं त्यांचें पुढारीपण संपुष्टांत येण्यास किती वेळ लागणार?

### संयुक्त प्रांतांतील जमिनदारी

जमिनदारी नाहींशी करण्यासाठी संयुक्त प्रांत सरकारनें नुकसान भरपाईसाठी जो फंड उभारला आहे त्या फंडाला कानपूर जिल्ह्यांतील किसानांनीं ३ लाख रुपये दिले असें समजतें. जमिनदारांना नुकसान भरपाई देऊन आपल्या मालकीची जमीन करण्यांत किसानांची स्पर्धा चालली आहे. फंड गोळा करण्यासाठी मुद्दाम ट्रेझरी ऑफिसेस उघडण्यांत आलीं आहेत.

...

### मद्रास सरकारचा हुकूम

मद्रास प्रांतांतील साखरेच्या कारखान्यांनीं ठरविलेल्या किंमतीला सर्व साखर आपणासच विकली पाहिजे, अशा आशयाचा हुकूम मद्रास सरकारनें काढला आहे.


ही दिवाळी आमच्या ग्राहकांस आनंददायी व भरभराटीची जावो.

दि सराफ बँक ऑफ कोल्हापूर लि.

बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात.

भेटा अगर लिहा:—

सी ४७४, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर } रा. ग. कदम, मॅ. डायरेक्टर.

पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनिवार पेठ पुणें २

॥ शुभेच्छा ॥

आमचे शेतकरी बंधू व शहरी ग्राहक यांना यंदाची दिवाळी सुखाची व आनंदाची जावो.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

गिरगांव, मुंबई.

(टे. नं. ३१६७५) (स्थापना १९१८)

खेळतें भांडवल १ कोटीच्या वर.

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., अध्यक्ष
शं. वि. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी

सब-ऑफिसः दादर ★ सब-ऑफिसः माहीम

बेळगांव शाखा: मार्केट, बेळगांव

Dr Waman Gopal's Sarsaparilla
BEST BLOOD PURIFIER






# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.



स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४८ अखेर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. १,३१,००० |
| ठेवी | रु. ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.





### कच्छमध्यें मिठागरें

कच्छच्या रणांत नवीन मिठागरें उघडण्यांत आलीं आहेत. ह्या सर्व मिठागरांचें क्षेत्रफळ ७,००० एकर भरतें. मिठागरांपासून दर वर्षी ३,५०,००० मण मीठ तयार होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

### काश्मीरची अन्न–आघाडी

काश्मीरच्या सरकारनें यंदाच्या रबी पिकाच्या हंगामासाठी ५,००० एकर जमीन यांत्रिक शेतीखालीं आणण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी सरकारनें १० यांत्रिक नांगर विकत घेतले आहेत.


### पाहिजे

बी. कॉम. अगर तज्ज्ञ व अनुभविक विशेषतः को–ऑपरेटिव्ह बँकेंत काम केलेल्या इसमाची मॅनेजरच्या जागीं रुपये १२५ ते २०० चे ग्रेडवर शिवाय महागाआी भत्ता रु. ४५ या वेतनावर नेमणूक करणेची आहे. तरी योग्य सर्टिफिकेट्ससह ता. १५।११।१९४९ चे आंत इकडे अर्ज पाठवावेत. मुलाखतीकरतां बोलावलेस आपले खर्चानें यावे लागेल.


क. ता. १४–१०–४९

आण्णासाहेब आप्पासाहेब शिराळे,
प्रेसिडेंट,
दि कोल्हापूर अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक लि.,
कोल्हापूर.

★ व्यापारी लोकांस खूष खबर ★


आमचे दुकानाकडून सर्वांच्या आवडीच्या अस्सल केशर-मिश्रित श्रीखंडवड्या व सर्व प्रकारचें सुवासिक, औषधी, फळाफुलांच्या वासाचें व रुचीचें पेपरमिंट, गुलकंद, सुगंध, कुंकूडबी, काजळडबी, उंची उदबत्ती, जानवी-जोड, वगैरे भाव मागवा.

**भारत इंडस्ट्रिअल वर्क्स,**
**२७४ शनवार, पुणें २.**



नवीन काळ्या व हिरव्या रंगाच्या उषा मशिन रोख्रीनें अगर हप्त्यानें मिळतील.

**महाराष्ट्र ट्रेडिंग कार्पोरेशन लि.**
लक्ष्मीरोड, लकडीपूल नाका, पुणें २.



**डोंगरे यांचे बालामृत**

**दि ऑल इंडिया जनरल इन्शुअरन्स. कं लि.**

कोट, मुंबई.

आयुष्य खात्याकरितां ऑर्गनायझर-पगारी-तावडतोब नेमणें आहेत.

आजच लिहा अगर भेटा—

बी. व्ही. भट, ब्रँन्च मॅनेजर,
पोस्ट बॉक्स नं. ५७० पुणें नं. २.

कुलाबा जिल्ह्यांतील अनुक्रमानें व गुणानें पहिला

**पनवेल तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. पनवेल.**

( स्थापना २९–३–४४ )

| | | |
|---|---|---|
| शेअर्स भांडवल : ( अधिकृत ) | रु. | ५०,००० |
| ” ” ( वसूल ) | रु. | ३५,७९० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४३,०४८ |

मुख्यतः शेतकऱ्यांच्या हितासाठी स्थापन झालेली सहकारी संस्था.

एन्. व्ही. भाटे,
ॲक्टिंग मॅनेजर.

## सरकारी कर्जाची विभागणी

### प्रॉ. नोटा, स्टॉक सर्टिफिकिटें व स. ज. ले. खातीं

हिंदुस्थान सरकारच्या कर्जापैकीं किती कर्ज सरकारी प्रॉमिसरी नोटांच्या, स्टॉक सर्टिफिकेटसच्या, सबसिडिअरी जनरल लेजर अकाउंटच्या व इतर स्वरूपांत आहे, ह्याचा तपशील खालीं दिला आहे त्यावरून स. ज. ले. अकाउंट्समधील कर्जाचें प्रमाण वाढत असून स्टॉक सर्टिफिकिटांचें प्रमाण उतरत आहे, असें दिसून येईल.

सरकारी कर्जाची वर्गवारी

| ३१ मार्च रोजीं | प्रॉ. नोटा % | स्टॉक सर्टिफिकिटें % | स.ज.ले. % | इतर % |
|---|---|---|---|---|
| १९४२ | ५३·६९ | १५·४० | ३०·५७ | ०·३४ |
| १९४३ | २५·६० | ३१·२८ | ४२·८५ | ०·२७ |
| १९४४ | ३२·६५ | २८·८८ | ३८·२७ | ०·२० |
| १९४५ | ३७·०५ | २५·९५ | ३६·८५ | ०·१५ |
| १९४६ | ३७·४० | २२·६६ | ३९·५३ | ०·११ |
| १९४७ | ३५·९० | २२·६६ | ४१·८० | ०·०४ |
| १९४८ | ३३·०४ | २०·९४ | ४५·९९ | ०·०३ |
| १९४९ | ३३·७५ | १९·६५ | ४६·५७ | ०·०३ |

### यशाचा सोपान-मार्ग

१००%– केलें !
९०%– करूनच दाखवतों.
८०%– नक्की जमणार.
७०%– जमेलच.
६०%– प्रयत्न करतोंच.
५०%– करून पाहावें, असें वाटतें.
४०%– मला बहुधां करतां येईल.
३०%– मला करतां येईल, तर बरें.
२०%– कसें तें मला माहीत नाहीं.
१०%– मला येणार नाहीं.

### आकडेशास्त्रानें सिद्ध !

" डॉक्टर साहेब, मी बरा होण्याचा संभव किती आहे ? "

" शंभर टक्के ! ह्या रोगास दहापैकीं नऊ जण बळी पडतात, असें आकडेशास्त्र सांगतें. नऊ जण अगोदरच त्यानें मेले आहेत; तुम्ही दहावे आहांत. "


### डॉक्टर व पेशंट

डॉक्टरसाहेबांना त्यांचा एक जुना पेशंट रस्त्यांत भेटला. त्याला ते म्हणाले, " बरी गाठ पडली. तब्येत कशी काय आहे ?" पेशंट घाबरत म्हणाला, " पण डॉक्टरसाहेब आधीं सांगा, ह्याला कांहीं चार्ज नाहींना ! "

### दुष्ट सदसद्विवेकबुद्धि !

" माझी सदसद्विवेकबुद्धि फारच तीव्र आहे. कांहीं गोष्टी करण्याच्या आड ती येते, असें नाहीं; पण त्यांतलें सुख मात्र ती नष्ट करते. "

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★
९६ नारायण पेठ, पुणें २.







दि व्हल्कन इन्शुअरन्स कं लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.



# मुंबई प्रांतांतील वीज–पुरवठ्याचा प्रश्न

## सध्याच्या उत्पादन केंद्रांच्या शक्तींत वाढ

मुंबईला व आसपासच्या प्रदेशाला विजेचा पुरवठा मुख्यतः टाटा कंपनीच्या जाळ्यांतून होतो, ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. सध्यां या भागांत विजेचा तुटवडा कां भासत आहे, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे.

१९३९–४० सालीं टाटा कंपन्यांकडे मुंबईची व इतर सर्व ठिकाणची मागणी व मुंबईच्या लोकल गाड्यांसाठीं वीज पुरवूनहि वर सुमारें ३०,००० किलोवॅट शक्ति शिल्लक असे व जी. आय. पी. चें कल्याण जवळील चोला केंद्र फक्त कल्याण–पुणें–इगतपुरी गाड्यांस वीज पुरवीत असे. नंतर टाटा व जी. आय. पी. यांचा एक करार होऊन अशी व्यवस्था अमलांत आणण्यांत आली कीं, शक्य तोंवर टाटाची वीजच वापरण्यांत यावी व वर लागेल तेवढीच चोलामध्यें उत्पन्न करण्यांत यावी.

परंतु युद्धकालांत विजेची मागणी इतकी वाढली कीं १९४८ नंतर रेल्वेनें चोला केंद्राची सुधारणा करून टाटाकडून कमी वीज मागावी असें ठरविण्यांत आलें. ही यंत्रसामुग्री अजून न आल्यामुळें टाटाची सुमारें २०–२५,००० कि. वॅ. शक्ति रेल्वेंत गुंतली आहे, व ती उद्योगधंद्यांस मिळूं शकत नाहीं.

कोयना नदी योजना कित्येक वर्षें अमलांत येऊं शकणार नाहीं, तोंपर्यंत पुढील लहान योजना मिळून टाटा–जी. आय. पी. जाळ्याची शक्ति सुमारें ९४,००० कि. वॅ. नें वाढून वार्षिक १७० कोटी युनिट ज्यास्त उत्पन्न होतील अशी अपेक्षा आहे.

वीज–उत्पादनाचीं चार मुख्य केंद्रें आहेतः–टाटा कंपन्यांचीं खोपोली, भिरा व भिवपुरी हीं तीन जलशक्ति केंद्रें व जी. आय. पी. रेल्वेचें कल्याण जवळचें चोला हें वाफेनें चालणारें केंद्र. या केंद्रांचीं उत्पादन शक्ति वाढविण्याच्या कित्येक योजना मूर्त स्वरूपांत येत आहेत.

### भिरा–भिवपुरी–खोपली व चोला

( १ ) भिरा केंद्रास मुळशी तलावाचें पाणी ज्यांतून येतें त्या बोगद्याच्या तोंडाच्यापेक्षा खालीं असलेलें पाणी पंपानें बोगद्यांत चढवण्याची योजना आहे, आणि पॉवर हाऊसमधून खालीं सोडण्यांत येणारें पाणी पुन्हां अडवून त्यावर आणखी ८,००० कि. वॅ. चें यंत्र चालविण्याची शक्यता आहे. या दोन योजना झाल्यास अनुक्रमें वार्षिक १० कोटी युनिट व ३ कोटी, ८० लक्ष युनिट उत्पादन वाढूं शकेल. सध्यांच्या पॉवर हाऊसमध्यें २२,००० कि. वॅ. चें नवीन यंत्र बसविण्याचाहि विचार आह, आणि यासाठीं एक नवीन लहान तलाव बांधणें, नवीन नळ टाकणें, आणि भिरापासून खोपोलीपर्यंत नवीन तारा टाकणें, ह्या गोष्टींचीहि जरूरी पडेल. या योजनेचा खर्च अंदाजें ४ कोटी रु. होईल.

( २ ) भिवपुरीस प्रत्येकीं १२,००० कि. वॅ. चीं दोन नवीन यंत्रें बसविण्याची योजना आहे. शिवाय आंध्रा तलावाच्या उत्तरेस भामा नदीस बंधारा घालून एका नवीन बोगद्यांतून तिचें पाणी आंध्रा तलावांत सोडण्याचा विचार आहे. यामुळें भिवपुरीचें वीज उत्पादन बरेंच वाढूं शकेल.

( ३ ) खोपोलीच्या यंत्रांतील गुंडाळलेल्या तारा बदलण्याचें काम सुरू आहे, तें झाल्यानंतर खोपोलीची शक्ति ६,००० कि. वॅ. नें वाढेल. त्याचप्रमाणें, खोपोली ते परेलपर्यंत वीज वहातुकीची नवी लाइन टाकण्यांत येत आहे. ती झाल्यानंतर सध्यांच्या लाइनमध्यें वाया जाणाऱ्या शक्तींपैकी ४,००० कि. वॅ. शक्ति बांचेल अशी अपेक्षा आहे. तेव्हां १९५० मध्यें मुंबईस १०,००० कि. वॅ. जास्त पुरवठा होईल. याबरोबरच खोपोलीचे जुने ट्रॅन्सफॉर्मर्सहि बदलण्यांत आले आहेत व १९१४ सालचें हें उत्पादन केंद्र अगदीं आधुनिक स्वरूपाचें होणार आहे. परेळलाहि जुने ट्रॅन्सफॉर्मर्स १९५१ सालीं बदलले जातील.

खोपोलीसाठीं कुंडली बंधाऱ्याचें पाणी घेण्याची योजना कांहीं वर्षांपूर्वीं सोडून देण्यांत आली होती, ती पुरी करून तेथील पाणी पंपानें चढवून शिरवटा तलावांतून खोपोलीस पुरवण्याची योजना आहे, त्यानें तेथें जास्त वीज निर्माण होईल.

( ४ ) कल्याणला चोला केंद्रांत सन १९५२ पर्यंत ३०,००० कि. वॅ. चीं यंत्रें बसविण्यांत येणार आहेत व तीं बसल्यानंतर टाटा व रेल्वे यांच्या संयुक्त क्षेत्रांतील पुरवठा–परिस्थितींत बरीच सुधारणा होईल.

या सर्वांखेरीज शिवाय एक ५०,००० कि. वॅ. चें कोळशावर चालणारें केंद्र मुंबईजवळ उभारावें असा कांहीं तज्ज्ञांचा सल्ला आहे, त्याचा अजून विचार चालू आहे.

सध्यां मुंबईला वीज तुटवड्यामुळें गिरण्यांना फिरती सुट्टी देणें वगैरे प्रकार चालू आहेत त्यावरून आणि नवीन वीज पुरवठा मिळण्याच्या अडचणींवरून वरील सर्व योजनांची जरूरी लक्षांत येईलच.







पुण्यांत पहिल्या प्रतीचें व प्रसिद्ध असलेलें

वारे अँड सन्स

स्टोव्ह अँन्ड लाईट मर्चंट

५४८ शनिवार पेठ, नातू हौदाजवळ, पुणें २.






वेस्टर्न इंडियानें अखिल भारतीय विमा क्षेत्रांत अत्युच्च स्थान संपादिलें आहे. स्वतःचें व भावी पिढीचें आयुष्य आर्थिक दृष्ट्या सुखासमाधानाचें करण्यास वेस्टर्न इंडियाचा सल्ला घ्या.

"विलिको" छत्राखालीं असे निर्धास्त रहा.

दिपवाळीचे मंगल प्रसंगीं स्वतःचा व आपले कुटुंबियांचा विमा घेणें केव्हांहि हिताचें ठरेल.

शाखा व ऑर्गनायझेशन कचेऱ्या

मुंबई, नाशिक, सोलापूर, बेळगांव, जळगांव, अहमदनगर, जालंदर, दिल्ली, कलकत्ता, मद्रास, नागपूर, अहमदाबाद, बडोदें, इंदोर, हुबळी.

**वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कं. लि.**

सातारा

GLOBARTS

प्रतिनिधित्वासाठीं समक्ष भेटा अगर लिहाः–

**वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कं. लि., सातारा.**

पुणें शाखाः १७९, बुधवार पेठ, बेलबागेजवळ, पुणें २.

# दि सांगली बँक, लि.

*( Incorporated In Sangli State. Liability Of Members Limited. )*

**स्थापना : १९१६**

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये | ३,००,००० |
| रिझर्व्ह फंड | रुपये | ३,१५,००० |

**खेळतें भांडवल एक कोटीचे वर**

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. ह. ब. कुलकर्णी ( चेअरमन )

★ श्री. बी. ए. आरवाडे ★ श्री. एस. जी. गाडगीळ ★ श्री. एल. के. शहा ★ श्री. डी. एल. आरवाडे.

मुख्य ऑफीसः––सांगली.

शाखाः–(१) मुंबई (२) शहापूर (३) रबकवी (४) शिरहट्टी (५) तेरदळ (६) कवठे (७) मंगळवेढें (८) कऱ्हाड (९) उगार (१०) विलिंग्डन कॉलेज (११) वानलेसवाडी.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

पी. एस. मोकाशी, मॅनेजर.

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

(१) महाराष्ट्रांत साखरेचा धंदा १० टक्के नफ्यांत चालतो.

(२) उंसाचें उत्पन्न दर एकरीं "सुरू" ४५ टन व "आडसालीं" ६० टन मिळूं शकतें. सिंडिकेटच्या जमिनी चांगल्या आहेत व उंसाचें उत्पन्न दर एकरीं वरीलप्रमाणें मिळूं शकतें असा प्रत्यक्ष अनुभव आहे.

(३) उंसाचें गळित डिसेंबर ते एप्रिल या पांच महिन्यांत संपविल्यास साखरेचा उतारा १२ टक्के मिळूं शकतो.

---

(१) गूळ करण्यास सरकारकडून बंदी करण्यांत आल्यामुळें दररोज एक हजार टन ऊंस गाळील इतकी मोठी नवीन सेमि इलेक्ट्रिक माशिनरी कंपनीनें विकत घेतली आहे. नवीन माशिनरीनें उसाचें गळित डिसेंबर ते एप्रिलअखेर संपवितां येईल.

(२) नवीन माशिनरीची किंमत मुंबई-पोंच तीस लक्ष रुपये आहे. ७५ टक्के माशिनरी मुंबईस आली आहे व २५ टक्के सप्टेंबरअखेर निघून मुंबईस नोव्हेंबर महिन्यांत येईल.

(३) नवीन मशिनरी व कारखान्याची उभारणी याकरितां साडेचाळीस लक्ष रुपयांच्या शेअर-विक्रीची सरकारकडून परवानगी मिळाली आहे.

---

**कंपनीनें घेतलेली मशिनरी स्टर्लिंग एरियांतील असल्यामुळें, नुकत्याच झालेल्या हुंडणावळींतील फरकामुळें कंपनीला मशिनरीबद्दल कांहींहि अधिक किंमत द्यावी लागणार नाहीं.**

---

(१) मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय जनतेच्या भांडवलावर यशस्वी झालेला आहे.

(२) गेलीं सात वर्षें शेअरवर १० टक्के नफा व ठेवींवर ६ टक्के व्याज कंपनीनें दिलेलें आहे.

(३) १९४८–४९ हंगामांत कंपनीची चाळीस लक्ष रुपयांची साखर तयार झाली.

(४) १९४९–५० हंगामांत साखरेचे भाव कमी झाले तरी चाळीस लक्ष रुपयांची साखर कंपनीला तयार करतां येईल असा अंदाज आहे.

---

**सरकारी नियमाप्रमाणें भागीदार व त्यांचे मित्र यांना शेअर–विक्री सुरू आहे.**

---

## मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातील.

**मुदत एक वर्ष द. द. शेंकडा ५ टक्के व्याज**

**मुदत दोन वर्षें द. द. शेंकडा ५॥ टक्के व्याज**

**मुदत तीन वर्षें द. द. शेंकडा ६ टक्के व्याज**

**व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.**

★ **कंपनीचे भागीदारांस व ठेवीदारांस यंदाची दिवाळी सुखप्रद व भरभराटीची जावो.** ★

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव, लक्ष्मी रोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. ए., एलएल. बी.
**सी. जी. आगाशे आणि कंपनी,**
मॅनेजिंग एजण्टस्.


---


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.